दि. ३० मार्च २०१७

# ठाणे महानगरपालिका ठाणे

## सन २०१७-१८

## महापालिका आयुक्त श्री.संजीव जयस्वाल यांचे अर्थसंकल्पाबाबत निवेदन

मा.महापौर महोदया व सन्माननीय सदस्य,

ठाणे महानगरपालिका आयुक्त, म्हणून मला दोन वर्षे पूर्ण झालेली असून या काळातील विकासाची कास धरणारा तिसरा अर्थसंकल्प तयार करण्यासाठी सन २०१६-१७ चे सुधारित व सन २०१७-१८ चे मूळ अंदाज महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९५ व कलम ३५ (अ) अन्वये मा. महासभेस सादर करीत आहे. मला आपल्याला सांगताना आनंद होत आहे की, आगामी वर्षाचे आर्थिक अंदाज तयार करताना समाजातल्या शेवटच्या माणसाच्या विकासाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

अर्थसंकल्पीय अंदाज दरवर्षी मांडले जातात. परंतु ठाणे महानगरपालिका आयुक्त म्हणून ठाणेकरांशी माझे जे नाते जोडले गेले आहे त्या आधारे मी हे विश्वासाने सांगू शकतो की, सामान्य नागरिक कदाचित अर्थसंकल्प वाचत नसला तरी तो अर्थसंकल्पात स्वतःला शोधत असतो. त्यामुळे मला अर्थसंकल्पीय अंदाज तयार करताना ठाण्यातील शेवटच्या माणसाचा निश्चित विचार केलेला आहे.

अंदाजपत्रक तयार करतांना सामान्य ठाणेकर डोळयासमोर ठेवून त्यांच्या आशा आकांक्षा पूर्ण करण्यासाठी नागरिकांना अंदाजपत्रकातून अपेक्षित असलेल्या सुधारणा व सेवा सुविधा याबाबत प्रथमच नागरिकांकडून ऑनलाईन, मुख्यालय व प्रभाग कार्यालये येथील सूचना पेटी व वर्तमानपत्राद्वारे सूचना देण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यास अनुसरुन ऑनलाईनद्वारे ६५० व सुचनापेटीतून १०० व वर्तमानपत्राच्या माध्यमातून विविध प्रकारच्या नागरी व पायाभूत सुविधा पुरविण्याबाबत सूचना प्राप्त झाल्या. अशा नागरिकांकडून प्राप्त झालेल्या सूचना विचारात घेऊन पाच वर्षाचा लोकाभिमुख व्हिजन प्लॅन तयार करणारी ठाणे महानगरपालिका ही पहिलीच महापालिका असेल हे मी सांगू इच्छितो.

ठाणे महानगरपालिका हद्दीतील रस्ते, पाणी, वीज, उड्डाणपूल व अन्य पायाभूत सुविधांचा विकास तर करायचा आहेच, पण त्यासोबत छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर व राजर्षी शाहू महाराज यांनी पाहिलेले सामाजिक न्यायाचे स्वप्न पूर्ण करायचे आहे. आज मी सादर करीत असलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजातील एकेका पैशाचे नियोजन हे ठाणेकरांच्या स्वप्नपूर्तीसाठीच असेल, असा विश्वास मी देत आहे.

पायाभूत सुविधांची उभारणी हा कोणत्याही शहराच्या विकासाच्या टप्प्यातील एक महत्वपूर्ण बिंदू असतो. ठाणे शहरातील पायाभूत सुविधांच्या उभारणीचे काम रस्ते रुंदीकरण व मजबुतीकरणाच्या माध्यमातून यापूर्वीच सुरु करण्यात आले असून ही सर्व कामे या आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात येणार आहेत.

ठाणे शहराचा केंद्र शासनाने स्मार्ट सिटीमध्ये समावेश केलेला असल्याने आपली जबाबदारी अधिक वाढलेली असून यापुढे ठाणेकरांना जास्तीत जास्त पारदर्शकपणे कामकाज करुन दाखविणे माझ्यासाठी आव्हान आहे. त्यासाठी या अर्थसंकल्पीय अंदाजात स्मार्ट सिटी साठी पुरेशी तरतूद करण्यात आलेली असून ठाणे शहर हे राज्यातच नव्हे तर देशात स्मार्ट म्हणून नावलौकिकास येईल याची मला खात्री आहे आणि यासाठी आपले व या शहरातील सर्व घटकांचे सकारात्मक सहकार्य अपेक्षित आहे.

सन २०१६-१७ चे अर्थसंकल्पीय अंदाज तयार करताना उत्पन्नाच्या अतिशय सूक्ष्म बाबी विचारात घेण्यात आलेल्या होत्या. त्यासाठी विभाग निहाय बैठका घेऊन उत्पन्नाच्या छोटया छोटया गोष्टींचा विचार करुन उत्पन्नात कशी वाढ होईल हे पाहिले होते. त्याचा परिणाम म्हणून सन २०१६-१७ मध्ये अंदाजित केलेले उत्पन्न प्रत्यक्ष प्राप्त होत असल्याचे आजच्या आकडेवारीवरुन दिसत आहे.

ठाणे महानगरपालिका दोन वर्षापूर्वी पुरेसे उत्पन्न प्राप्त होत नसल्याने आर्थिक संकटात होती. त्यासाठी कठोर पावले उचलण्यात आल्याने उत्पन्नात लक्षणीय वाढ झालेली आहे.

**फासला नजरोंका धोका भी तो हो सकता है |**
**हात बढाके देखो जो चमके वो**
**चाँद भी तो हो सकता है |**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९५ नुसार सन २०१६-१७ च्या उत्पन्न व खर्चाचा ताळमेळ घेऊन **रु.२५४९.८२ कोटीचे** अर्थसंकल्पीय अंदाज मा. स्थायी समितीपुढे सादर केले होते. त्यामध्ये मा.स्थायी समितीने **रु. १०९.५० कोटी** वाढ प्रस्तावित करुन **रु.२६५९.३२ कोटीचा** अर्थसंकल्प मा. महासभेपुढे मान्यतेसाठी सादर केला होता. मा. महासभेने त्यामध्ये **रु.७०.६८ कोटी** वाढ करुन तो **रु.२७३० कोटीचा** अर्थसंकल्प मंजूर केला होता.

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात **रु.२८९ कोटी** आरंभीच्या शिल्लकेसह **रु.३३९०.७८ कोटी** रकमेचे जमा खर्चाचे अंदाज मा. महासभेपुढे मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहेत. यामध्ये महसुली उत्पन्न **रु.२२३३.९२ कोटी,** शासकीय अनुदान **रु.२३२.८६ कोटी** व कर्ज किंवा कर्जरोखे **रु.५३५ कोटी** अपेक्षित केलेले आहेत.

ठाणे महानगरपालिकेने सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात दोन ते तीन वर्षाचे आर्थिक नियोजन करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२ (ब) अन्वये शहराच्या विकासाच्या दृष्टिकोनातून मोठया प्रमाणात विकास कामे व प्रकल्प हाती घेऊन मोठया प्रमाणात दायित्व स्वीकारलेले आहे. या कामांच्या भौतिक प्रगतीनुसार देयकांच्या प्रदानासाठी सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात

पुरेशी तरतूद करणे क्रमप्राप्त असल्याने या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये मागील कामांच्या देयकांच्या प्रदानासाठी लागणा-या तरतुदीसह लेखाशीर्षनिहाय एकूण तरतुदी प्रस्तावित केलेल्या आहेत. यातील काही मोठया प्रकल्पांचे दायित्व सन २०१८-१९ मध्ये दयावे लागणार आहे हे आपल्या निदर्शनास आणू इच्छितो.

महसुली उत्पन्नाचे स्त्रोत मर्यादीत असल्याने व करवाढीस देखील मर्यादा असल्याने अन्य मार्गांनी विकास कामे करणे आता क्रमप्राप्त झाले आहे. त्यामुळे मोठे विकास प्रकल्प पी.पी.पी., बी.ओ.टी. किंवा कंन्स्ट्रक्शन टीडीआरच्या माध्यमातून तसेच काही प्रकल्प हे महापालिकेकडून व्यवहार्यता अंतर निधी (Viability Gap Funding) देऊन पूर्ण करावे लागणार आहेत.

ठाणे शहराची वाढती लोकसंख्या व नागरीकरण लक्षात घेऊन शहराच्या विकासावर दूरगामी परिणाम करणा-या व ठाणे शहरासाठी मानबिंदू ठरणा-या महत्वाकांक्षी प्रकल्पांसाठी मोठया प्रमाणावर निधीची आवश्यकता भासणार असल्याने कर्ज अथवा कर्जरोख्यांद्वारे निधी उभारावा लागणार आहे हे मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो.

यापुढे सन २०१६-१७ च्या सुधारित व सन २०१७-१८ च्या मूळ अर्थसंकल्पीय अंदाजावर मी भाष्य करणार आहे.

## अ) सन २०१६-१७ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज

- महापालिका उत्पन्न रु.२१९५.५० कोटी वरुन रु.२०२७.९० कोटी
- अनुदाने रु.२२०.५४ कोटी वरुन रु.१४९.४३ कोटी
- कर्ज रु.८३.८६ कोटी वरुन शून्य
- आरंभीची शिल्लक रु.२३०.१० कोटी वरुन रु.३०५.८८ कोटी
- एकूण जमा **रु.२७३० कोटी** वरुन **रु.२४८३.२१ कोटी** जमेचे अंदाज सुधारित करुन प्रस्तावित करण्यात येत आहेत.

- महसुली खर्च रु.१३१४.८२ कोटी वरुन रु.११८८.३३ कोटी
- भांडवली खर्च रु.१४१५.०३ कोटी वरुन रु.१००५.८८ कोटी
- अखेरची शिल्लक रु.१५ लक्ष वरुन रु.२८९ कोटी
- एकूण खर्च **रु.२७३० कोटी** वरुन **रु.२४८३.२१ कोटी** खर्चाचे अंदाज सुधारीत करुन प्रस्तावित करण्यात येत आहेत.

## ब) सन २०१७-१८ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज

- महापालिका उत्पन्न रु.२३३३.९२ कोटी
- अनुदाने रु.२३२.८६ कोटी
- कर्ज / कर्जरोखे रु.५३५ कोटी
- आरंभीची शिल्लक रु.२८९कोटी
- एकूण **रु.३३९०.७८ कोटी** जमेचे मूळ अंदाज प्रस्तावित करण्यात येत आहेत.

- महसुली खर्च रु.१५६२.८२ कोटी
- भांडवली खर्च रु.१८२७.७२ कोटी
- अखेरची शिल्लक रु.२४ लाख
- एकूण **रु.३३९०.७८ कोटी** खर्चाचे मूळ अंदाज प्रस्तावित करण्यात येत आहेत.

## महानगरपालिका उत्पन्न

### १. मालमत्ता कर

महानगरपालिका हद्दीतील इमारती व जमिनीवर आकारण्यात येणारा हा कर सध्या मालमत्तेच्या करयोग्य मूल्यावर (Ratable Value) आकारला जात आहे. परंतु महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार शहरातील इमारती व जमिनीच्या भांडवली मूल्यावर हा कर आकारता येऊ शकतो. करांच्या दरामध्ये सुसूत्रता व सुलभता येण्याच्या दृष्टीकोनातून मालमत्ता कर हा भांडवली मूल्यावर निश्चित करुन आकारण्याबाबत प्रस्ताव लवकरच

सादर करण्यात येईल व भांडवली मूल्यावर आधारित मालमत्ता कर सन २०१८-१९ या वर्षापासून लागू करण्याचा मानस आहे.

सन २०१६-१७ मध्ये शासकीय करांसह एकूण मालमत्ता करापासून **रु.४५६ कोटी** इतके उत्पन्न अपेक्षित केले होते. परंतु प्रत्यक्ष प्राप्त उत्पन्नाचा विचार करता मालमत्ता करापासून **रु.३९० कोटी** सुधारित जमा अपेक्षित करण्यात येत आहे.

मोठया प्रमाणात हाती घेण्यात आलेली विकास कामे व ठाणे महानगरपालिकेची स्मार्ट सिटी योजनेत निवड झाल्यामुळे नागरिकांना चांगल्या प्रतीच्या पायाभूत व इतर नागरी सुविधा देण्यासाठी मालमत्ता करात वाढ करणे क्रमप्राप्त झाले आहे. त्यामुळे सन २०१७-१८ या वर्षापासून निवासी मालमत्तांच्या जललाभकरात १२ टक्क्यावरुन २२ टक्के, बिगर निवासी मालमत्तांच्या जल लाभकरात १७ टक्क्यावरुन २७ टक्के, निवासी मालमत्तांच्या मल:निसारण लाभकरात ९ टक्क्यावरुन १९ टक्के, बिगर निवासी मालमत्तांच्या मल:निसारण लाभकरात १२.५ टक्क्यावरुन २२.५ टक्के, निवासी मालमत्तांच्या मलनि:सारण करात ५ टक्क्यावरुन १५ टक्के व बिगर निवासी मालमत्तांच्या मलनि:सारण करात ८ टक्क्यावरुन १८ टक्के , निवासी मालमत्तांच्या रस्ता करात ६ टक्क्यावरुन १० टक्के, बिगर निवासी मालमत्तांच्या रस्ता करात ९ टक्क्यावरुन १० टक्के वाढ प्रस्तावित करण्यात येत असून सन २०१७-१८ मध्ये ही वाढ गृहीत धरुन शासकीय करांसह एकूण मालमत्ता करापासून **रु.४८०कोटी** जमा प्रस्तावित करण्यात येत आहे.

**प्रोत्साहन योजना**

ठाण्यातील जे मालमत्ताधारक संपूर्ण वर्षाचा मालमत्ता कर मागणी केल्यानंतर लवकरात लवकर भरतील अशा मालमत्ता धारकांसाठी Early Bird Incentive Scheme सुरु करण्यात येत आहे. त्याबाबतची योजना पुढील प्रमाणे आहे.

- ३१ मे २०१७ पर्यंत पूर्ण वर्षाचा मालमत्ता कर भरल्यास सामान्य करात १० टक्के सूट

- ३० जून २०१७ पर्यंत पूर्ण वर्षाचा मालमत्ता कर भरल्यास सामान्य करात ५ टक्के सूट
- ३१ जुलै २०१७ पर्यंत पूर्ण वर्षाचा मालमत्ता कर भरल्यास सामान्य करात ३ टक्के सूट
- ३१ ऑगस्ट २०१७ पर्यंत पूर्ण वर्षाचा मालमत्ता कर भरल्यास सामान्य करात २ टक्के सूट

सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीकोनातून १ एप्रिल २०१७ पासून अपंग व माजी सैनिक या मालमत्ताधारकांना मालमत्ताकरातील सामान्य करात ५ टक्के सूट देण्याचे प्रस्तावित आहे.

## २. स्थानिक संस्था कर/ वस्तू व सेवा कर (GST)

राज्य शासनाने **रु.५० कोटी** पेक्षा कमी वार्षिक उलाढाल असलेल्या व्यापा-यांना स्थानिक संस्था कर माफ केलेला असून त्याबदल्यात शासनाकडून स्थानिक संस्था कर भरपाई अनुदान व मुद्रांक शुल्क अनुदान महानगरपालिकेस प्राप्त होत आहे. ही अनुदाने व **रु.५० कोटी** पेक्षा जास्त वार्षिक उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांकडून प्राप्त होणारा स्थानिक संस्था कर गृहीत धरुन सन २०१६-१७ या वर्षामध्ये **रु.७००  कोटी** उत्पन्न अपेक्षित केले होते त्यात कोणताही बदल न करता ते सुधारित मध्ये **रु.७०० कोटी** अपेक्षित करण्यात येत आहे.

सन २०१७-१८ मध्ये स्थानिक संस्था करापासून **रु.७५६कोटी** इतके उत्पन्न अपेक्षित केले आहे.

केंद्र शासनाने १ जुलै २०१७ पासून वस्तू व सेवावरील  कर (Goods & Service Tax) आकारण्याचे ठरविले असल्याने स्थानिक संस्था कर रद्द होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाकडून स्थानिक संस्था कर अनुदानाऐवजी वस्तू व सेवा कर अनुदान प्राप्त होईल. त्यानुसार अर्थसंकल्पातील तरतुदीमध्ये यथावकाश बदल करण्यात येईल.

## ३. विकास व तत्सम शुल्क

ठाणे शहरामध्ये नव्याने विकसित होणा-या इमारतीवर शहर विकास विभागामार्फत इमारत परवाना शुल्क, विकास नियंत्रण नियमावली आकार, विकास शुल्क इत्यादी शुल्क आकारण्यात येतात. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून इमारत बांधकाम परवानग्या ऑनलाईन पद्धतीने देण्याचे नियोजित आहे. त्यामुळे विकासकांना तात्काळ सुलभ परवानग्या मिळणे शक्य होईल. शहर विकास विभागाकडून सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु. ५८५ कोटी** इतके उत्पन्न अपेक्षित केले होते ते सुधारित करुन **रु.५७७ कोटी** प्रस्तावित करण्यात येत आहे.

सन २०१७-१८ मध्ये शहर विकास विभागाकडून विकास शुल्क व इतर शुल्कांपासून **रु.६५० कोटी** इतके उत्पन्न प्रस्तावित केले आहे.

## ४.पाणी पुरवठा आकार

शहरातील प्रत्येक नागरिकाला पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठा करणे हे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. हा पाणी पुरवठा ना नफा - ना तोटा या तत्वावर करणे आवश्यक आहे. पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी व वाढत्या लोकसंख्येला पुरेसे पाणी मिळावे यासाठी वाणिज्यिक वापर मालमत्तांबरोबरच निवासी मालमत्तांना यापुढे मीटरद्वारे पाणी पुरवठा करण्याचे नियोजन आहे.

सन २०१६-१७ या वर्षात पाणी पुरवठा आकारापासून **रु.१५० कोटी** जमा अपेक्षित केली होती. ती सुधारित करुन **रु.११०कोटी** प्रस्तावित करण्यात येत आहे.

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी पाणी पुरवठा आकारापासून **रु.१२५ कोटी** उत्पन्न अपेक्षित केलेले आहे.

## ५.अग्निशमन फी व आकार

अग्निशमन विभागामार्फत फायर प्रिमियम चार्जेस, फायर इन्फ्रास्ट्रक्चर चार्जेस, अग्निशमन सेवा फी इत्यादीपासून सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु.८९ कोटी** उत्पन्न अपेक्षित केले

होते ते सुधारित करुन **रु.७९.१७ कोटी** प्रस्तावित करण्यात येत आहे.

अग्निशमन विभागाकडून सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात **रु.९० कोटी** उत्पन्न अपेक्षित केले आहे.

### ६. रस्ता खोदाई फी

ठाणे महानगरपालिकेच्या रस्त्याची खोदाई करुन सेवा वाहिन्या व इतर कामे विविध शासकीय किंवा खाजगी कंपन्यांमार्फत केली जातात. अशा कंपन्यांकडून रस्ता खोदाई फी घेण्यात येते. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी रस्ता खोदाई फीपासून **रु.११४.५० कोटी** उत्पन्न अपेक्षित केले होते ते सुधारित करुन **रु.७० कोटी** उत्पन्न अपेक्षित करण्यात येत आहे.

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये रस्ता खोदाई फी पासून **रु. १०० कोटी** उत्पन्न प्रस्तावित केले आहे.

### ७. जाहिरात शुल्क

शहरामध्ये विविध ठिकाणी लावण्यात येणा-या होर्डींग, गॅन्ट्री, ॲडपोल, युनिपोल इत्यादीद्वारे जाहिराती प्रसिद्धीवर शुल्क आकारण्यात येते त्यापासून सन २०१६-१७ मध्ये **रु.१७.५० कोटी** इतके शुल्क अपेक्षित केले होते ते सुधारित करुन **रु.१५.९० कोटी** उत्पन्न अपेक्षित करण्यात येत आहे.

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी जाहिरात शुल्कापासून **रु.२० कोटी** उत्पन्न प्रस्तावित करण्यात येत आहे.

### ८. स्थावर मालमत्ता भाडे व शुल्क

महानगरपालिकेच्या इमारती, तलाव, उपहारगृहे, मार्केट गाळे, केबीन्स, मैदाने इत्यादी स्थावर मालमत्तांच्या भाडयापासून सन २०१६-१७ मध्ये **रु.११ कोटी** उत्पन्न अपेक्षित केले होते ते सुधारित करुन **रु.१०.३१ कोटी** उत्पन्न अपेक्षित करण्यात येत आहे.

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात स्थावर मालमत्ता विभागाकडून **रु. २१ कोटी** उत्पन्न प्रस्तावित केले आहे.

## ९. घनकचरा सेवाशुल्क

महानगरपालिका हद्दीतील व्यापारी आस्थापनांकडून मोठया प्रमाणात होणा-या घनकच-याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी जादा खर्च येत आहे. तसेच केंद्र सरकारच्या विविध योजनांचे अनुदान प्राप्त होण्यासाठी युजर चार्जेस घेणे ही सुधारणा (Reforms) करणे अनिवार्य आहे. त्यामुळे हे शुल्क आकारण्यात येत आहे. घनकचरा सेवाशुल्कापोटी सन २०१६-१७ मध्ये **रु.१९.७६कोटी** उत्पन्न अपेक्षित केले होते ते सुधारित करुन **रु.५.००कोटी** उत्पन्न अपेक्षित करण्यात येत आहे.

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात घनकचरा सेवाशुल्कापासून **रु.१० कोटी** उत्पन्न प्रस्तावित केले आहे.

## १०.इतर विभागापासून उत्पन्न

परवाना, अतिक्रमण निर्मुलन, आरोग्य, क्रीडा, नाटयगृह, तरणतलाव, महापालिका निधीच्या गुंतवणुकीवरील व्याज इत्यादीपासून सन २०१६-१७ मध्ये **रु. ५२.०१ कोटी** उत्पन्न अपेक्षित केले होते. ते सुधारित करुन **रु. ८७.०१ कोटी** उत्पन्न अपेक्षित करण्यात येत आहे व सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात **रु.८८.०२कोटी** उत्पन्न प्रस्तावित केले आहे.

## ११. अनुदाने

ठाणे महानगरपालिकेला केंद्र शासन, राज्य शासन व इतर शासकीय विभागाकडून अनुदाने प्राप्त होतात. त्यामध्ये आमदार निधी, खासदार निधी , पायाभूत सुविधांसाठी विशेष अनुदान, नागरी दलित वस्ती सुधारणा अनुदान, रस्ते परीरक्षण अनुदान, स्वच्छ भारत अभियान, अमृत योजना व JnNURM अंतर्गत अनुदानांचा समावेश आहे. या सर्व अनुदानांचा विचार करता सन २०१६-१७ मध्ये **रु.२२०.५४ कोटी** अनुदान प्राप्त होईल असे अंदाजित केले होते. परंतु या आर्थिक वर्षाचा उर्वरित कालावधी पाहता

जेएनएनयुआरएम अंतर्गत केंद्र व राज्य शासनाकडून अनुदान प्राप्त होण्याची शक्यता कमी असल्याने ही अनुदाने सुधारित करुन **रु.१४९.४३ कोटी** इतकी करण्यात येत आहेत.

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात **रु.२३२.८६ कोटी** शासकीय अनुदाने प्रस्तावित केली आहेत.

## १२. कर्जे व कर्जरोखे

ठाणे महानगरपालिका निधीतून विविध प्रकल्प तसेच केंद्र व राज्य शासनाच्या स्मार्ट सिटी, अमृत इत्यादी योजना राबविण्यात येत आहेत. त्यासाठी महानगरपालिकेचे महसुली उत्पन्न अपुरे पडणार आहे या भांडवली कामांच्या प्रकल्पांसाठी कर्ज किंवा केंद्र शासनाच्या धोरणानुसार महापालिका कर्जरोखे (Municipal Bonds) उभारुन त्याद्वारे निधी उपलब्ध करावा लागणार आहे. त्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.महासभेपुढे सादर करण्यात येईल व त्यानंतर राज्य शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात येईल. याबाबत सविस्तर अभ्यास करुन अहवाल देण्यासाठी केंद्र शासनाच्या आर्थिक सल्लागार पॅनेलवरील सल्लागाराची नेमणूक करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सन २०१६-१७ मध्ये **रु.८३.८६ कोटी** कर्ज घेणे अपेक्षित केले होते. परंतु या वर्षात कर्ज घेण्याची गरज भासली नसल्याने तरतूद कमी करण्यात आलेली आहे.

सन २०१७-१८ मध्ये मोठया प्रकल्पांसाठी **रु.५३५ कोटी** कर्ज किंवा कर्जरोख्याद्वारे निधी उभारण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

वरील प्रमाणे सन २०१६-१७ चे **रु.२४८३.२१ कोटीचे** सुधारित जमा अंदाज व सन २०१७-१८ चे **रु.३३९०.७८ कोटीचे** मूळ जमा अंदाज मा.महासभेस सादर करीत आहे.

## महानगरपालिका खर्च

ठाणे महानगरपालिकेने प्रशासनाच्या दृष्टिकोनातून व नागरिकांकडून प्राप्त सूचना विचारात घेऊन विकास कामांचा पाच वर्षाकरीता व्हिजन प्लॅन तयार करण्यात आला आहे. सदर व्हिजन प्लॅनमधील ठळक वैशिष्टयपूर्ण बाबी पुढीलप्रमाणे.

- विकास आराखडयाची अंमलबजावणी
- रस्ते विकास व वाहतुक सुधारणेवर भर
- महापालिका इमारतींचा विकास व सुधारणा
- समुह विकास योजना (Cluster Development)
- HCMTR मार्गाचे अंमलबजावणीबाबत
- चौपाटी विकास
- करमणूक व इतर सुविधांचा विकास
- सुरळीत पाणी पुरवठयासाठी स्वतंत्र स्त्रोत तयार करण्यासाठी स्वत:चे धरण
- २४ x ७ पाणी पुरवठा
- स्मार्ट मिटरींग
- घोडबंदर व दिवा परिसरात भुयारी गटार योजना फेज IV राबविणे
- सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा पुनर्वापर
- एकात्मिक नाले विकास
- घनकचरा व्यवस्थापन
- प्रदुषण नियंत्रण
- आरोग्य सेवेमध्ये सुधारणा
- शिक्षण व्यवस्थेमध्ये आमुलाग्र बदल
- विदयुतीकरणावर भर
- उदयान विकास
- महिला व बालकल्याण कार्यक्रम
- दिव्यांगांसाठी विविध योजना
- कॉकलिअर इम्प्लान्ट सर्जरीद्वारे कर्णबधीर मुलांवर उपचार

- क्रीडा धोरणाची अंमलबजावणी
- तलाव संवर्धन व सुशोभीकरण

या सर्व कामांचा प्राथम्यक्रम ठरवून आगामी आर्थिक वर्षात हाती घेण्यात येणा-या कामांसाठी तरतुदी निश्चित करण्यात आल्या आहेत.

## (१) सार्वजनिक बांधकाम विभाग

## १. रस्ते

पायाभूत सुविधांची उभारणी हा कोणत्याही शहराच्या विकासाच्या टप्प्यातील एक महत्वपूर्ण बिंदू असतो. या सुविधांच्या उभारणीमध्ये रस्ते बांधणीसाठी सन २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये एकूण ५२.४२१ कि.मी.लांबीचे १०९ रस्ते प्रस्तावित असून हे सर्व रस्ते सन २०१७-१८ मध्ये पूर्ण करण्याचा संकल्प आहे. रस्ते बांधणीमध्ये मुख्यत्वे करुन पोखरण रोड नं.१ व २, शास्त्रीनगर ते हत्ती पूल, सुभाष पथ (एसटी स्टॅण्ड ते कलेक्टर ऑफीस), खोपट रस्ता, मुंब्रा स्टेशन ते वाय जंक्शन यांचा विशेष उल्लेख करावासा वाटतो. कारण या रस्त्यांचे रुंदीकरण करताना १३१८ अतिक्रमणे हटविण्याचे अवघड काम करावे लागले. तसेच उल्लेखनीय काम म्हणजे जांभळी नाका मार्गे मार्केट मधून ठाणे स्टेशनकडे जाणारा (सुभाष पथ) अत्यंत वर्दळीचा व वाढीव बांधकामाचा रस्ता रुंद करण्यात आलेला आहे.

ठाणे महानगरपालिका हद्दीत एकूण ३५६ कि.मी. लांबीचे रस्ते असून त्यापैकी २४६ कि.मी. लांबीचे रस्ते हे डांबरी असून ११० कि.मी. लांबीचे रस्ते सिमेंट कॉंक्रीटचे आहेत.

ठाणे महानगरपालिकेने सन २०१६-१७ या वर्षामध्ये रस्ता रुंदीकरण करुन रस्ते तयार करण्याचे काम सुरु केले असून त्याकरीता ७६.५० हेक्टर क्षेत्राची जमीन संपादित केली आहे. विकास योजना अंमलबजावणीचा दर हा यापुर्वी २६.६८% होता. परंतु यावर्षी कठोर परिश्रम घेऊन तो ५६.९५% इतका नेण्यात महापालिका यशस्वी ठरली आहे. तसेच ५ वर्षाच्या व्हिजन प्लॅनमध्ये प्रतिवर्षी १०% विकास योजनेची अंमलबजाणी करुन पुढील ५ वर्षात ९० % पर्यंत विकास योजनेची अंमलबजावणी करण्याचा मानस आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात सन २०१७-१८ पासून पुढील पाच वर्षात एकूण ८६.५४ कि.मी. लांबीच्या नवीन रस्त्यांकरीता २५४.५६ हेक्टर जमीन संपादित करण्याचा मानस आहे. या रस्त्यांच्या भूमी संपादनाचे काम टी.डी.आर च्या माध्यमातून करण्यात येणार आहे. सन २०१६-१७ मध्ये कंस्ट्रक्शन टीडीआर च्या माध्यमातून ३.३० कि.मी. लांबीच्या एकूण ५ रस्त्याच्या विकसनाची कामे सुरु असून यामुळे महानगरपालिका निधीची **रु.७८.४७ कोटी** बचत होणार आहे. सन २०१७-१८ या वर्षात टी.डी.आर च्या माध्यमातून ४.६४ कि.मी. लांबीच्या एकूण ७ रस्त्यांच्या विकसनाची कामे प्रस्तावित असून त्यामुळे महानगरपालिकेवरील **रु. ११३ कोटी** बोजा कमी होणार आहे.

## १.१ रस्ते रुंदीकरण व नुतनीकरण

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सद्यस्थितीतील वाहतुकीचे प्रमाण व वाहतूक कोंडी लक्षात घेता, अस्तित्वातील रस्ते, विकास आराखडयातील रुंदीप्रमाणे विकसित करणे अत्यंत गरजेचे असून रस्त्यावर असलेली बांधकामे व अतिक्रमणे हटविण्याबाबत महत्वाकांक्षी मोहिम हाती घेण्यात आली होती. रस्ते रुंदीकरणांतर्गत सन २०१५-१६ व २०१६-१७ या आर्थिक वर्षात १४.४४ कि.मी. लांबीचे १३ रस्ते हाती घेण्यात आले असून या वर्षात ४.७५ कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे बांधकाम पूर्ण झाले असून उर्वरित कामे मार्च २०१८ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहेत.

तसेच विकास आराखडयातील १७.६० कि.मी. लांबीचे १९ रस्ते विकसित करण्याचे हाती घेण्यात आले असून सद्यस्थितीत ४.०५ कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे बांधकाम पूर्ण झाले असून उर्वरित रस्त्याचे बांधकाम प्रगती पथावर असून मार्च २०१८ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहेत.

मुख्य रस्त्यांना जोडणाऱ्या मिसिंक लिंक रस्त्याअंतर्गत एकूण २.२३ कि.मी. लांबीचे २ रस्ते हाती घेण्यात आले असून सदर रस्त्याचे बांधकाम प्रगती पथावर असून मार्च २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मुख्य चौकात खूप मोठया प्रमाणात वाहतुकीची वर्दळ असते. सदर ठिकाणी पावसाळयात मोठया प्रमाणात खड्डे पडतात. त्यामुळे चौकांचे मास्टीक अस्फाल्ट पध्दतीने पुनर्पुष्ठीकरणाचे काम महापालिकेमार्फत हाती घेण्यात आले आहे. सदर कार्यक्रमाअंतर्गत प्रथम टप्प्यात १९ चौकांचे व दुस-या टप्प्यात ३८ चौकांचे काम पूर्ण करण्यात आले आहे. सन २०१६-१७ या वर्षात टप्पा क्र.३ अंतर्गत २२ चौकांचे मास्टीक अस्फाल्ट करण्याची कामे हाती घेण्यात आली असून या आर्थिक वर्षात ८ चौकांची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. उर्वरित १५ चौकांची कामे मे २०१७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

सन २०१७-१८ मध्ये टप्पा क्र. ४ अंतर्गत काही मुख्य चौकांचे मास्टिक अस्फाल्ट करण्याचे नियोजन आहे.

ठाणे महानगरपालिका हद्दीमध्ये भविष्यामध्ये होणारा विकास व त्याअनुषंगाने होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेता विकास आराखडयामधील रस्ते विकसित करण्याकरीता ५ वर्षाकरीता रोड डेव्हलपमेंट व्हीजन प्लान तयार करण्यात आला असून त्यामध्ये गायमुख पासून ते दिव्यापर्यंत ८६.५४ कि.मी. लांबीचे एकूण ८१ रस्ते विकसित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच सदरचे रस्ते विकसित करताना जलवाहिनी, मलवाहिनी, विद्युत दिवे, रस्त्यांमधील उद्याने इत्यादी पायाभूत सुविधा विकसित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. सदरचे रस्ते टप्प्याटप्प्याने हाती घेऊन पूर्ण करण्यात येणार असून सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात विकास आराखडयानुसार रस्त्यांचे रुंदीकरण, नव्याने रस्ते विकसित करणे व मिसिंक लिंक विकसित करण्याच्या अंतर्गत प्रथम टप्प्यात काही रस्ते हाती घेण्यात येणार आहेत. रस्ते बांधणीसाठी सन २०१७-१८ मध्ये मागील दायित्वासहीत रस्ते मजबूतीकरण व रुंदीकरण या लेखाशिर्षात **रु.१००कोटी** , विकास आराखडयातील रस्ते रुंदीकरण **रु.१००कोटी** व मिसिंग लिंक रस्ते या लेखाशिर्षात **रु.६० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

## १.२ नवीन मॉडेल रोड विकसित करणे

सन २०१६-१७ मध्ये १२ कि.मी.लांबीचे पाच मॉडेल रोड विकसित करण्याची कामे सुरु असून दुसऱ्या टप्प्यात शहरातील नवीन मॉडेल रोड विकसित करण्याचे नियोजन असून मागील वर्षीच्या मॉडेल रस्त्यांच्या कामाच्या दायित्वासह नवीन कामांसाठी **रु.६३ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

## १.३ यु.टी.डब्ल्यु.टी व सिमेंट काँक्रीटीकरण

यु.टी.डब्ल्यु.टी व सिमेंट काँक्रीटीकरण पध्दतीने सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात १८.१५ कि.मी. चे एकूण ७५ रस्ते हाती घेण्यात आले असून सद्यस्थितीत ५.५८ कि.मी. लांबीमध्ये रस्त्यांचे काँक्रीटीकरण पूर्ण करण्यात आले असून उर्वरीत रस्त्यांचे बांधकाम मार्च २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. यु.टी.डब्ल्यू.टी पध्दतीने सिमेंट काँक्रीटीकरण या लेखाशिर्षात मागील दायित्वासह **रु.४०कोटी**, सिमेंट काँक्रिटीकरण रस्ते या लेखाशिर्षात **रु.६ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

## १.४ कोस्टल रोड

अहमदाबाद महामार्गावरील वाहतूक घोडबंदर मार्गावरुन जे.एन.पी.टी येथे जात असल्याने घोडबंदर रस्त्यावर व ठाणे शहरामध्ये वाहतूक कोंडी होत असल्याने त्याला पर्याय म्हणून गायमुख ते भिवंडी बायपास पर्यंत डी.पी.रस्ता (कोस्टल रोड) विकसित करण्यासाठी सी.आर.झेड व इतर शासकीय परवानग्या घेण्याबाबतची कार्यवाही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सुरु आहे. सदर प्रकल्पाचा खर्च मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व महापालिका निधीमधून करण्यात येणार आहे. त्यासाठी सन २०१७-१८ मध्ये **रु.८ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

## १.५ फूट हिल रोड

मुंबईहून अहमदाबाद महामार्गाकडे जाणारी वाहतूक ही ठाणे शहरातून घोडबंदर रोड मार्गे जात असून त्यामुळे ठाणे शहरामध्ये वाहतूक कोंडी होत आहे. यावर पर्याय म्हणून मुंबई कडून येणारी

वाहतूक श्रीनगर, पातलीपाडा,गायमुख मार्गे अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गकडे जाण्यासाठी फूट हिल रोड बांधण्याचे प्रस्तावित असून प्रथम टप्प्यात गायमुख ते पातलीपाडा पर्यंत रस्ता बांधण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाचा खर्च मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व महापालिका निधीमधून करण्यात येणार आहे. त्यासाठी सन २०१७-१८ मध्ये **रु.१० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**१.६ कळवा ते पारसिक लिंक रोड**

ठाणे शहरातील वाहतूक कळवा नाका ते रेतीबंदरकडे वळविण्यासाठी ३.९५ कि.मी. लांबीचा व ३० मीटर रुंदीचा कळवा ते पारसिक लिंक रोड बांधण्याचे प्रस्तावित असून त्यामुळे मुंबई पुणे रस्त्यावरील अवजड वाहनांची वाहतूक शहराबाहेरुन जाईल. सदर प्रकल्पाचा खर्च मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व महापालिका निधीमधून करण्यात येणार आहे. त्यासाठी सन २०१७-१८ मध्ये **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**१.७ स्ट्रीट आर्ट गॅलरी**

ठाणे महानगरपालिकेच्या पेंट द सिटी वॉल अभियानांतर्गत व कलाकारांच्या चित्रकलेला प्रोत्साहन देण्यासाठी मुख्य रस्त्यांच्या फूटपाथवर स्ट्रीट आर्ट गॅलरी तयार करण्याचे प्रस्तावित आहे.

**१.८ सॉफ्ट मोबिलिटी**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात ३५६ कि.मी. लांबीचे रस्ते असून सुमारे १९० कि.मी. लांबीचे पदपथ आहेत. सदर पदपथाची कनेक्टीव्हिटी करुन Non-Motorised Transport Cycle Track Network सुविधा उपलब्ध करण्याचे नियोजन आहे. सदर कामाचा सविस्तर अभियांत्रिकी अभ्यास करण्याकरिता सल्लागार नियुक्त करण्यात आलेला आहे. सॉफ्ट मोबिलिटी या लेखाशिर्षाअंतर्गत **रु.३ कोटी** तरतूद करण्यात आली आहे.

**१.९ वाहतुक नियमन**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील वाढत्या वाहतूक समस्यांच्या पार्श्वभूमीवर वाहतुक सुस्थितीत करण्यासाठी वाहतूक पोलिसांच्या

मदतीकरीता १०० ट्रॅफिक वॉर्डन शहर वाहतुक विभागास १२ महिन्यांच्या कालावधीकरिता उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. सदर कामाकरिता वाहतूक नियमन या लेखार्शीतंर्गत **रु.८० लक्ष** तरतूद करण्यात आली आहे.

### १.१० ॲडॅप्टीव्ह ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टिम

ठाणे शहरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी प्रत्यक्ष वाहनांच्या वर्दळीनुसार सिग्नल यंत्रणेचा वेळ नियंत्रित करुन वेळेची बचत करुन वाहतूक सुरळीत होण्यासाठी अमेरिकेतील गुगल या कंपनीसोबत Google satellite imagary वर आधारित वाहतूक नियंत्रकांचे Synchronization करण्यासाठी गुगलच्या वरिष्ठ प्रतिनिधींसोबत चर्चा सुरु असून अशा पद्धतीची यंत्रणा राबविणारे ठाणे हे देशातील पहिले शहर ठरणार आहे. या पद्धतीचा वापर हा डिजिटल मेसेजिंग सिस्टिममध्ये करण्यात येणार आहे. डिजिटल मेसेजिंग सिस्टिमकरीता **रु.७कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

### १.११ स्मार्ट पार्किंग

ठाणे महापालिका क्षेत्रात रस्त्यावरील व रस्त्याव्यतिरीक्त पार्किंग धोरणास सन २०१३ मध्ये मंजूरी मिळाली असून पार्किंग धोरणांअतर्गत पार्कींगसाठीच्या शुल्कास सन २०१५ मध्ये मंजुरी मिळाली आहे. सदर धोरणाप्रमाणे ठाणे महानगरपालिका क्षेत्रात एकूण ९८५५ एवढया वाहनांची ऑनस्ट्रीट पार्कींग तयर करण्याचे काम सुरु आहे. यामध्ये ४५७१ दुचाकी, २२४२ तीनचाकी, २७०३ चारचाकी हलक्या व ३३९ चारचाकी अवजड वाहनांच्या पार्कींगचा समावेश आहे. यामध्ये ठाणे महापालिकेमार्फत रस्ते निहाय थर्मोप्लॅस्टीक पेंटने पार्कींग लॉट मार्क करणे, आवश्यक सुचना व माहितीफलक बसविणे इत्यादी कामे सुरु असून वाहनांसाठी प्रत्यक्ष पार्कींग सुविधा उपलब्ध करणे व नागरिकांकडून पार्कींग शुल्क वसूल करणे यासाठी ऑपरेटरची नियुक्ती करण्यात येणार आहे.

सदरची पार्कींग सुविधा स्मार्ट करणेच्या अनुषंगाने नेमण्यात येणा-या आपॅरेटरमार्फत अद्ययावत पार्कींग मॅनेजमेंट सिस्टिम तयार

करणे यामध्ये मोबाईल व वेबबेस ॲप्लीकेशन तयार करण्यात येणार आहे. ज्यामुळे नागरिकांना नजिकच्या परिसरात कोणत्या ठिकाणी वाहनासाठी पार्कींग उपलब्ध आहे व त्याचे दर काय राहतील याची माहिती मिळू शकेल. तसेच त्यांना ऑनलाईन पेमेंट करुन आवश्यक ठिकाणी पार्कींगचे बुकिंग करता येवू शकेल. तसेच नागरिकांना पार्कींगबाबत मोबाईल ॲप्लीकेशनद्वारे तक्रार करता येवू शकेल.

पार्कींग मॅनेजमेंट सिस्टिम कार्यान्वित झाल्यानंतर महापालिकेस पार्कींगबाबत व परिणामी महसुलाबाबतची अद्ययावत माहिती मिळू शकेल. पार्कींग मॅनेजमेंट सिस्टिममध्ये मोबाईल ॲप्लीकेशन बरोबरच पार्कींग ठिकाणी सेंसर बसविणे, पार्कींग मिटर बसविणे, हॅण्डहेल्ड डिव्हाईसचा वापर संपूर्ण आवश्यक हार्डवेअर व सॉफ्टवेअर पुरविणे, मनुष्यबळ पुरविणे इत्यादी बाबींचा समावेश राहील.

सदरच्या कामास सुमारे रु.५२ कोटी एवढा अंदाजीत खर्च असून महापालिकेस सुमारे ३०% एवढा म्हणजेच रु.१५ कोटी एवढा भांडवली खर्चातील हिस्सा दयावा लागेल व महापालिकेस एकूण मिळणाऱ्या उत्पन्नापैकी २५% ते ५०% एवढया मर्यादेत महसूल प्राप्त होईल व नागरिकांस पार्कींगची चांगल्या दर्जाची सुविधा मिळेल.

## २. पूल प्रकल्प

### २.१ पादचारी पूल

पायाभूत सुविधा विकसित करताना ब-याच ठिकाणी रस्ते ओलांडण्यासाठी पादचारी पूल बांधणे गरजेचे असते. त्यासाठी महानगरपालिकेने यापूर्वी एकूण ७ पादचारी पुलांची कामे हाती घेतली होती. त्यापैकी २ पादचारी पुलांची कामे पूर्ण झालेली असून उर्वरित ५ पुलांची कामे प्रगती पथावर आहेत.

### सन २०१६-१७ मध्ये पूर्ण झालेले व सुरु असलेले पूल प्रकल्प

१. ज्युपिटर हॉस्पीटल व वागळे इस्टेट मेन रोडवरील पादचारी पुलाचे काम पूर्ण झाले आहे.

२. एल.बी.एस रोड रहेजा कॉम्प्लेक्स, घोडबंदर रस्त्यावरील तत्वज्ञान विद्यापीठ व आरमॉल येथील पादचारी पुलाचे काम मे २०१७ पर्यंत पूर्ण होणार आहे.

३. घोडबंदर रस्त्यावरील ब्रम्हांड जंक्शन व पंचामृत सोसायटी येथील पादचारी पूलाचे काम प्रगतीपथावर असून मार्च २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

### सन २०१७-१८ मधील प्रस्तावित पूल प्रकल्प

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये पादचाऱ्यांच्या सोयीकरिता घोडबंदर रस्त्यावर डोंगरीपाडा, भाईंदरपाडा, गायमुख, बाळकुम अग्निशमन केंद्रासमोर, रेतीबंदर, विटावा येथे रस्त्यावर पादचारी पूल आणि माजिवडा व कॅडबरी जंक्शन येथे पादचारी भुयारी मार्ग प्रस्तावित केले आहेत. या करिता मागील दायित्वासह एकूण रक्कम **रु. २० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

### २.२ कळवा पूल

कळवा खाडीवरील पूलाचे काम प्रगतीपथावर असून मार्च २०१८ पर्यत मुख्य पूल व दोन मार्गिका वाहतुकीसाठी सुरु करण्याचे नियोजन केले आहे. या करिता सन २०१७-१८ मध्ये **रु.४० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

### २.३ कोपरी रेल्वे पूल

मुंबईहून ठाण्यामध्ये प्रवेश करण्याकरीता पूर्व द्रुतगती मार्ग हा एकमेव रस्ता असून कोपरी येथील रेल्वेवरील पूल अरुंद असल्याने तेथे मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. सदर पूलाच्या रुंदीकरणाचे काम हे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व मध्य रेल्वे यांच्यामार्फत करण्यात येणार आहे. सदरचे काम लवकर सुरु होण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून पाठपुरवठा करण्यात येत आहे.

### २.४ एलबीएस मार्गावरील उड्डाणपूल

एलबीएस मार्गावर मीनाताई ठाकरे चौक, अल्मेडा चौक व संत नामदेव चौक येथे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या निधीतून महापालिकेतर्फे तीन उड्डाणपूल बांधण्यात येत असून तिन्ही पुलांची कामे डिसेंबर २०१७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

### २.५ कल्याण फाटा व शीळ फाटा उड्डाणपूल

कल्याण फाटा व शीळ फाटा येथे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या निधीतून उड्डाणपूल बांधण्यात येणार असून सदरची कामे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत दोन ते तीन महिन्यात सुरु करण्यात येणार आहे.

### २.६ ठाणे पूर्व स्थानक येथे रेल्वे स्थानक परिसर वाहतूक सुधारणा प्रकल्प-२

ठाणे रेल्वे स्थानकाच्या पूर्वेकडील जागेचा रेल्वे स्थानकांवरील एअर स्पेस वाणिज्यिक विकास करुन प्राप्त होणारा निधी ठाणे रेल्वेस्थानकाच्या विकासासाठी वापरण्याचा प्रस्ताव मुंबई रेल्वे विकास कॉर्पोशन लि. यांच्या मार्फत तयार करण्यात आला होता.

ठाणे महापालिकेमार्फत सदर प्रकल्पाबाबत आराखडे तयार करण्यात आले असून त्याचा अंदाजखर्च रक्कम **रु.२६६ कोटी** इतका आहे. ठाणे रेल्वे स्थानकाच्या पुनर्विकासाच्या कामामध्ये ठाणे महापालिकेमार्फत प्रस्तावित योजना समाविष्ट करण्याबाबत रेल्वेकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

### २.७ ग्रेड सेपरेटर

तीन हात नाका येथील वाहतूक कोंडीमुळे होणा-या त्रासावर उपाय म्हणून ग्रेड सेपरेटर बांधून वाहतुक सुरळीत करण्याचे प्रयोजन असून हा प्रकल्प ठाणे स्मार्ट सिटीच्या तरतूदीतून करण्याचे नियोजन आहे. तसेच या प्रकल्पासाठी केंद्र शासन व महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांच्याकडूनही अनुदान प्राप्त करण्याचे प्रयत्न सुरु आहे.

## ३. भवन प्रकल्प

### ३.१ शिवसेनाप्रमुख मा. बाळासाहेब ठाकरे स्मारक

सदर प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असून सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे. यासाठी **रु.५ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

### ३.२ बाळकुम तरणतलाव

बाळकुम परिसरातील ॲमिनिटी प्लॉटवर तरण तलाव बांधण्याचे काम सुरु असून सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात **रु.३कोटी** तरतूद करण्यात आली आहे.

### ३.३ महात्मा फुले मार्केटचा पुनर्विकास

महात्मा फुले मार्केट परिसरातील वाहतूक कोंडी व त्या ठिकाणी असणारी दुर्गंधी तसेच दाटीवाटीने असलेली मसाल्याची दुकाने यामुळे सर्व परिसर प्रदूषित झालेला आहे. त्या ठिकाणी असलेल्या मार्केटचा पुनर्विकास करणे क्रमप्राप्त झालेले आहे. या मार्केटचा पुनर्विकास करताना सद्यस्थितीतील व्यापा-यांना समावून घेण्यात येईल व उरलेल्या जागेचा महापालिकेच्या इतर प्रयोजनांसाठी वापर करण्यात येईल. या कामासाठी **रु.३ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

### ३.४ प्रभाग कार्यालय बांधकाम

मुंब्रा व दिवा येथील वाढती लोकसंख्या व अस्तित्वातील प्रभाग कार्यालयामधील अपुरी जागा यांचा विचार करता नवीन प्रभाग कार्यालय बांधणे गरजेचे असल्याने त्यासाठी **रु.४ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

### ३.५ दवाखाने बांधकाम

ठाणे महानगरपालिकेची लोकसंख्या विचारात घेता नवीन दवाखाने बांधणे आवश्यक असल्याने जागेच्या उलब्धतेनुसार दवाखाने बांधणे प्रस्तावित आहे. त्यासाठी अर्थसंकल्पात **रु.१० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

### ३.६ मिनी मॉल व मार्केट

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात तीन हात नाक्याजवळील इटर्निटी मॉल नजीक महापालिका पुनर्वसन लेआऊट मधील विस्थापित गाळे सद्यस्थितीत रुंदीकरण मोहिमेत बाधीत होत असून सदर ठिकाणी पुनर्वसित गाळयांचे निष्कासन करुन पुन्हा याच जागी गाळेधारकांना मिनी मॉल बांधण्याचे नियोजन आहे.

वर्तकनगर प्रभाग समितीमध्ये वर्तकनगर म्हाडा व रेप्टाकॉस येथे पार्कींग व्यवस्थेसह मिनी मॉल तयार करण्यात येणार आहे. तसेच कापूरबावडी नळपाडा येथे मिनी मॉल बांधण्याचे नियोजन आहे.

सन २०१७-१८ मध्ये या कामाकरिता मिनी मॉल बांधणे या लेखाशिर्षाअंतर्गत **रु.२ कोटी** व मार्केट बांधणे या लेखाशीर्षांतर्गत **रु.५ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात येत आहे.

### ३.७ क्लॉक टॉवर

ठाणे शहरामध्ये लंडन शहराच्या धर्तीवर मुख्य ठिकाणी क्लॉक टॉवर उभारण्याचे प्रस्तावित आहे.

### ३.८ राष्ट्रध्वज स्तंभ

ठाणे शहरातील मोक्याच्या ठिकाणी मासुंदा तलाव, उपवन तलाव व माजिवडा जंक्शन किंवा अन्य ठिकाणी भव्य उंचीचा राष्ट्रध्वज स्तंभ उभारण्याचे प्रस्तावित आहे.

## ४. खाडी व चौपाटी विकास

### ४.१ गायमुख रेती बंदर खाडी विकास व सुशोभिकरण

घोडबंदर रोड परिसरात गायमुख खाडीजवळील जागा पर्यटनाला चालना देणारे स्थळ म्हणून विकसित करण्याकरिता मार्च २०१६ मध्ये रु.६.५० कोटी एवढा निधी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास वर्ग करण्यात आला असून उर्वरित निधी मार्च २०१७ मध्ये वर्ग करण्यात येणार आहे. प्रथम टप्प्यातील काम मार्च २०१७ मध्ये होईल व द्वितीय टप्प्यातील कामासाठी सन २०१७-१८ मध्ये गायमुख येथे विसर्जन घाट विकसित करणे या लेखार्शीतंर्गत **रु.१० कोटी** तरतूद करण्यात येत आहे.

### ४.२ पारसिक चौपाटी

ठाणे महानगरपालिकेला ३२ कि.मी. लांबीचा खाडी किनारा लाभला असून या खाडी किना-याचे संवर्धन व जतन करण्यासाठी ठाणे महानगरपालिकेतर्फे वॉटरफ्रंट डेव्हलपमेंट मास्टर प्लॅन तयार करण्यात आला आहे. त्यामधील पारसिक रेतीबंदर येथे ४ कि.मी. लांबीची ४२ एकर जागेत सिंगापूर व साबरमतीच्या धर्तीवर चौपाटी

विकसित करण्यात येणार आहे.या कामाची रु.७५ कोटीची निविदा मागविण्यात आलेली आहे. सदर चौपाटीच्या जागेमध्ये ३०० अतिक्रमणे निष्काषित करुन त्या ३०० लोकांचे रेंटल हौसिंगमध्ये पुनर्वसन करण्यात आले आहे. तसेच तेथील व्यावसायिकांसाठी महापालिकेच्या मालकीच्या एक एकर जागेवर सुविधा विकसित करुन त्यांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे.

सदर कामाच्या आराखडयात दोन ठिकाणी विसर्जन घाट, मी. प्रोमिनेडस, ॲम्पी थिएटर, जेटी, जॉगिंग ट्रॅक, उद्याने, चिल्ड्रन प्ले एरिया, स्केटिंग एरिया, ओपन जिम एरिया, खेळाचे मैदान इत्यादी मनोरंजनात्मक सुविधेसह बैठक व्यवस्था, विद्युत दिवे, फुड-कोर्ट, वाहनतळे, प्रसाधनगृहे उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे.

सदर कामाकरीता सन २०१७-१८ मध्ये पारसिक रेतीबंदर येथे चौपाटी विकसित करणे या लेखाशिर्षाअंतर्गत **रु.५० कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात येत आहे. या कामासाठी जिल्हाधिकारी, ठाणे यांनी सन २०१६-१७ मध्ये **रु.२ कोटी** अनुदान दिलेले असून सन २०१७-१८ मध्ये जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून वाढीव अनुदान मिळणार आहे.

### ४.३ गायमुख, नागलाबंदर, कोलशेत व बाळकुम चौपाटी विकास

गायमुख, नागलाबंदर, कोलशेत व बाळकुम येथे चौपाटी विकसित करण्याचे नियोजन असून यासाठी वॉटर फ्रंट डेव्हलपमेंट व चौपाटी विकास या लेखाशीर्षांतर्गत सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात **रु.३० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

### ४.४ इनलँड वॉटर ट्रान्सपोर्ट

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात ३२ कि.मी. लांबीचा खाडी किनारा उपलब्ध असल्याने अंतर्गत जलवाहतुकीचा पर्याय उपलब्ध आहे. त्यासाठी केंद्र शासन व महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांच्या सहकार्याने इनलँड वॉटर ट्रान्सपोर्ट सुरु करण्याचे नियोजन आहे. त्यासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात **रु.९.५० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

प्रथम टप्प्यात वसई-मीराभाईंदर-ठाणे कोलशेत-घोडबंदर रोड साकेत-दिवा-भिवंडी-कल्याण हा २५ नॉटिकल मैल म्हणजे ४५ कि.मी. लांबीचा ७० मिनिटांचा जलवाहतुक मार्ग प्रस्तावित असून त्याचा प्रकल्प खर्च रु.२८७.९५ कोटी इतका आहे. त्यानंतर द्वितीय टप्प्यात साकेत ते बेलापूर रोड येथे इनलँड वॉटर ट्रान्सपोर्ट सुरु करण्याचे नियोजन आहे.

## २. पाणी पुरवठा विभाग

ठाणे महानगरपालिकेमार्फत सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात पाणी पुरवठयाला विशेष महत्व देण्यात आले असून, मध्यंतरीच्या कालावधीमध्ये मा.उच्च न्यायालयाने ठाणे महानगरपालिकेस दिलेल्या निर्देशानुसार शहरातील पाणी पुरवठयाचा असमतोल दूर करणे व संपूर्ण महापालिका क्षेत्रामध्ये पाण्याचे योग्य वितरण करण्याकरिता पुढील महत्वाकांक्षी प्रकल्पांचे नियोजन करण्यात आले आहे.

### २.१ पाणी पुरवठा विस्तार व मजबुतीकरण

१. पुर्व विभागातील कळवा प्रभाग समिती अंतर्गत पाणी पुरवठा योजनेचे रिमॉडेलिंग करण्याचे काम सुरु असून सन २०१८ मध्ये पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

या प्रकल्पाअंतर्गत २ द.ल.लि. क्षमतेचे तीन जलकुंभ व २.५ द.ल.लि. क्षमतेचे तीन जलकुंभ बांधणे व या जलकुंभासाठी वहन व्यवस्था करणे इत्यादी कामे करण्याचे प्रस्तावित आहे.

२. ठाणे शहरात वागळे येथील जॉन्सन जलकुंभाच्या आवारात २.५ द.ल.लि. क्षमतेचा, सिध्दाचल फेज ६ समोर १.५ द.ल.लि. क्षमतेचा जलकुंभ व ०.५ द.ल.लि. क्षमतेचा संप बांधणे, घोडबंदर रोड, आनंदनगर येथे २ द.ल.लि. क्षमतेचा जलकुंभ व ०.५ द.ल.लि. क्षमतेचा संप बांधणे, बाळकुम व माजिवडा येथील बांधण्यात आलेले जलकुंभ कार्यान्वित करण्यासाठी वहन व वितरण व्यवस्था करणे,आकृती हबटाऊन येथे विकासकामार्फत बांधण्यात आलेला ३ द.ल.लि क्षमतेचा जलकुंभ कार्यान्वित करणेसाठी वहन व वितरण व्यवस्था करणे व रायलादेवी प्रभाग समिती अंतर्गत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जागेवर जलकुंभ, संप व पंप हाऊस

तसेच वहन, वितरण व पंपींग मशिनरी बसविण्याबाबत प्रस्तावित आहे.

३. ठाणे शहरातील घोडबंदर परिसरात २ द.ल.लि. क्षमतेचे ३ जलकुंभ बांधणे, संप व पंप हाऊस बांधणे आणि वहन व वितरण व्यवस्था करण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी अर्थसंकल्पात पाणी पुरवठा व वितरण व्यवस्था व जलकुंभ बांधणे या लेखाशीर्षांतर्गत पुरेशी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**२.२ शाई धरण प्रकल्प**

ठाणे महानगरपालिकेकरिता शासनाने सन २००५ मध्ये शाई धरण विकसित करण्यास मान्यता दिली होती. सदरचा प्रकल्प MMRDA मार्फत राबविण्यात येणार होता. मात्र सदर प्रकल्पास आवश्यक गती मिळू शकली नाही. भविष्यातील पाणी पुरवठयाचा स्त्रोत म्हणून सदरचा प्रकल्प ठाणे महापालिका स्वतः अथवा इतर महापालिका व नगरपालिका यांच्या मदतीने राबविण्याचा प्रयत्न करणार आहे. त्यासाठी या अर्थसंकल्पात **रु. २५ कोटी** तरतूद करण्यात आलेली आहे. याबाबत सविस्तर आराखडे शासनाच्या परवानग्या इत्यादी प्राप्त झाल्यावर एकूण खर्चाचा अंदाज आल्यावर पुढील नियोजन करण्यात येईल.

**२.३ ठाणे शहर पाणी वितरण व्यवस्थेचे रिमॉडेलिंग करणे**

ठाणे महानगरपालिकेने पाणी वितरण व्यवस्थेचे रिमॉडेलिंग करण्याचा प्रकल्प तयार केला असून, याअंतर्गत ७९३ कि.मी. लांबीची वहन व्यवस्था ६८ दशलक्ष लिटरचे ४४ जलकुंभ बांधण्यात येणार आहेत. सदरचा प्रकल्प हा तीन वर्ष कालावधीत राबविण्याचा महापालिकेचा प्रयत्न असून सदर प्रकल्पामुळे महापालिका हद्दीमध्ये पाणी वितरणाचा असमतोल दूर होण्यास मदत होणार आहे. सदरचा प्रकल्प हा तीन वर्षाचे नियोजन याचा खर्च पाणी पुरवठा विस्तार व मजबुतीकरण या लेखाशिर्षांतर्गत तरतुदीमधून प्रस्तावित आहे.

**२.४ ठाणे महापालिका हद्दीतील नागरिकांसाठी २४x७ पाणी पुरवठा योजना**

ठाणे महानगरपालिकेमार्फत सद्यस्थितीतील २३.५० लक्ष लोकसंख्येस एकूण ४८० द.लि.लि प्रतिदिन एवढा पाणी पुरवठा होतो.

सदरचा पाणी पुरवठा हा महापालिका हद्दीमध्ये विविध भागात सरासरी २ ते ६ तास एवढया कालावधीमध्ये होत आहे. ठाणे महानगरपालिकेमार्फत यावर्षी सर्व नागरिकांना २४ तास पाणी उपलब्ध होईल अशी २४x७ पाणी पुरवठा योजना प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर प्रकल्प ५ वर्षात पूर्ण करावयाचा असून एकूण २० वर्ष कालावधीसाठी देखभाल दुरुस्तीसह राबविण्याचा मानस आहे. अस्तित्वातील व नव्याने अंथरण्यात येणा-या वाहिन्यांचा लेखाजोखा करुन गळती संशोधन व गळती बंद करणे, जलमापकाचे वाचन व त्याचे देयक वितरीत करुन प्रभावीपणे देयकांची वसुली इत्यादी बाबींचा अंतर्भाव असणार आहे.

सदर प्रकल्पाच्या पूर्णत्वानंतर नागरिकांना २४ तास शुध्द, स्वच्छ पाणी भारतीय मानकाप्रमाणे उपलब्ध होईल व वाया जाणा-या पाण्याची बचत होऊन सुयोग्य पाणी नियोजन होऊन नागरिकांना अपेक्षित सेवा मिळू शकेल. यासाठी **रु.५० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

## २.५ उथळसर प्रभाग समितीमध्ये २४x७ पाणी योजना राबविणे

ठाणे महानगरपालिकेमार्फत यापूर्वी मा.महासभेने दिलेल्या मंजुरीनुसार उथळसर प्रभाग समितीकरीता प्रायोगिक तत्वावर (Demo Zone) २४x७ पाणी पुरवठा योजना राबविण्याचे नियोजन केले असून, या योजनेअंतर्गत सिध्देश्वर जलकुंभ, जेल जलकुंभ, ऋतुपार्क जलकुंभ व रुस्तमजी जलकुंभाखालील वितरण क्षेत्रात २४x७ पाणी पुरवठा राबविण्यात येणार असून, सदरची योजना ७ वर्षे कालावधीसाठी देखभाल दुरुस्तीसह करण्याचे नियोजन आहे. सदरच्या योजनेचा लाभ हा महानगरपालिका हद्दीतील सुमारे ३ लाख नागरिकांना होणार आहे. यासाठी सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात २४x७ पाणी पुरवठा योजना या लेखाशीर्षांतर्गत तरतूद करण्यात आली आहे.

## २.६. पाणी लेखापरीक्षण व स्काडाद्वारे जलनियोजन

ठाणे महानगरपालिका हद्दीत नागरिकांना एकूण ४८० दशलक्ष लिटर प्रतिदिन पाणी पुरवठा एकूण ५५ जलकुंभाद्वारे वितरीत करण्यात येत आहे. मात्र ब-याच वेळा विविध विभागातील

जलकुंभाची उंची व जमिनीचा उंच सखलपणा यामुळे दैनंदिन जलकुंभामध्ये पोहोचणाऱ्या पाण्यामध्ये असमतोल आहे. सदरची बाब दूर करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत पाणी लेखापरीक्षण व स्काडा योजनेद्वारे पाणी नियोजन करण्याचा प्रकल्प पुढील दोन वर्षात पूर्ण करुन पुढील ५ वर्षे कालावधीसाठी देखभाल दुरुस्तीसह चालविण्याचे नियोजन असून यासाठी सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात **रु.५कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

## २.७ स्मार्ट मिटरींग

ठाणे महानगरपालिका हद्दीमध्ये उथळसर प्रभाग समितीमध्ये प्रायोगिक तत्वावर २४x७ योजना राबविण्यात येणार असून, या अंतर्गत ग्राहकांच्या नळ संयोजनावर जलमापके बसविण्यात येणार आहेत. त्या व्यतिरिक्त उर्वरीत संपूर्ण ठाणे महानगरपालिका हद्दीमधील संयोजनावर स्मार्ट मीटर बसविण्यात येणार आहेत. सदरच्या प्रकल्पांतर्गत एकूण सुमारे १,१५,००० एवढे मीटर बसवून त्यांच्या ठराविक कालावधीनंतर नोंदी घेण्यात येतील व सदरच्या नोंदीनुसार ग्राहकांना पाण्याचे देयक अदा केले जाईल. यामुळे नागरिकांना त्यांनी वापरलेल्या पाण्याच्या (Pay as you use) प्रमाणात देयक मिळेल व महापालिकेच्या उत्पन्नात सुध्दा वाढ होईल. जलमापके बसविण्याच्या खर्चापैकी ५०% खर्च नागरिकांकडून चार सुलभ हप्त्यामध्ये वसूल करण्याचा प्रस्ताव आहे. ५०% खर्चाचा बोजा महापालिका स्वीकारेल असे प्रस्तावित आहे. या प्रकल्पासाठी यावर्षी **रु.२० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

## २.८ ऊर्जा लेखापरीक्षण व पुनर्वसन कार्यक्रम

ठाणे महानरगपालिका हद्दीमध्ये पाणी पुरवठा करताना विविध ठिकाणी संप व पंपहाऊसद्वारे पाणी जलकुंभामध्ये उचलले जाते. सदर पाणी उचलताना पंपींग मशिनरी व इतर अनुषंगिक विद्युत साधने वापरावी लागतात. सदर विद्युत साधनांची कालमानापरत्वे कार्यक्षमता कमी होते. परिणामी महानगरपालिकेस अवाजवी विद्युत देयकांचा बोजा सहन करावा लागतो. या बाबींचा विचार करुन महापालिकेमार्फत १७ संप व पंप हाऊसवरील विद्युत उपकरणांचे लेखापरीक्षण करुन त्याचा नुतनीकरण कार्यक्रम राबविण्यात येणार

आहे. सदरचा नुतनीकरण कार्यक्रम हा दोन वर्षे कालावधीत पुर्ण होईल व तद्नंतर त्याची देखभाल दुरुस्ती ७ वर्षे कालावधीपर्यंत करण्यात येणार आहे. सदरचा ऊर्जा लेखापरीक्षण कार्यक्रम हा ESCO मॉडेलद्वारे अथवा EPC करारानुसार राबविण्याचा महानगरपालिकेचा मानस असून सदरचा कार्यक्रम राबविल्यामुळे ऊर्जा बचत होऊन महानगरपालिकेमार्फत होणा-या विद्युत खर्चात बचत होणार आहे. यासाठी यावर्षी **रु.४ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

## ३. मलनिःसारण विभाग

### ३.१ भुयारी गटार योजना

जवाहरलाल नेहरू नागरी पुनर्रूत्थान अभियानाअंतर्गत भुयारी गटार योजना टप्पा क्रमांक १ चे काम पूर्णत्वास आलेले आहे. १२० द.ल.ली. क्षमतेचे मलप्रक्रिया केंद्र व ७ मलउदंचन केंद्रे आधीच कार्यान्वीत केली असल्याने नौपाडा, कोपरी, उथळसर, वागळे इस्टेट, रायलादेवी, लोकमान्यनगर- सावरकरनगर व वर्तकनगर या प्रभाग समिती क्षेत्रातील सांडपाणी मुख्य मलनिःसारण योजनेस जोडले जाणार आहे.

भुयारी गटार योजना टप्पा क्र.२ अंतर्गत कळवा व घोडबंदर रोड परिसर मानपाडयापर्यंत मलप्रक्रिया केंद्र व मलउदंचन केंद्राची कामे जागे अभावी करता आली नव्हती. जागेसाठी प्रयत्न करुन ४ मलप्रक्रिया केंद्रे व ७ उदंचन केंद्रांचे कामे सुरू करण्यात आलेली असून या आर्थिक वर्षात ही कामे पूर्ण करण्याचे नियोजन असून मलवाहिन्यांची कामे तसेच अडचणीच्या ठिकाणी ट्रेंचलेस पध्दतीने मलवाहिनी टाकण्याची कामे प्रगतीपथावर असून ही कामे सुध्दा पुढील आर्थिक वर्षात पूर्ण करण्याचा मनोदय आहे.

भुयारी गटार योजना टप्पा क्रमांक ३ अंतर्गत (मुंब्रा, कौसा) मलप्रक्रिया केंद्र व मलउदंचन केंद्राची कामे पूर्ण करुन मलवाहिन्याची ८० टक्के कामे पूर्ण झालेली आहेत. मलवाहिन्यांचे उर्वरीत २० टक्के काम तसेच अडचणीच्या ठिकाणी ट्रेंचलेसने मलवाहिनी टाकण्याच्या कामासह ४ छोटया स्वरूपाची मलउदंचन केंद्राची कामे पुढील आर्थिक वर्षात पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे.

याशिवाय घोडबंदर व दिवा भागात जलदगतीने वाढत असलेल्या लोकवस्तीच्या दृष्टीकोनातून या भागात सुमारे १३० द.ल.लि क्षमतेचा भुयारी गटार योजना टप्पा क्र.४ प्रकल्प विचाराधीन असून त्याबाबत केंद्र व राज्य स्तरावर आर्थिक तरतुदीकरिता पाठपुरावा सुरु आहे. या सर्व योजनांसाठी सन २०१७-१८ मध्ये **रु.८० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

## ३.२ सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा पुनर्वापर करणे

महानगरपालिका क्षेत्रात ठिकठिकाणी छोटया स्वरूपाचे मलप्रक्रिया केंद्रे बांधून रोजच्या सांडपाण्यावर टर्शरी ट्रिटमेंट करुन निर्जंतुक केलेल्या पाण्याचा वापर दैनंदिन वापरामध्ये उदा. बगीचा, कार वॉशिंग, फ्लशिंग, इ. कामासाठी प्रायोगिक तत्वावर करण्याचे महापालिकेच्या विचारधीन असून त्याकरिता पी.पी.पी अथवा बी.ओ.टी. तत्वावर २ ते ५ द.ल.लि. क्षमतेचे टर्शरी टिट्रमेंट प्लान्ट बांधण्याकरिता देकार मागविण्यात आले आहेत. तसेच कोपरी येथील १२०द.ल.लि. क्षमतेच्या मलप्रक्रिया केंद्रात सुध्दा लहान स्वरूपाचा टर्शरी ट्रिटमेंट प्लान्ट बांधून देखभाल व दुरूस्तीसह पी.पी.पी अथवा बी.ओ.टी. तत्वावर बांधणे व चालविण्याकरिता देकार मागविण्यात येत असून या दोन्ही योजना पुढील आर्थिक वर्षात राबविण्यात येणार आहे. यासाठी या अर्थसंकल्पात **रु.५० लक्ष** तरतूद प्रस्तावित आहे.

## ३.३ दैनंदिन देखभाल दुरूस्तीकरिता प्रभावी उपाययोजना करणे

ठाणे महापालिकेकडे दररोज सरासरी २५ ते ३० ड्रेनेज चोकअपच्या तक्रारी प्राप्त होतात. या तक्रारीचे तात्पुरते निराकरण करण्याच्या दृष्टीने विभागाकडून समिती निहाय देखभाल दुरूस्तीकरिता ठेकेदाराची नियुक्ती करण्यात येत असून चोकअप काढण्याकरीता आधुनिक तंत्रज्ञान असलेली एकूण ४ ड्रेनेज रिसायकलर मशीन्स उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. पुढील आर्थिक वर्षात सुध्दा २ रिसायकलर मशिन घेण्यात येणार असून त्यामुळे ड्रेनेज चोकअपच्या तक्रारीवर वेळीच निराकरण व उपाययोजना करण्याचे काम त्वरीत होणार आहे. यासाठी **रु.१० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

### ३.४ मलवाहिन्या व हाऊस कनेक्शन

भुयारी गटार योजनेची कामे पूर्ण होत असून मलवाहिन्यांचे हाऊस टू हाऊस कनेक्शन करणे बाकी असून शहरातील सर्व मलवाहिन्या मुख्य मलवाहिनीला जोडणेसाठी सन २०१७-१८ मध्ये प्रभागात मलवाहिन्या टाकणे व हाऊस कनेक्शन या लेखाशीर्षांतर्गत **रु.२० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

### ३.५ महिला स्वच्छतागृह

सन २०१७-१८ मध्ये महिला स्वच्छतागृह बांधण्यासाठी **रु.३कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

## ४. शहर विकास विभाग

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील बहुतांशी भांडवली कामे ही महापालिका निधीमधून खर्च करण्यात येत होती. त्यामुळे पायाभूत सुविधा तसेच अस्तित्वातील सुविधांची निगा व देखभाल वगळता भांडवली सुविधांचा विकास व इतर नविन सुविधा निर्माण करण्याकरीता निधी उपलब्ध करण्यासाठी महापालिकेवर बंधन येत असे. मागील दोन वर्षापासून अशा सुविधांचा विकास शहर विकास विभागामार्फत समावेशक आरक्षण वा बांधीव सुविधांचा विकास कंन्स्ट्रक्शन टी.डी.आर.च्या मोबदल्याच्या बदल्यात करण्यावर भर देण्यात आला. तसेच राज्य शासनाने दिनांक २९ जानेवारी, २०१६ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील महानगरपालिकांमध्ये विकास हक्क हस्तांतरणाकरिता नवीन नियमावली लागू केली असून मुल्याधरित विकास हक्क हस्तांरणाच्या माध्यमातून सुविधा विकसित करण्याबाबत नियम मंजूर करण्यात आले आहेत. सदर नियमानुसार समावेशक आरक्षण विकसनाकरिता शासनाने २ मे २०१६ रोजी सुधारित नियमावली मंजूर केली असून, उक्त धोरणानुसार ठाणे महानगरपालिकेने सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात सुरु असलेले आणि सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात ३७ प्रस्तावित विकसन प्रकल्प कन्स्ट्रक्शन टिडीआरच्या माध्यमातून विकसन केल्यामुळे महापालिकेस अंदाजे रु.४२१.४६ कोटी तसेच समावेशक

आरक्षणाच्या विकसनामधुन अंदाजे रु.७६.१२ कोटीच्या म्हणजेच अंदाजे **रु.५०० कोटी** किमतीच्या सुविधा विनामूल्य हस्तांतरीत होऊ शकतील. याच मार्गाने पुढील ५ वर्षात महापालिकेकडे असलेल्या बांधकाम योग्य सुविधा भूखंड तसेच आरक्षित भूखंडाच्या विकसनाचे ध्येय ठेवण्यात आले आहे.

## ४.१ पायाभुत सुविधांच्या विकसनाबाबत

### ४.१.१ रस्ते

ठाणे महानगरपालिकेने सन २०१६-१७ या वर्षामध्ये रस्ता रुंदीकरण करुन रस्ते तयार करण्याचे काम सुरु केले असुन त्याकरीता एकूण ७६.५० हेक्टर क्षेत्राची जमीन संपादित केली आहे. त्याचे बाजारभावानूसार मूल्य २२०० कोटी इतके आहे. विकास योजनाअंतर्गत रस्ते विकास अंमलबजावणीचा दर हा सन २०१५ मध्ये २६.६८% होता तो या दोन वर्षात ५६.९५% इतका मिळविण्यास महापालिका यशस्वी ठरली आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात सन २०१७ - १८ पासुन पंचवार्षिक नियोजनाचे एकूण ५४.८८ कि. मी. लांबीच्या नवीन रस्त्यांकरिता १६८ हेक्टर जमिन संपादित करण्याचा मनोदय आहे. उक्त रस्त्याखालील जागा संपादनाचे काम TDR किंवा DR चे माध्यमातुन करण्यात येणार आहे. पुढील ५ वर्षात विकास योजनेमधील रस्ते विकसनाचा दर ९०% पर्यंत गाठण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. सन २०१६-१७ मध्ये कंन्स्ट्रशन टी डी. आर. च्या माध्यमातुन एकुण ५ मुख्य रस्ते विकसनाची कामे सुरु असुन त्यामुळे ठाणे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पातील रुपये ७८.४७ कोटीची बचत होणार आहे. सन २०१७-१८ या वर्षात नव्याने टी. डी. आर. च्या माध्यमातुन एकुण ७ रत्यांच्या विकसनाची कामे प्रस्तावित असुन ठाणे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये रुपये ११३ कोटीची बचत होणार आहे. प्रतिवर्ष १०% याप्रमाणे पुढील ५ वर्षात ९०% विकास आराखडयाच्या अंमलबजावणीचा वेग राखण्याचे उद्दिष्ट आहे.

### ४.१.२ टाऊन सेंटर

समावेशक आरक्षणा अंतर्गत टाऊन सेंटरच्या दोन इमारतींचे काम सुरु असून त्यापैकी एक इमारत तळ अधिक पाच मजले (७३३३ चौ. मी.) आणि दुसरी इमारत तळ अधिक बारा मजले (२४४७७ चौ. मी.) ची बांधकामे सुरु असून ती येत्या आर्थिक वर्षात पूर्ण होणार आहेत. सदर बांधकामापोटी येणाऱ्या एकूण खर्च **रु. ४३ कोटी** बचत समावेशक आरक्षणामुळे होणार आहे.

### ४.१.३ पार्किंग सुविधा विकसन

ज्युपिटर हॉस्पिटल शेजारी महानगरपालिकेच्या ताब्यातील ११३५७.२३ चौ.मी. सुविधा भूखंडावर १७०० चार चाकी वाहनांसाठी पार्किंग प्लाझा विकसित करण्याचे काम सुरु असुन पुढील अर्थसंकल्पीय वर्षात सदर पार्किंग सुविधा टप्प्या टप्प्याने नागरीकांस उपलब्ध करुन देण्यात येईल.

कशिश पार्क येथील सुविधा भूखंडावर बांधीव सुविधेतंर्गत विनामुल्य पार्किंग प्लाझा आणि विविध कार्यालयाकरीता बांधकाम सुरु असुन सदर पार्किंग व कार्यालय येत्या आर्थिक वर्षात अंशतः उपलब्ध होणार आहे. या विकसनामुळे एकूण रु. २८ कोटी बचत होणार आहे.

वरील पायाभूत सुविधांच्या विकसनामुळे एकूण अंदाजे १८४ कोटी रुपये किमतीच्या सुविधा महापालिकेस उपलब्ध होतील.

### ४.२ आरोग्य विषयक सुविधांचे विकसन

सन २०१६ - १७ या आर्थिक वर्षात महापालिकेच्या शहर विकास विभागामार्फत प्रस्तावित केलेल्या आरोग्य विषयक सुविधांच्या विकसनाची स्थिती पुढील प्रमाणे

### ४.२.१ टाटा कॅन्सर रुग्णालय

ठाणे महानगरपालिकेमार्फत टाटा कॅन्सर रुग्णालयास कोलशेत रोड येथे प्रस्तावित केले होते. परंतु विकासकाने सुविधा भुखंडाबाबत मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्यामुळे उक्त ठिकाणी टाटा कॅन्सर रुग्णालयास जागा मिळण्यास विलंब होत असल्याने कावेसर येथे नव्याने प्रस्तुत सुविधेकरीता आरक्षण

प्रस्तावित केले असुन मा. सर्वसाधारण सभेने त्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार आरक्षण अंतिम झाल्यावर टी.डी.आर. च्या माध्यमातुन वा समावेशक आरक्षणच्या माध्यमातून टाटा कॅन्सर रुग्णालयास इमारत उपलब्ध करुन देणे प्रस्तावित आहे.

**४.२.२ संकरा नेत्रालय**

ठाणे महानगरपालिकेस कोलशेत रोडवरील प्राप्त हॉस्पिटल आरक्षणापैकी ८४००चौ. मी. क्षेत्र नेत्रालय व रिसर्च सेंटरकरिता संकरा नेत्रालय या संस्थेस देण्याकरीता ठाणे महानगरपालिकेने सदर संस्थेसोबत Memorandom of Understanding केले असून शासनाच्या मान्यतेनंतर नाममात्र लीज दराने भूखंड उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सदर भूखंडावर संकरा नेत्रालयाचे काम दोन वर्षात पूर्ण होऊन नेत्रालय कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे.

**४.२.३ ज्येष्ठांचे नंदनवन (वृध्दाश्रम) (Elder's Paradise)**

पोखरण रोड नं. २ लगत व्होल्टास कंपनीच्या जागेवर प्राप्त होणा-या १२०० चौ. मी. सुविधा भूखंडावर बांधिव सुविधेतंर्गत स्टेट ऑफ आर्ट सर्व सुविधांसहीत ज्येष्ठांचे नंदनवन (वृध्दाश्रम) इमारतीचे बांधकाम करण्याचे आराखडे अंतिम टप्यात असुन सन २०१७-१८ मध्ये सदर बांधकाम पुर्ण करुन त्याचे परिचालन नामांकित अशासकीय सामाजिक संस्थेमार्फत सी.एस.आर. निधी अंतर्गत करण्याचे प्रस्तावित आहे.

**४.२.४ मेडीटेशन व होलीस्टीक सेंटर**

घोडबंदर रोड येथील विजय विलास गृहनिर्माण प्रकल्पातून प्राप्त १५२० चौ.मी. क्षेत्राच्या सुविधा भूखंडावर होलीस्टीक सेंटरच्या विकसनाचे काम सुरु असुन, सदर संस्थेचे परिचालन नामांकित आंतरराष्ट्रीय सेवाभावी सामाजिक संस्थेमार्फत करण्याचे प्रस्तावित आहे.

**४.२.५ मॅटर्निटी होम आरक्षण समावेशक आरक्षणा अंतर्गत विकसनाबाबत**

मौजे वडवली येथील मॅटर्निटी होम आरक्षणातून समावेशक आरक्षणा अंतर्गत तळ अधिक ४ मजल्याची सुमारे १८४५.३६ चौ. मी.

क्षेत्राची इमारत महापालिकेस उपलब्ध होत असून त्यामध्ये मॅटर्निटी सेंटर या आर्थिक वर्षात सुरु होत आहे.

### ४.२.६ श्रीनगर येथील मॅटर्निटी होम आरक्षणातून समावेशक आरक्षणा अंतर्गत विकसन

श्रीनगर येथील मॅटर्निटी होम आरक्षण समावेशक आरक्षण किंवा बांधीव सुविधे अंतर्गत विकसन करून घेण्यात येत असून, उक्त इमारतीचा अंदाजित खर्च रु. ३.५० कोटी आहे. मॅटर्निटी होम आरक्षणापैकी तळ अधिक ६ मजल्याची इमारत पुर्णत्वास आली असुन, सन २०१७-१८ मध्ये उक्त मॅटर्निटी सेंटर सुरु करण्याचा मानस आहे.

### ४.२.७ ई. एन. टी. हॉस्पिटल

मुलुंड चेकनाका येथील मॉडेला मिल मधील १७०० चौ. मी. क्षेत्राच्या सुविधा भूखंडावर आंतरराष्ट्रीय प्रतीचे ई. एन. टी. हॉस्पिटल उभारण्याकरीता येत्या आर्थिक वर्षात देकार मागविण्यात येत असून उक्त सुविधा पुढील दोन वर्षात उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

### ४.३. आरोग्य संवर्धन व मनोरंजनाकरीता सार्वजनिक उद्यानांचे विकसन

ठाणे हे ५०टक्के क्षेत्र हरित असले तरी झपाट्याने होणाऱ्या नागरिकरणामुळे शहरात हरीत जागा निर्माण करणे आवश्यक झाले आहे. त्या अनुषंगाने शहरातील मोठया प्रमाणावर निर्माण होणा-या रहिवाशी विभागामध्ये विविध ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाची हरित उद्याने विकसित करण्याचा निर्णय घेणेत आला आहे.

### ४.३.१ बाळकुम-कोलशेत रोड येथे सेंट्रल पार्क विकसित करणे

बायर इंडिया कंपनीमधील प्राप्त सुविधा भूखंडापैकी ७६००० चौ. मी. क्षेत्रफळावर "सेंट्रलपार्क" विकसित करण्याचे काम प्रगती प्रथावर असुन त्यापैकी पहिल्या टप्यातील काम पुर्णत्वास आले आहे. सदर विकसनापोटी येणारा खर्च रु.५०.९७ कोटीच्या बांधीव सुविधे अंतर्गत बांधकाम केल्यामुळे बचत होणार आहे. सदर पार्क ऑक्टोबर, २०१८ मध्ये नागरीकांकरिता खुले करण्यात येणार आहे.

### ४.३.२ पोखरण रोड नं.२ येथे कम्युनिटी पार्कचा विकास

पोखरण रोड क्र. २ लगत आर. पी. जी. केबल कंपनीच्या प्राप्त भूखंडापैकी ८००० चौ. मी. क्षेत्रफळावर कम्युनिटी पार्क कंन्स्ट्रक्शन टिडीआर अंतर्गत विकसित करण्यात आले असून त्यापोटी येणारा खर्च रु. ४.५ कोटीची बचत होणार आहे. सदर पार्क हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे असून लवकरच नागरिकांकरीता खुले करण्यात येईल.

उक्त सुविधा भूखंड क्षेत्रात अस्तित्वातील झाडे शक्यतोवर तशीच ठेवून कम्युनिटी पार्क मध्ये बालकांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांना मनोरंजनाच्या सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत.

### ४.३.३ हिरानंदानी इस्टेट लगत बगीचाचे तलावासहीत विकसन (Southern Park)

बगीचा आरक्षण क्रमांक ९ चे तलावासह क्षेत्रफळ ५९००० चौ.मी. असून, त्यापैकी बगीच्याचे क्षेत्र ३५९०० चौ. मी. असून उर्वरित क्षेत्रात तलाव आहे. सदर आरक्षित क्षेत्र तसेच तलावाचे सुशोभीकरण विकास हक्क हस्तांतरण (टिडीआर) व्दारे खाजगी सहभागातून विकसन करण्याचे काम सुरु आहे. त्यापोटी येणा-या रु.१५.५० कोटीची बचत होणार आहे. सदर सुविधा ऑक्टोबर २०१८ पर्यंत पूर्ण होणार आहे.

### ४.३.४ ब्रम्हांड परिसरालगत पार्कचे विकसन (Northern Park)

ब्रम्हांड परिसरालगत पार्क आरक्षण क्र. ५ मधील ठाणे महानगरपालिकेस प्राप्त २२ एकर क्षेत्रावर नॉर्दन पार्कचे विकसन कन्स्ट्रक्शन टि.डी.आर मार्फत करण्याचे काम सुरु आहे. यासाठी रु.३१.७५ कोटी खर्च होणार असून मे २०१८ पर्यंत सदरचे विकसन पूर्ण होणार आहे.

### ४.३.५ अर्बन फॉरेस्ट्री

भिवंडी रोड येथील कलरकेम कंपनीमधील सुविधा भुखंडाच्या ३२००० चौ. मी. क्षेत्रावर अर्बन फॉरेस्ट्रीचे विकसन कंन्स्ट्रशन टि.डी.आर. चे माध्यमातून प्रस्तावित असून त्यामुळे महापालिकेची सुमारे २५ कोटी रुपये बचत होणार आहे. सदर उद्यानात विविध प्रकाराच्या झाडांचे रोपण करुन त्यांचे संवर्धन करण्यात येणार असून, सदर कामामधून जैव विविधता जोपासण्याचे काम होणार आहे. सदर

अर्बन फॉरेस्ट्री लगत नागरीकांच्या सोयीकरिता ८००० चौ.मी. क्षेत्रावर पार्किंगची व्यवस्था असून, सदर व्यवस्था अर्बन फॉरेस्ट्री तसेच विज्ञान केंद्रास उपयुक्त ठरेल.

### ४.३.६ सेक्टर क्र.५, मौजे कोलशेत येथील पार्क आरक्षण क्र.२ चे विकसन

पार्क आरक्षण क्र.२ चे मंजूर विकास आराखडयानुसार क्षेत्र (१.५ हेक्टर) १५००० चौ.मी. आहे. सदर पार्क आरक्षणाचा विकास हक्क हस्तांतरण (टी.डी.आर) द्वारे खाजगी सहभागातून विकास करण्याचे प्रस्तावित आहे.

सदर पार्क आरक्षण विकसित करताना अस्तित्वातील झाडांचे संवर्धन, चेनल ट्रेल, जॉगींग ट्रॅक, गार्डन पॅव्हेलियन, नेचर एज्युकेशन पॅव्हेलियन, एम्पी थिएटर इत्यादी बाबींचा समावेश करण्यात आला आहे. सदर कामी अंदाजे रु.५ कोटी खर्च इतका अपेक्षित आहे.

### ४.३.७ सेक्टर क्र.६, मौजे वडवली येथील पार्क आरक्षण क्र.४ व तलावाचे विकसन

पार्क आरक्षण क्र.४ व तलावाचे मंजूर विकास आराखडयानुसार पार्क आरक्षणाचे क्षेत्र ४०९८ चौ.मी. व तलावाचे क्षेत्र २८०० चौ.मी. आहे. सदर पार्क आरक्षण व तलावाचा विकास खाजगी करणातून करण्याचे प्रस्तावित आहे.

### ४.३.८ खेळांच्या मैदानाबाबत

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील खेळांचे मैदान आरक्षणाखालील एकूण १९३९९० चौ. मी. क्षेत्र ठाणे महानगरपालिकेच्या ताब्यात आले असून, त्यापैकी मौजे कौसा येथील ४५१५० चौ. मी. क्षेत्रावर स्टेडीयम विकसित करण्यात आले आहे. तसेच सेक्टर क्र. ५ व ६ अंतर्गत खेळाचे मैदान आरक्षणाखालील ९३५४९ चौ.मी. क्षेत्र ताब्यात आले आहे. येत्या आर्थिक वर्षात सेक्टर क्र. ४ व ६ मधील ६१०७२ चौ. मी. क्षेत्र ठाणे महानगरपालिकेच्या ताब्यात येणार आहे. महापालिका क्षेत्रातील सर्व खेळांच्या मैदानाच्या भूखंडावर नागरिकांस आवश्यक असलेल्या सुविधा उदा. टॉयलेट ब्लॉक, कपडे बदलण्याची जागा, दिवाबत्ती इत्यादी कामे या आर्थिक वर्षात पुर्ण करण्याचा मानस आहे.

## ४.४ सामाजिक सुविधांचे विकसन

### ४.४.१ प्रादेशिक विज्ञान केंद्र

भिवंडी रस्त्यालगत असलेल्या कलरकेम कंपनीमध्ये १७००० चौ. मी. सुविधा भूखंडावर प्रादेशिक विज्ञान केंद्र कन्स्ट्रक्शन टि.डी.आर अंतर्गत बांधण्याचे प्रस्तावित असून, यापूर्वी करण्यात आलेल्या ठाणे महानगरपालिका ठरावा नुसार राष्ट्रीय विज्ञान केंद्रासोबत एकत्रितरीत्या विकास करण्याकरिता त्यांचेकडे बांधकामाचे आराखडे व प्रकल्प अहवाल सादर करण्यात आला आहे. उक्त बांधकाम येत्या आर्थिक वर्षात सुरु करुन तीन वर्षाच्या कालावधीत टप्प्या टप्प्याने पुर्ण करण्याचा मनोदय आहे. सदर बांधीव सुविधे अंतर्गत विनामुल्य विकसन करुन मिळणार असल्यामुळे सुमारे ६० कोटी रुपयांची बचत होणार आहे.

### ४.४.२ जिम्नास्ट सेंटर आणि स्पोर्टस कॉम्पलेक्स

महानगरपालिकेमार्फत पोखरण क्र. २ येथील टाटा हौसिंग गृहनिर्माण प्रकल्पातील सुविधा भुखंडावर सुमारे २५ कोटी किंमतीचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे जिम्नास्ट सेंटर आणि स्पोर्टस कॉम्पलेक्स बांधीव सुविधेअंतर्गत विनामुल्य विकासकामार्फत विकसन करण्यात येणार असून, प्रकल्पाचा खर्च अंदाजे रु. २२ कोटी आहे. सदर विकसन टाटा हौसिंग यांचेमार्फत येत्या आर्थिक वर्षात सुरु करण्यात येणार आहे. सदर वास्तूमध्ये स्टिल्टमध्ये पार्किंग व्यवस्था, पहिल्या मजल्यावर, स्पोर्टस् अरेना, ३०० प्रेक्षकांना बसण्याची जागा, अद्ययावत व्यायाम शाळा, खेळाडूंसाठी स्वतंत्र हॉल व टॉयलेट ब्लॉक तसेच फिजीओथेरेपीस्ट रुम आणि खेळाचे सामान ठेवणेसाठी स्वतंत्र खोली असून, दुसऱ्या मजल्यावर योगा रुम, कॉन्फरन्स हॉल आणि व्ही. आय. पी. रुम ठेवण्यात येणार आहे.

### ४.४.३ महिला व्यायामशाळा, अभ्यासिका व वाचनालय

साकेत बाळकुम रस्त्यालगत प्राप्त ५८८ चौ. मी. सुविधा भूखंडावर महिला व्यायामशाळा, अभ्यासिका व वाचनालय बांधिव सुविधे अंतर्गत तळ अधिक तीन मजले बांधकाम विकसित करण्यात येणार आहे.

### ४.४.४ नोकरदार महिलांकरिता वसतीगृह

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात नोकरदार महिलांकरीता वसतिगृहाची अत्यंत आवश्यकता आहे. सिध्दाचल परिसरातील सुविधा भूखंडावर १४० नोकरदार महिलांकरिता कन्स्ट्रक्शन टिडीआर च्या माध्यमातून हॉस्टेल व्यवस्था तसेच पाळणाघर विकसित करण्याचे निश्चित केले असून, त्यासाठी रु. ५ कोटीची बचत होणार आहे. सदरचे काम येत्या आर्थिक वर्षात सुरु करणेत यईल. सदर विकसनाचे व्यवस्थापन व देखभाली करिता पीपीपी तत्वावर अथवा केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध झाल्यास सामाजिक संस्थेची नेमणूक करण्यात येईल.

### ४.४.५ मत्सालय विकसित करणे

कॅडबरी जंक्शन येथे सर्व्हिस रोड लगत प्राप्त होणाऱ्या १६००० चौ. मी. सुविधा भूखंडावर अत्याधुनिक मत्स्यालय कंन्ट्रक्शन टी. डी. आर. अंतर्गत बांधण्याचे प्रस्तावित आहे. सदर सुविधा भूखंड प्राप्त होणेस विलंब असल्याने उक्त प्रस्ताव पुढील आर्थिक वर्षात घेण्यात येईल.

### ४.४.६ पोखरण रस्ता क्र. १ येथे हॉकर झोन व पार्किंग विकसन

रॅप्टॅकॉस कंपनीमधील सुविधा भूखंडाच्या तळ मजल्यावर हॉकर झोन व त्यावरील मजल्यांवर ५० वाहनांकरिता पार्किंग व्यवस्था बांधीव सुविधेअंतर्गत संबधीत भूखंडधारकानी विकसन करण्यास नकार दिल्याने येत्या आर्थिक वर्षात महापालिकेच्या खर्चाने सदर वास्तुचे विकसन प्रस्तावित आहे.

### ४.४.७ वर्तकनगर नाका येथे दुचाकी वाहन पार्किंग व शॉपिंग प्लाझा विकसन

वर्तकनगर नाका येथील म्हाडाने महापालिकेस ताबा दिलेल्या भूखंडावरील अतिक्रमणे हटवून त्या जागी प्रकल्प बाधितांकरिता शॉपिंग प्लाझा विकसित करण्यात येणार असून, सदर शॉपिंग बेसमेंटमध्ये २५० टू व्हिलर पार्किंगची व्यवस्था करण्यात येणार आहे. सदर सुविधा शक्य झाल्यास खाजगी सहभागातून अथवा महापालिकेच्या निधीतून प्रस्तावित करण्यात येत आहे.

**४.४.८ जवाहरबाग स्मशानभूमी विस्तारीकरण व आधुनिकीकरण**

शहराचे मध्यभागी असलेली ही स्मशानभूमी वाढत्या लोकसंख्येला अपुरी पडत आहे. याकरीता जवाहरबाग स्मशानभूमीच्या विस्तारीकरण व आधुनिकीकरणाचे काम सी. एस. आर. च्या माध्यमातुन विकसित करण्यास सर्वसाधारण सभेने दिलेल्या मान्यतेनुसार सदरचे काम मे. सहियारा फाऊंडेशन यांनी सुरु केले आहे. सदर ठिकाणी अद्ययावत स्मशानभूमी येत्या आर्थिक वर्षात नागरिकांकरीता खुला करण्यात येईल.

**४.४.९** ठाणे महानगरपालिका हद्दीतील लोकसंख्या तसेच लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून महापालिका क्षेत्रातील अस्तित्वातील स्मशानभूमीच्या दुरावस्थेबाबत वारंवार तक्रारी प्राप्त होत असतात. या करीता या आर्थिक वर्षात "एकात्मिक स्मशानभूमी नुतनीकरण व विकास " कार्यक्रम हाती घेणेत येत आहे. या नंतरही महापालिका क्षेत्रातील वाढत्या नागरीकरणामुळे तसेच भविष्यातील गरजा लक्षात घेता नव्याने स्मशानभूमी / दफनभूमी करीता भूखंड राखून ठेवणे व विकसित करणे गरजेचे आहे. याकरीता महापालिका क्षेत्रात सर्व धर्मिय संयुक्त स्मशानभूमी / दफनभूमी विकास करण्याचे खालील प्रमाणे नियोजन करण्यात येत आहे.

- **भाईंदरपाडा संयुक्त स्मशानभूमी विकसनाबाबत**

महानगरपालिकेने संपूर्ण महापालिका क्षेत्राकरिता एकूण ३ संयुक्त स्मशानभूमीकरिता विकास आराखडयात फेरबदल प्रस्तावित केले असुन त्यापैकी भाईंदरपाडा येथील संयुक्त स्मशानभूमी शासनाने मान्यता दिली असून सदर संयुक्त स्मशानभूमीची जागा संपादित करुन स्मशानभूमीचे टप्या टप्याने विकसन करणे प्रस्तावित आहे.

- **मौजे कौसा येथील वन जमिनीवर दफनभूमी विकसनाबाबत**

मौजे कौसा येथील स. नं. ११५ पैकी ०.९९ हेक्टर वन जमिनीचा दफनभूमीकरिता वापर करण्यास वन विभागाने परवानगी दिली असून येत्या वर्षात उक्त दफनभूमीचे विकसन करण्यात येईल.

- **मौजे कौसा येथील स्टेडियम समोरील संयुक्त स्मशानभूमी, मुस्लीम व ख्रिश्चन दफनभूमी विकसनाबाबत**

मौजे कौसा येथील संयुक्त स्मशानभूमी, आरक्षण क्षेत्र २०,००० चौ. मी. ठाणे महानगरपालिकेच्या ताब्यात आले असुन त्याचे विकसन येत्या आर्थिक वर्षात पूर्ण करुन नागरिकांस खुले करण्यात येईल.

- पडलेगाव येथे संयुक्त स्मशानभूमीकरीता विकास आराखडयात फेर बदल प्रस्तावित केले असून त्याकरीता शासनाकडून मान्यता मिळणेकरीता पाठपुरावा करण्यात येत आहे.

### ४.४.१० कोलशेत रस्त्यालगत एव्हरेस्ट गृहनिर्माण प्रकल्पालगत व्हेजीटेबल मार्केट व शॉपींग सेंटरचा विकास

कोलशेत रस्त्यालगत असलेल्या डिस्ट्रीक सेंटरच्या आरक्षणाचे विकसन समावेशक आरक्षणातून विकसित करण्यात येत असून, सदर आरक्षणाचे जागेत ११०० चौ. मी. क्षेत्राचे व्हेजिटेबल मार्केट व शॉपींग सेंटर विकसित करण्यात येणार आहे. सदर विकसनापोटी येणा-या खर्च रु. ३ कोटीची बचत होणार आहे.

### ४.४.११ मार्केट व लायब्ररी आरक्षण विकसनाबाबत

मौजे बोरीवडे येथील मार्केट व लायब्ररी आरक्षणातून समावेशक आरक्षणा अंतर्गत विकसन करून घेण्यात येत आहे. मार्केट व लायब्ररी आरक्षणापैकी तळ अधिक ३ मजल्याची सुमारे ३१८० चौ. मी. क्षेत्राची इमारत बांधून मिळणार आहे. त्यामध्ये तळ अधिक १ मजल्यावर मार्केट आहे व वरील मजल्यावर लायब्ररी व हॉल प्रस्तावित केलेले आहे. सदर इमारतीचे तळ + एक मजला बांधकाम पूर्ण झाले असून त्यावरील बांधकाम सुरु आहे. येत्या आर्थिक वर्षात नागरीकांस ते खुले करण्यात येईल. सदर विकसनापोटी येणाऱ्या खर्च रु.९.५० कोटीची बचत होणार आहे. सदरचे काम हे २०१७ पर्यंत पुर्ण होईल.

## ४.५ सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस स्थानकांचा विकास

### ४.५.१ कासारवडवली पोलीस स्टेशनचे विकसन

घोडबंदर रस्त्यालगत कॉसमॉस ज्वेल्स गृहनिर्माण प्रकल्पातून प्राप्त झालेल्या सुविधा भूखंड क्षेत्र ३६४० चौ. मी. वर कासारवडवली पोलीस स्टेशनचे विकसन बांधिव सुविधे अंतर्गत तळ अधिक तीन

मजले पार्किंग व्यवस्थेसह बांधण्याचे काम सुरु असून येत्या आर्थिक वर्षात पोलिस स्टेशन सुरु होणार आहे. सदर विकसनापोटी येणा-या खर्च रु.६.७९ कोटीची बचत होणार आहे. सदरचे काम जून २०१७ पर्यंत पूर्ण होणार आहे.

### ४.५.२ कळवा पोलीस स्टेशनचे विकसन

खारेगाव येथील मुंबई पुणे रस्त्यालगत ५९१.५७ चौ. मी. सुविधा भूखंडावर कळवा पोलीस स्टेशनचे विकसन बांधिव सुविधे अंतर्गत तळ + ६ मजल्याचे बांधकाम सुरु असून सदर बांधकामापोटी ठाणे महानगरपालिकेस बांधकाम मूल्य रु.२.२० कोटी पोलीस विभागाकडून प्राप्त होणार आहेत. येत्या आर्थिक वर्षात पोलिस स्टेशन सुरु होणार आहे. सदर कामापोटी रु.२.९७ कोटीची बचत होणार आहे. सदरचे काम एप्रिल २०१७ पर्यंत पूर्ण होणार आहे.

### ४.५.३ शीळ-कल्याण रस्त्यालगत खिडकाळी पोलीस स्टेशनचे विकसन

शिळ - कल्याण रस्त्यालगत असलेल्या पोलीस स्टेशन आरक्षणाचे जागेवर समावेशक आरक्षणामधून विनामूल्य पोलीस स्टेशन व त्यावर पोलिस निवास व्यवस्था असे तळ अधिक सहा मजले बांधकाम सुरु असून, खिडकाळी, डायघर, शिळ, देसाई, डावले, पडले हया भागामधील कायदा व सुव्यवस्था राखण्याकरिता सदर पोलीस स्टेशन उपयुक्त ठरेल. सदर विकसनापोटी येणा-या रु.२.९६ कोटीची बचत होणार आहे. सदरचे काम ऑगस्ट २०१८ पर्यंत पूर्ण होईल.

### ४.५.४ दिवा पोलिस स्टेशन

दिवा विभागाकरिता डायघर येथील पोलिस स्टेशन आरक्षणाचे विकसन समावेशक आरक्षणामधून करण्याकरीता विकसन प्रस्ताव मंजुर करण्यात आला असून येत्या आर्थिक वर्षात सदर पोलिस स्टेशन सुरु होईल. सदर विकसनापोटी येणा-या रु.३.५० कोटीची बचत होणार आहे. सदरचे काम डिसेंबर २०१८ पर्यंत पूर्ण होईल.

## ४.६ अग्निशमन केंद्र विकसन

### ४.६.१ खारेगांव रेतीबंदर येथे अग्निशमन केंद्र उभारणे

खारेगांव रेतीबंदर येथील आरक्षित भूखंडावर बांधिव सुविधेंतर्गत अत्याधुनिक अग्निशमन केंद्र व अग्निशमन कर्मचाऱ्यांकरिता २० निवासी सदनिका बांधण्याचे प्रस्तावित आहे. सदर अग्निशम केंद्रामुळे कळवा मुंब्रा विभागास शिघ्रतेने सेवा पुरविता येतील. सदर अग्निशमन केंद्राचे विकसन सुरु असून येत्या आर्थिक वर्षात प्रथम टप्प्यात अग्निशमन केंद्र सुरु करण्याचा मानस आहे. सदर विकसनामुळे येणाऱ्या रु.८.३८ कोटीची बचत होणार आहे. सदरचे काम मे २०१८ पर्यंत पूर्ण होईल.

### ४.६.२ ओवळा अग्निशमन केंद्र

ओवळा येथे घोडबंदर रस्त्यालगत अग्निशमन केंद्राचे आरक्षण ठाणे महानगरपालिकेच्या ३५०० चौ. मी. क्षेत्र ताब्यात असून, त्यावर कन्स्ट्रक्शन टि.डी.आर मार्फत विकसन करण्यास विकासकाने मान्यता दिली असून सदर काम पुढील आर्थिक वर्षात पूर्ण होणार आहे. या विकसनापोटी येणा-या रु.६.७७ कोटीची बचत होणार आहे. सदरचे काम डिसेंबर २०१८ पर्यंत पूर्ण होईल.

### ४.६.३ माजिवडा अग्निशमन केंद्र

गोल्डन डाईज जंक्शन येथे हरदास नगर लगत अग्निशमन केंद्राचे आरक्षण कंन्स्ट्रशन टि.डी.आर.च्या माध्यमातून विकसन करण्यास विकासकाने मान्यता दिली असून सदर काम वर्षात सुरु होणार आहे. यासाठी येणा-या रु.८ कोटी खर्चाची बचत होणार आहे. सदरचे काम मे २०१९ पर्यंत पूर्ण होईल.

## ४.७ प्रकल्प बाधितांच्या पुनर्वसनाकरीता योजना

महापालिकेने हाती घेतलेल्या महत्वांकाक्षी रस्ता रुंदीकरण व मिसिकं लिंकचा विकास या मध्ये मोठया प्रमाणावर बाधीत बांधकाम धारकांचे पुर्नवसन करण्याकरीता खालील प्रमाणे नियोजन आहे.

रेंटल हौसिंग योजनेमधून एकूण १३२०० घरे प्राप्त होणार असून, यापैकी ठाणे महानगरपालिकेस ३१०० घरे प्राप्त झाली आहेत.

हौसिंग फॉर डिसहाऊस आरक्षणाच्या विकसनामध्ये ठाणे महानगरपालिकेस ४९७ घरे प्राप्त होणार असून, बी.एस.यु.पी. प्रकल्पांअंतर्गत येत्या अर्थिक वर्षात ठाणे महानगरपालिकेस १४२५ घरे प्राप्त होणार आहेत. तसेच रेंटल हौसिंग योजनेमध्ये येत्या वर्षात ठाणे महानगरपालिकेस ३६०० घरे उपलब्ध होणार आहेत.

या शिवाय खालील प्रकल्प नियोजित आहेत.

### ४.७.१ कोकणीपाडा येथे प्रकल्प बाधितांकरिता घरे

पोखरण रोड क्र. २ येथे निळकंठ गृहनिर्माण प्रकल्पासमोर हौसिंग फॉर डिसहाऊस आरक्षणावर प्रकल्प बाधितांकरीता ४९ घरे निर्मिती समावेश आरक्षणांतर्गत विकसित करण्यात येणार असून, त्याकरिता येणारा खर्च रु. ३ कोटीची बचत होणार आहे.

### ४.७.२ घोडबंदर रोड येथे बेघरांसाठी घरे आरक्षण विकसन

घोडबंदर रस्त्यालगत सेक्टर क्र. ६ मधील बेघरांसाठी घरे हे आरक्षण विकसित करण्यात येत असून, सदर आरक्षणाखालील दोन प्रस्तावातंर्गत सुमारे ८१०० चौ. मी. क्षेत्र असून, महापालिकेस एकूण १४८८ चौ. मी. क्षेत्राच्या ५१ सदनिका उपलब्ध होणार आहेत. सदर प्रकरणी ठाणे महानगरपालिकेस तळ अधिक ६ व तळ अधिक ७ अशा दोन स्वतंत्र इमारती प्राप्त होणार आहेत.

सेक्टर ५ मधील कोलशेत येथे बेघरांसाठी घरे हया आरक्षणापैकी १३०३० चौ. मी. क्षेत्रावर विकसनाचा प्रस्ताव असून, महापालिकेस २६११ चौ. मी. क्षेत्राच्या एकूण ८८ सदनिका उपलब्ध होणार आहेत. सदर इमारत स्टिल्ट अधिक १६ मजल्याची आहे. सदर विकसनापोटी येणारा खर्च रु. ५.७५ कोटीची बचत होणार आहे. सदर घरे आणि वाणिज्य गाळयांचा वापर रस्ता रुंदीकरणात बाधित नागरिकांच्या पुनर्वसनाकरिता करण्यात येणार आहे.

### ४.७.३ म्युनिसिपल हौसिंग आरक्षणाचे विकसन

पूर्व द्रुतगती महामार्गालगत असलेल्या चिरागनगर परिसरातून म्युनिसिपल हौसिंग विकसन समावेशक आरक्षणामधून करण्यात येत असून, भूखंडाच्या एकूण क्षेत्राच्या ५०% क्षेत्र बांधकामाच्या एकूण २०० सदनिका पार्किंग व्यवस्थेसह ठाणे महानगरपालिकेस प्राप्त होणार

आहेत. सदर विकसनापोटी येणारा खर्च रु. १७ कोटीची बचत होणार आहे. सदर करीता नकाशे मंजूर करण्यात आले असून पुढील अर्थिक वर्षात सदर सदनिका प्राप्त होणार आहेत.

### ४.७.४औद्योगिक गाळयांचे पुनर्वसनाकरीता (Service Industry) करीता भूखंड उपलब्ध करुन देणे

महापालिकेने हाती घेतलेल्या रस्तारुंदीकरण मोहिमे अंतर्गत विस्तापित होणाऱ्या गाळे धारकांचे पुनर्वसनाकरीता खारेगाव टोलनाका येथे अंदाजे ६००० चौ. मी. क्षेत्रफळाचा भूखंड निश्चित करण्यात आलेला असून त्यावर पुनर्वसनाकरीता जागा देण्यात आली आहे.

### ४.७.५ ठाणे महापालिका क्षेत्रात चित्रीकरणाकरीता अद्ययावत स्टुडिओ, कन्वेन्शन सेंटर, कम्युनिटी व मॅरेज हॉल उभारणे

शहरात रोजगार निर्मिती तसेच स्थानिक कलावंताना वाव देण्याकरीता सिने स्टुडिओचे निर्माण करण्याचा मानस आहे. कोलशेत येथील किरण स्पिनींग मिलच्या भूखंडावर उपरोक्त सुविधा येत्या ३ वर्षात विकसित करण्याचा मानस आहे.

### ४.७.६ भिंती रंगवा अभियान (Paint the city wall Campaign)

ठाणे महानगरपालिकेमार्फत लोक सहभागातून हा आगळा वेगळा तसेच नाविण्यपूर्ण उपक्रम सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात राबविणेत आला. या मधील उल्लेखनीय बाब अशी की, शहरातील कलावंत, शाळांमधील विद्यार्थी, शिक्षिका, हौसिंग सोसायटया यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग दिला. गेले ६ महिने शहरातील नागरिकांनी सदर Campaign उत्सव स्वरुपात साजरे केले. या मध्ये अंदाजे एक चौ.फूट पेक्षा जादा भिंती रंगविणेत आल्या. यामुळे शहरातील भिंती खराब न करण्यासाठी नागरिकांचा कल वाढू लागला आहे.

रंगविलेल्या भिंती संरक्षित करणे तसेच शहरात ५ ठिकाणी Street art Galleries उभारण्याचा या वर्षात मानस आहे.

### ४.७.७ शहराची ओळख राज्य / राष्ट्रीय पातळीवर होणेकरीता शहराचे ब्रँन्डींग करणे

ठाणे शहर हे केवळ मुंबई लगत असणे ही एकच ओळख न राहता शहरातील उल्लेखनीय पारंपारिक स्थळे, नव्याने निर्माण होत असलेल्या आंतरराष्ट्रीय किर्तीच्या सुविधा, सांस्कृतिक वारसा इत्यादी अधोरेखीत करुन शहराचा प्रसार विविध माध्यमाद्वारे होणेकरीता मागील वर्षी नागरिकांकडून सूचना व City Logo करीता स्पर्धा घेणेत आली होती. मध्यंतरीच्या निवडणुकीमुळे ही बाब अंतिम करण्यात आली नाही. तथापि, या आर्थिक वर्षात शहराचे ब्रँन्डींग अंतिम करण्याचा मानस आहे.

## ५. घनकचरा व्यवस्थापन

दि. १ ऑक्टोबर ते २३ ऑक्टोबर या कालावधीमध्ये महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. दि.२३ ऑक्टोबर २०१६ रोजी एकाच वेळी ५ लक्ष पेक्षा जास्त नागरिकांनी या महास्वच्छता अभियानात सहभाग नोंदविला. या अभियानांतर्गत जवळपास २५ हजार विदयार्थ्यांची मानवी साखळी, २८० तरुण बाईकर्सची रॅली, १०० महिला रिक्षा चालकांची रॅली , २०० महिला बाईकर्सची रॅली तसेच ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग होता. मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील अनेक नामवंत कलाकारांच्या सहभागासह अनेकविध कार्यक्रमाच्या माध्यमातून ठाणे शहर ढवळून निघाले होते. लोकांनी सतत ३ आठवडे स्वच्छतेचा हा अग्निकुंड धगधगत ठेवला होता. अशा प्रकारे संपूर्ण शहरामध्ये एकाच वेळी महास्वच्छता अभियान राबविणारे ठाणे हे पहिलेच शहर असेल.

### ५.१ कचऱ्यापासून वीज निर्मिती

डायघर येथील जागेवर पहिल्या टप्प्यामध्ये ६०० टन कचऱ्यावर प्रक्रिया करुन त्यापासून वीजनिर्मिती करण्यात येणार असून दुसऱ्या टप्प्यात उर्वरीत कचऱ्यावर प्रक्रिया करुन वीजनिर्मिती करण्यात येणार आहे. सदर प्रकल्पातंर्गत कचरा वाहतुकीचा खर्च महापालिकेस

करावयाचा असून त्यासाठी खाजगीकरणातून कचरा वाहतूक या लेखाशीर्षांतर्गत **रु. ८ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

### ५.२ विकेंद्रीत पध्दतीने कचरा प्रक्रिया प्रकल्प

शहरात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची १ ते ५ टन क्षमतेच्या बायोमिथेनायझेशन, व्हर्मी कपोंस्टींग व मॅकेनिकल कपोंस्टींग पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी प्रकल्प उभारण्यात येणार आहेत. पहिल्या वर्षाकरिता प्रतिदिन १०० टन, दुसऱ्या वर्षाकरिता प्रतीदिन २०० टन याप्रमाणे ५ वर्षाकरिता प्रतिदिन ५०० टन कचऱ्याची या पध्दतीने विल्हेवाट लावण्यात येईल. सदरचा खर्च विकेंद्रीत पद्धतीने घनकचरा प्रक्रिया प्रकल्प या लेखाशीर्षांतर्गत **रु. १५ कोटी** तरतुदीमधून प्रस्तावित आहे.

### ५.३ २४x७ ऑन कॉल सेवा

या योजनेअंतर्गत ३ जेसीबी मशीन व ६ डंपर खरेदी करुन शहरातील रस्त्यावर पडणारे माती-रॅबिट,कचरा उचलण्यात येणार असून ही यंत्रणा २४ तास कार्यरत ठेवण्यात येणार आहे. सदरचा खर्च साफसफाई वाहने खरेदी या लेखाशीर्षांतर्गत **रु. २ कोटी** तरतुदीमधून प्रस्तावित करण्यात आला आहे.

### ५.४ रोड स्वीपिंग मशीन खरेदी

शहरातील रुंद करण्यात आलेले रस्ते, मुंबई-आग्रा महामार्ग, घोडबंदर रोड, जुना मुंबई पुणे महामार्ग व इतर मुख्य रस्ते दैनंदिन साफसफाई करण्यासाठी २ नग रोड स्वीपिंग मशीन खरेदी करण्यासाठी व मशीनची परिचालन व निगा, देखभाल करण्यासाठी निविदा मागविण्यात आलेली असून निविदा प्रक्रिया अंतिम स्तरावर आहे.

### ५.५ रोबोटिक मल्टिपर्पज Excavator मशीन खरेदी

नालेसफाई, अनधिकृत बांधकामे निष्काषित करणे, शहरातील झाडांच्या फांदया छाटणे, मलवाहिन्यांची निगा व देखभाल करणे व नवीन मलवाहिन्या टाकणे, वेगवेगळया आपत्कालीन परिस्थितीत आवश्यकतेप्रमाणे कामे करण्याकरीता रोबोटिक मल्टिपर्पज Excavator मशीन खरेदी करुन त्याचे परिचालन, निगा

व देखभाल करण्यासाठी निविदा मागविण्यात आलेली असून निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

**५.६ मॅकेनिकल सेग्रिगेशन मशीन खरेदी**

शहरात निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याच्या निर्मितीच्या ठिकाणी विभक्तीकरण करण्यासाठी मॅकेनिकल सेग्रिगेशन मशीन खरेदी करण्याकरिता व मशीनचे परिचालन, निगा व देखभाल करण्यासाठी मागविण्यात आलेली निविदा अंतिम टप्प्यात आहे.

**५.७ स्टेशनरी कॉम्पॅक्टर खरेदी**

सद्यस्थितीत तीनचाकी, चारचाकी घंटागाडया व कॉम्पॅक्टरद्वारे घरोघरी जाऊन कचऱ्याचे संकलन करुन संकलित केलेला कचरा हस्तांतरण स्थानक येथे पाठविण्यात येतो. त्याऐवजी प्रत्येक समितीमध्ये २ ते ३ मिनी ट्रान्सफर स्टेशन या स्वरुपात कचरा संकलित करण्यासाठी मोठया क्षमतेचे स्टेशनरी कॉम्पॅक्टर खरेदी करुन विभागात निर्माण झालेला कचरा २४ तास संकलित करण्याची व्यवस्था निर्माण करुन टप्प्याटप्प्याने एक-एक समिती या योजनेखाली आणण्यात येईल.

या सर्व वाहनांचा खर्च अत्याधुनिक साफसफाई मशिन खरेदी या लेखाशीर्षांतर्गत **रु. १७ कोटी** तरतुदीमधून प्रस्तावित करण्यात आला आहे.

**५.८ मोबाईल कचरा प्रक्रिया प्रकल्प**

शहरातील बहुमजली इमारतीमधील ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी प्रत्येक प्रभाग समितीकरिता १ मोबाईल कचरा प्रक्रिया वाहन खरेदी करुन गृहसंकुलातील ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येणार आहे. सदरचा खर्च वाहने खरेदी या लेखाशीर्षांतील तरतुदीमधून प्रस्तावित आहे.

**५.९ झोपडपट्टया कचरामुक्त करणे.**

शहरातील प्रत्येक प्रभाग समितीतील एका झोपडपट्टीतील कचरा विभक्तीकरण करणे, संकलन करणे व कचऱ्यावर त्याच झोपडपट्टीत विकेंद्रीत पध्दतीने प्रक्रिया करणे. या योजनेअंतर्गत पहिल्या वर्षी प्रत्येक प्रभाग समितीतील एक झोपडपट्टी कचरा मुक्त

करण्यात येईल. सदरचा खर्च घंटागाडी या लेखाशीर्षांतर्गत तरतुदीमधून प्रस्तावित आहे.

**५.१० प्रभाग कचरामुक्त करणे**

शहरातील एकूण प्रभागापैकी प्रत्येक प्रभाग समितीतील एका प्रभागात कचरा विभक्तीकरण करणे, संकलन करणे व कचऱ्यावर त्याच प्रभागात विकेंद्रीत पध्दतीने प्रक्रिया करणे. या योजनेअंतर्गत पहिल्या वर्षी प्रत्येक प्रभाग समितीतील १ प्रभाग कचरा मुक्त करण्यात येईल.सदरचा खर्च घंटागाडी या लेखाशीर्षांतर्गत तरतुदीमधून प्रस्तावित आहे.

**५.११ हजेरी शेडचे नुतनीकरण व नवीन हजेरी शेड उभारणे :**

कचरा संकलन व वाहतूक करण्यासाठी विभागाकडे मोठया प्रमाणात सफाई कामगार कार्यरत आहेत. या कर्मचाऱ्यांना मुलभूत सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने हजेरी शेडचे नुतनीकरण करुन त्यामध्ये चेंजिंग रुम, शौचालय सुविधा, हजेरीच्या वेळी कर्मचाऱ्यांना चहा-बिस्किटची व्यवस्था करणे, पिण्याच्या पाण्याची सोय, प्रथमोपचार पेटी इत्यादी सुविधा पुरविणे. सदर योजने अंतर्गत दरवर्षी किमान ५ हजेरी शेडमध्ये वरील सुविधा पुरविण्यात येतील. ठाणे महापालिका क्षेत्रात सद्यस्थितीत ४८ हजेरी शेड असून नवीन प्रभाग समितीची निर्मिती प्रस्तावित असल्यामुळे व दर ५० हजार लोकसंख्येनुसार एक हजेरी शेड उभारणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेता ज्याठिकाणी जागा उपलब्ध असेल त्याठिकाणी नवीन हजेरी शेड बांधण्यात येईल व ज्या ठिकाणी जागा उपलब्ध नसेल त्याठिकाणी सर्व सुविधा असलेले कंटेनर पुरविण्यात येतील. याकरिता हजेरी शेड विकसित करणेसाठी **रु. १ कोटी** तरतूद प्रस्तावित केली आहे.

**५.१२ नाले स्वच्छ योजना**

या योजने अंतर्गत ३ मिनी जेसीबी, ३ मिनी पोकलेन खरेदी करुन याद्वारे वर्षभर नाल्यात जमा होणारा कचरा साफ करण्यात येईल. याकरिता **रु.५ कोटी** खर्च अपेक्षित आहे.

### ५.१३ मोबाईल प्रचार प्रसार केंद्र

कचरा विभक्तीकरण, साठवणूक व विल्हेवाट करणे याबाबत नागरिकांमध्ये मोठया प्रमाणात जनजागृती करणे आवश्यक असल्यामुळे याकरिता १ मोबाईल जनजागृती व्हॅन खरेदी करुन याद्वारे नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात येईल. याकरिता **रु.१५ लक्ष** खर्च अपेक्षित आहे.

### ५.१४ मोबाईल टॉयलेट खरेदी

ठाणे शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेता, शहरामध्ये होणारे वेगवेगळे सार्वजनिक कार्यक्रम यासाठी मोबाईल टॉयलेटची आवश्यकता असून १२ मोबाईल टॉयलेट खरेदी करणेसाठी रु. १.२५ कोटी खर्च अपेक्षित आहे.

## ६. पर्यावरण संवर्धन व प्रदुषण नियंत्रण प्रकल्प

**सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात खालील प्रकल्प कार्यान्वित करण्यात आलेले आहे.**

१) २० टन हरित कचऱ्यापासून जळाऊ इंधन निर्मिती
२) २५ टन ओल्या कचऱ्यापासून बायोगॅस इंधन निर्मिती
३) १ टन ई-वेस्ट मॅनेजमेंट

**तसेच खालील प्रकल्प मान्यतेच्या प्रक्रियेत असून लवकरच कार्यान्वित करण्यात येणार आहेत.**

१) ५ टन प्लास्टीक कच-यापासून इंधन निर्मिती
२) ६० टन प्राणीजन्य कचरा कत्तलखान्यातील कच-यापासून बायो-सीएनजी इंधनाची निर्मिती
३) १ टनाच्या थर्माकोलचे पुनर्चक्रीकरण
४) १०० टन क्षमतेचा बांधकाम व रॅबीट कच-याचे पुनर्चक्रीकरण.
५) ३ टन जैव-वैद्यकीय कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हवाट
६) १५ टन प्रतिदिन सुका कचरा संकलन केंद्र

## ६.१ एकात्मिक तलाव सौंदर्यीकरण

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात एकूण ३६ तलाव असून ठाणे शहर हे तलावांचे शहर म्हणून ओळखले जाते.

सन २०१६-१७ मध्ये आंबे घोसाळे तलाव, ब्रम्हाळा तलाव , कचराळी तलाव, कमल तलाव व खारेगाव तलावाच्या सौंदर्यीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. सन २०१७-१८ व सन २०१८-१९ मध्ये महानगरपालिका क्षेत्रातील सर्व ३६ तलावांच्या नुतनीकरणाची कामे हाती घेण्याचे प्रस्तावित आहे. राज्य सरोवर संवर्धन कार्यक्रमाअंतर्गत ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मासुंदा तलाव, तुर्फेपाडा तलाव, कावेसर तलाव या तीन तलावांच्या सुशोभीकरणाच्या कामाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास राज्य शासनाने मंजुरी दिली असून सदर तलावांची कामे सन २०१७-१८ मध्ये पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे. सदरची कामे करण्याकरीता सन २०१७-१८ या आर्थिक तलाव पुनरुज्जीवन व शुद्धीकरण या लेखाशीषातर्गत **रु.३० कोटी** व तलाव सुशोभीकरण या लेखाशीर्षांतर्गत **रु.९.५० कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात येत आहे.

## ६.२ तलाव व तलाव परिसर प्रदूषण मुक्त व नागरी सुविधांनी परिपूर्ण करणे

ठाणे शहरांतील ३६ तलावांचे पुनरुज्जीवन व सौंदर्यीकरण करण्यासाठी, सर्व तलाव व तलाव परिसर प्रदूषण मुक्त व नागरी सुविधांनी परिपूर्ण करण्यासाठी योजना आखलेली आहे. यामध्ये आवश्यकतेप्रमाणे तलावाचा गाळ काढणे, भिंत उभारणे, जॉगींग ट्रॅक, LED दिवे, गार्डन, खेळणी, शौचालय, फाऊंटन, प्रदूषण नियंत्रण उपाययोजना उदा. Aeration , Boat, निर्माल्य कलश, गेट उभारण्याच्या कामाचा अंतर्भाव करण्यात येणार आहे. सदर कामासाठी वास्तुविशारद महाविद्यालयास सल्लागार म्हणून नेमण्याची योजना आहे.

## ६.३ प्लास्टीक कचरा निर्मुलन योजना

शहरातील सार्वजनिक ठिकाणी व शैक्षणिक संस्थांमधून प्लास्टिक कचऱ्याचे संकलन करण्यासाठी Plastic Collection Bin , Plastic Bottle Crusher Machine & Plastic Waste Bailing

Machine बसविण्यात येणार आहेत. शैक्षणिक संस्थांना प्लास्टिक कचरा संकलनासाठी प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यात येणार आहेत.

**६.४ ओला कचरा संकलन योजना**

हॉटेल वेस्ट, मटण, चिकन दुकाने, फिशमार्केट, स्लॉटर हाऊस येथील कचरा त्वरित विघटन होणारा, दुर्गंधीयुक्त व जंतूसंसर्ग पद्धतीचा असतो. सदर कचरा योग्य पध्दतीने गोळा करण्यासाठी प्रोत्साहन म्हणून परवानाधारक आस्थापनांना विशिष्ट प्रकारचे Collection Bin देण्यात येणार आहेत.

**६.५ प्रभावी घनकचरा व्यवस्थापन व जनजागृती योजना**

घनकच-याचे प्रत्यक्ष जागेवर वर्गीकरण व व्यवस्थापन करण्यासाठी Area Local Management Along with Communication Tool kit हे जनजागृतीचे माध्यम वापरणे. महागरपालिकेच्या विविध पर्यावरण संवर्धनाच्याधोरणाबाबत, नागरिकांमध्ये जनजागृती करणे, नागरिकांना तांत्रिक मार्गदर्शन करणे यासाठी Environment Consultant Panel ची स्थापना करणे, नागरिकांनी विविध पर्यावरण धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी बक्षिसे वस्तू स्वरुपात देणे प्रस्तावित आहे.

**६.६ पर्यावरण संवर्धन केंद्राची उभारणी**

- ठाणे महापालिका क्षेत्रात Environmental Conservation and Awareness Center उभारण्याचे नियोजन आहे
- ठाणे महानगरपालिकेची मुख्यालय वास्तू IGBC मानकांनुसार Green Building मानांकन प्राप्त करण्यासाठी आराखडा करण्याचे नियोजन आहे.

**६.७ जैवविविधता संवर्धन योजना**

ठाणे शहराला विस्तीर्ण खाडी किनारा लाभला असून तलाव, उद्यान अशी जैवविविधता आहे. महापालिकेने Singapore Biodiversity Index च्या आधारे जैवविविधता आराखडा तयार

केलेला आहे. त्यानुसार मुल्लाबाग येथे फुलपाखरु उद्यान तयार करण्यात येत आहे. तसेच चिमणी, मैना, पोपट या पक्षांची संख्या वाढविण्यासाठी Bird Nest Box खरेदी करण्यात येणार आहेत. तसेच मॅनग्रुव्हजची लागवड करण्यात येणार आहे. जैवविविधता जनजागृती विविध कार्यशाळा, फोटो प्रदर्शन, फिल्मस् यांच्याद्वारे करण्यात येणार आहे.

**६.८ वातावरण व हवेचे गुणवत्ता दर्शक फलक व मोबाईल ॲप**

ठाणे शहरामध्ये हवा प्रदुषणामध्ये धुलीकणांचे प्रमाण मानकांपेक्षा बरेच जास्त आहे. सदर धुलीकणांचे प्रमाण नियंत्रित करण्यासाठी लोकांमध्ये मोठया प्रमाणात, विविध उपायांबाबत जनजागृती करणे गरजेचे आहे. त्यासाठी Mobile App "To know your Air Quality Which you Breath", तयार करणे. ठिकठिकाणी वातावरण दर्शक व हवेची गुणवत्ता दर्शक फलक बसविणे. सद्यस्थितीची प्रयोगशाळा अद्ययावत करणे, Noise Mapping करण्याचे प्रस्तावित आहे.

## ७.आरोग्य विभाग

**७.१ छत्रपती शिवाजी रुग्णालयाचा कायापालट करण्यासाठी सुधारणा**

छत्रपती शिवाजी रुग्णालयातील स्थापत्य कामे बऱ्याच वर्षापासून करण्यात आली नसल्यामुळे सन २०१६-१७ मध्ये तेथील विविध विभागांमध्ये स्थापत्य कामे करुन रुग्णालयाचा कायापालट करण्याचे हेतूने रुग्णालयातील पॅसेजची दुरुस्ती करुन नुतनीकरण करण्यात आलेले आहे. तसेच नेत्रचिकीत्सा विभाग, निर्जंतुकीकरण विभाग, अभ्यांगत कक्ष, वार्ड क्र.९, १० व ११ या विभागांचे नुतनीकरण पुर्ण करण्यात आले आहे.

तसेच राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालयात १२० आसन क्षमतेचा अद्ययावत लेक्चर हॉल व विद्यार्थी वसतीगृह क्र.९ व १० चे नुतनीकरण करण्यात आले आहे. अशा प्रकारे रुग्णालयाचे

अद्ययावतीकरण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

**७.२ सी.आर.वाडिया दवाखाना येथे सेंट्रल पॅथॉलॉजी प्रयोगशाळा**

महापालिका क्षेत्रात २७ आरोग्य केंद्रे, ५ प्रसूतिगृहे कार्यरत आहेत. सन २०१६-२०१७ या वर्षात ५० खाटांची २ रुग्णालये नव्याने बांधून तयार आहेत.

ठाणे महापालिका क्षेत्रात सेंट्रल पॅथॉलॉजी प्रयोगशाळा उभारणी केल्यास वर्षभर सर्व आरोग्य केंद्रे, प्रसूतिगृहाकडील रक्तनमुने मुख्य प्रयोगशाळेत तपासता येतील त्यासाठी सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात उपकरणे खरेदी या लेखाशीर्षांतर्गत तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**७.३ कोरस रुग्णालय व रोझा गार्डनिया येथे २ अद्ययावत मॉडयुलर शस्त्रक्रियागृहाची निर्मिती**

या रुग्णालयामध्ये शस्त्रक्रियागृहाची निर्मिती करणे व आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे. या ठिकाणी सर्वसाधारण शस्त्रक्रिया Orthopeadic Surgery, Caesarean Section व मोतिबिंदू सारख्या शस्त्रक्रिया सुरु करणे शक्य होईल. तसेच रोझा गार्डनिया येथे अद्ययावत मॉडयुलर शस्त्रक्रियागृह उभारण्यासाठी सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात दवाखाने बांधणे या लेखाशिर्षात तरतूद करण्यात आलेली आहे.

**७.४ डायलेसिस सुविधा उपलब्ध करणे**

ठाणे महापालिका क्षेत्रात नवीन ५ डायलेसिस केंद्रे उभारण्याचे काम सुरु असून त्यासाठी **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**७.५ कॅन्सरपूर्व निदान केंद्र व जनजागृती**

ठाणे महापालिका क्षेत्रात अंदाजे १० लक्ष महिलांची लोकसंख्या असून, महिलांमध्ये प्रामुख्याने गर्भाशयाच्या व स्तनाच्या कॅन्सरचे प्रमाण वाढत आहे.कॅन्सरबाबत जनजागृतीसाठी **रु.५० लक्ष** तरतूद प्रस्तावित आहे.

प्री कॅन्सर डिटेक्शनसाठी ५ फिरत्या प्रयोगशाळा निर्माण करण्यासाठी तसेच महानगरपालिकेच्या सी.आर.वाडीया दवाखाना

येथे Pre Cancer Detection Center उभारण्याचे प्रस्तावित आहे. कॅन्सरपूर्व निदान केंद्राच्या उपकरणे खरेदी करण्यासाठी सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात **रु. ५ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

### ७.६ ठाणे महानगरपालिकेच्या प्रसूतिगृहे/रुग्णालयामध्ये एन.आय.सी.यु ची निर्मिती

नवजात अर्भकांना आवश्यकतेनुसार NICU मध्ये ठेवण्यासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात **रु.५० लक्ष** रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे.

### ७.७ ठाणे महानगरपालिकेच्या ५ प्रसुतिगृहांमध्ये सोनोग्राफी सुविधा

ठाणे महानगरपालिकेच्या ५ प्रसूतिगृहात तसेच कोरस व रोझा गार्डनिया रुग्णालयांमध्ये प्रत्येकी एक ३D सोनोग्राफी सुविधा उपलब्ध करण्यासाठी सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात **रु.२.२५ कोटी** ची तरतूद उपकरणे खरेदी या लेखाशिर्षात प्रस्तावित आहे.

### ७.८ गरोदर मातांना प्रोटिन्सचा पुरवठा

महानगरपालिका क्षेत्रातील गरोदर मातांना बाळाची सुदृढ वाढ होण्यासाठी ज्या महिलांमध्ये प्राटिन्सचा पुरवठा करणे आवश्यक आहे अशा महिलांना ३ ते ६ महिने प्रोटिनयुक्त पावडरचा पुरवठा मासिक तत्वावर करण्यात येईल. वार्षिक अंदाजे ३५००० गरोदर महिलांच्या संख्येपैकी किमान १०,००० महिलांना सदर सुविधा देण्यासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात **रु.१ कोटी** रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे.

### ७.९ डॉ.आ.गो.जोशी रुग्णालय पुनर्बांधणी

डॉ.आ.गो.जोशी रुग्णालय, वर्तकनगर ही इमारत फार जुनी झालेली असून त्याची पुनर्बांधणी करणे क्रमप्राप्त झालेले आहे. त्यासाठी दवाखाने बांधणे या लेखाशीर्षांतर्गत तरतूद करण्यात आली आहे.

**७.१० कौसा रुग्णालय**

कौसा येथे १०० खाटांचे रुग्णालय उभारणीचे काम सुरु असून अंतर्गत कामांसाठी व उपकरणांसाठी यावर्षी **रु.५ कोटी** तरतूद प्रस्तावित केलेली आहे. मात्र सदर रुग्णालयामध्ये आवश्यक असलेले वैद्यकीय साहित्य व उपकरणे यामध्ये गॅस पाईप लाईन टाकणे, शस्त्रक्रियागृह तयार करणे, NICU तयार करणे व आवश्यक वैद्यकीय उपकरणे खरेदी करणे इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देण्यासह रुग्णालय चालविण्यासाठी P.P.P तत्वावर प्रस्ताव मागविण्याचे नियोजन आहे.

**७.११ छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय येथे १ कार्डिॲक ओ.टी व १ न्युरो ओ.टी सह कॅथलॅबची निर्मिती**

छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयामध्ये नवजात शिशुच्या अतिदक्षता विभागाची सध्याची कार्यरत असणारी व्यवस्था कमी पडत असल्याने त्या विभागाचे नुतनीकरण प्रस्तावित आहे.

रुग्णालयात भरती होणा-या रुग्णांच्या नातेवाईकांसाठी कळवा विभागात एक धर्मशाळा अथवा रात्र निवारा केंद्र उभारण्याचे प्रस्तावित आहे.

सी.टी.स्कॅन व एम.आर.आय. सेवा पीपीपी तत्वावर सुरु करण्यासाठी कार्यादेश देण्यात आला आहे.

छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या सध्याच्या शस्त्रक्रियागृहाशेजारी १ कार्डिॲक ओ.टी व १ न्युरो ओ.टी सह कॅथलॅब तयार करण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी लागणा-या उपकरणासाठी तसेच न्युरो व ब्रेन सर्जरीसाठी आवश्यक उपकरणे व सर्जिकल मायक्रोस्कोप व शस्त्रक्रियागृहातील टेबल ॲनेस्थेशिया वर्क स्टेशन, हार्ट लंग मशीन व शस्त्रक्रियेसाठी आवश्यक असणारी साधने, साहित्य व सामुग्री खरेदीसाठी एकूण रक्कम **रु.३० कोटी** खर्च उपकरणे खरेदी या लेखाशिर्षात प्रस्तावित आहे.

### ७.१२ कॉकलिअर इम्प्लान्ट शस्त्रक्रिया

ठाणे महानगरपालिकेने छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयामध्ये जन्माला येणा-या मुकबधीर मुलांना तसेच या व्यतिरिक्त ठाणे शहरामध्ये अशा प्रकारच्या तान्हया बाळांचा प्राथमिक अवस्थेतच कर्णबधीरपणा घालविण्यासाठी कॉकलिअर इन्प्लांट शस्त्रक्रिया उपचार पध्दती करण्यास तसेच या शस्त्रक्रियेसाठी येणा-या एकूण खर्चापैकी रु.२.५० लक्ष महापालिकेकडून खर्च करण्यात येत आहेत. आता पर्यंत ठाणे महापालिकेमार्फत एकुण १२ शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून आतापर्यंत ८ मुलांच्या शस्त्रक्रियेसाठी रु.२० लक्ष खर्च केला आहे. या शस्त्रक्रियेसाठी खाजगी देणगी स्वरुपात देखील रक्कम प्राप्त होत आहे.

## ८. शिक्षण विभाग

बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ कायदयान्वये ६ ते १४ वयोगटातील बालकांच्या शिक्षणासाठी मोफत व सक्तीचा कायदा अमलात आणलेला असून या कायद्यानुसार महानगरपालिका क्षेत्रातील मनपाच्या प्राथमिक शाळांच्या व विद्यार्थ्यांच्या दर्जात्मक आणि गुणात्मक बाबींसाठी उपाययोजना करणे हे महापालिकेचे अनिवार्य कर्तव्य आहे.

पारंपारिक शिक्षणाची चौकट अधिक विस्तारण्याची वेळ आता आली आहे. गेल्या दोन वर्षात आपण त्यात मोठा पल्ला गाठला आहे. सिग्नल शाळा, जकात नाका शाळा, मुंब्रा गर्ल्स फूटबॉल लिग, डिजीटल वर्ग या आपल्या बदललेल्या शैक्षणिक प्रयोगांचा राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर गौरव झाला आहे. ही परंपरा पुढे घेऊन जाण्यासाठी यावर्षी आपण प्रौढ साक्षरता केंद्र, प्लॅटफॉर्म स्कूल, नाका शाळा व किलबिल एक्सप्रेस करु पहात आहोत आणि आम्हाला विश्वास आहे की देशाच्या पुढील पिढीसाठीची ही आपली गुंतवणूक अधिक प्रेरणादायी व रचनात्मक ठरेल.

## सन २०१६-१७ या वर्षातील नाविन्यपूर्ण योजना

### ८.१ सिग्नल शाळा

ठाणे शहरातील विविध सिग्नलवर भीक मागणाऱ्या मुलांकरीता पूर्वद्रुतगती मार्गावर (तीनहात नाका) येथे सिग्नल शाळा समर्थ भारत व्यासपीठ, ठाणे यांच्या सहकार्याने ठाणे महानगरपालिकेमार्फत सुरु करण्यात आली असून या शाळेमध्ये सुमारे २८ विद्यार्थी उत्तमरितीने शिक्षण घेत आहेत. या उपक्रमाची जगविख्यात बाबीस तसेच अल जजिरा या न्यूज चॅनलनेही दखल घेतली असून राज्याचे शिक्षणमंत्री यांनी प्रत्यक्ष भेट देवून सिग्नल स्कूलचा ठाणे पॅटन पूर्ण राज्यभर लागू करणेबाबत सूचना दिलेल्या आहेत. या शाळांमधील सर्व विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर उंचावला असून ठाणे मनपाच्या सर्व शिक्षण , क्रीडा , सांस्कृतिक विषयक विविध उपक्रमात भाग घेवून प्राविण्य मिळविलेले आहे.

### ८.२ जकात नाका शाळा

ठाणे महापालिका कार्यक्षेत्रातील गायमुख जकात नाक्याची वास्तू जकात बंद झाल्याने बंद अवस्थेत होती. याच परिसरातील विद्यार्थी भाडयाच्या खोलीमध्ये अपु-या भौतिक सुविधांच्या अवस्थेत शिक्षण घेत होते. सदरहू शाळा, कॅपजेमिनी कंपनीच्या सीएस आर फंडातून दुरुस्त करुन आवश्यकत्या भौतिक सुविधा (उदा. स्वयंपाक घर, वाचनालय, संगणक कक्ष, स्वच्छतागृह, क्रीडांगण ) उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. आज या ठिकाणी सुमारे ३०० ते ४०० विद्यार्थी उत्तमरितीने शिक्षण घेत आहेत.

### ८.३ व्हर्च्युअल स्कूल

ठाणे महानगपालिकेच्या ९ वी व १० वी च्या सुमारे ३००० माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्याकरीता तज्ज्ञ मार्गदर्शकांमार्फत विविध लेक्चर्स व मार्गदर्शन तसेच विद्यार्थ्यांना जागतिकीकरणाशी जोडला जाणे आवश्यक होते. यासाठी रिलायंस फाऊंडेशन यांच्या सीएसआर फंडातून एसआरडी सोल्युशन्स मार्फत शाळा क्र.१९, विष्णूनगर येथील पहिल्या मजल्यावर अद्ययावत स्टेडिओ ची उभारणी करुन १६ माध्यमिक शाळांमध्ये या रिले केंद्रातून एकाच वेळी तज्ज्ञ मार्गदर्शकांचे

विविध लेक्चर्स व अभ्यासाविषयीचे मार्गदर्शन देण्यात आल्याने या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ झाली आहे.

**८.४ रात्रशाळा**

उदरनिर्वाहासाठी तसेच आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना आपले शिक्षण अर्धवट सोडून दिल्याने या विद्यार्थ्यांना पुढे ९ वी व १०वी चे शिक्षण पूर्ण करण्याची इच्छा असल्याने अशा विद्यार्थ्यांसाठी ठाणे महापालिकेने झोपडपट्टी भागातील मनोरमानगर व पारसिकनगर या ठिकाणी रात्रशाळा सुरु करुन आज या प्रत्येक रात्रशाळेमध्ये सुमारे ७० ते ८० विद्यार्थी शिक्षण घेत असून यांच्याकरीता आवश्यकते शिक्षक, भौतिक सुविधा उपलब्ध करुन शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. या शाळांमधील सुमारे २० ते २५ विद्यार्थी एसएससीच्या बोर्डाच्या परीक्षेस बसणार आहेत.

**८.५ बालवाडी प्रकल्प**

ठाणे महानगरपालिकेच्या सुमारे ५१ बालवाडया असून या बालवाडयांच्या दर्जा वाढविण्यात येऊन पटसंख्येमध्ये वाढ होणे अपेक्षित होते. त्यानुसार या शैक्षणिक वर्षात Tech Mahindra व Save the Children यांच्या CSR माध्यमातून बालवाडीतील शिक्षिकांना प्रत्येक तिमाहीत दोन दिवस अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देवून सेमी इंग्रजी अभ्यासक्रम व त्या अनुषंगाने आवश्यक असलेले शैक्षणिक साहित्य , तक्ते इत्यादी पुरविण्यात आल्याने आज ठाणे महापालिकेच्या बालवाडीबाबतचा जनमानसातील उत्तम दर्जा असल्याबाबत चर्चा होत असून पुढील शैक्षणिक वर्षात १७०० वरुन २५०० वर पट वाढणे अपेक्षित आहे.

**८.६ स्मार्ट सेमी इंग्लिश स्कूल**

जागतिकीकरणाच्या स्पर्धेत मराठी शाळेतील विद्यार्थी टिकवून ठेवणे तसेच या शाळांचा पट तसेच त्या विद्यार्थ्यांना विज्ञान व गणित विषयाचे इंग्रजी भाषेतून दर्जेदार शिक्षण देणे क्रमप्राप्त होते. याकरीता ठाणे महापालिकेने शैक्षणिक वर्षात १० मराठी शाळांचा १ ली पासून सेमी इंग्रजी अभ्यासक्रम Save the Children व Convegenus India (New Delhi) यांच्या सीएसआर फंडातून विद्यार्थ्यांना १ ली

ते ३ री पर्यंतच्या अभ्यासक्रमाचे TAB पुरवुन तसेच या शाळेतील शिक्षकांना Spoken English चे प्रशिक्षण देण्यात आल्याने या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर उंचावला असून आज एकूण २५० मुले TAB च्या सहाय्याने स्वत: उत्तम रितीने शिक्षण घेत आहेत.

**८.७ कृतीयुक्त अभ्यासक्रम**

बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण कायदा २००९ अंतर्गत सर्वच विद्यार्थ्यांना दर्जेदार ज्ञानरचना वादावर कृतीयुक्त शिक्षण देणे विद्यार्थ्यांची अवलोकन क्षमता , पूर्वज्ञान जागृत करणे व स्वत: केलेल्या कृतीतून कार्यानुभवाच्या आधारे शिक्षण घेणे, शाळांतील सर्वच मुले प्रगत होणे क्रमप्राप्त होते. त्यानुसार महापालिकेने एकूण सर्वच मराठी माध्यमाच्या शाळांपैकी एकूण ७८ शाळांना ६५ कृतीयुक्त अभ्यासक्रमावर आधारीत संच पुरवून त्याव्दारे पहिली ते चौथीतील सुमारे ११,००० विद्यार्थी या योजनेचा लाभ घेत आहेत. त्यामुळे निश्चितच त्यांच्या गुणवत्तेत माईलस्टोनच्या आधारे अध्ययनामध्ये सुधारणा होण्यास मदत होणार आहे.

**८.८ ठाणे महानगरपालिकेच्या इंग्रजी शाळा दर्जा सुधार कार्यक्रम**

ठाणे महानगरपालिकेच्या ५ इंग्रजी माध्यमाच्या शाळांचा दर्जा अन्य खाजगी इंग्रजी माध्यमाच्या शाळांपेक्षा सुमार असल्याने या शाळांमध्ये सर्व विषयांचे दर्जेदार शिक्षण आणि Spoken English बरोबर International School level चे शिक्षण देणे आवश्यक होते. या परिसर आशा NGO संस्थेमार्फत वरील ५ शाळेतील सुमारे २००० विद्यार्थ्यांना कृतीयुक्त अभ्यासक्रम आधारीत सर्वच विषयाचा अभ्यासक्रम शिकविणे, शिक्षकांना प्रशिक्षण व वर्षभर अभ्यासक्रम शिक्षकांकडून करुन घेणे, या कामी नियंत्रण म्हणून काम करीत असून यासर्वच विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ झालेली आहे.

**सन २०१७-१८ मधील प्रस्तावित नवीन योजना**

**८.१ १० सेमी इंग्रजी स्मार्ट स्कूल निर्मिती**

मागील शैक्षणिक वर्षात ३ सेमी इंग्रजी स्कूल सुरु केल्याने याबाबतचा वाढता प्रतिसाद पाहता दर्जेदार इंग्रजी शिक्षण देऊन शिक्षण विभागाबद्दलचा समाजाचा दृष्टीकोन सकारात्मक करण्यासाठी इयत्ता

पहिलीपासून एकूण ३० शाळांमध्ये स्मार्ट सेमी इंग्रजी क्लासेस सुरु करण्यासाठी प्रस्तावित आहे. यासाठी ३० लक्ष रुपये इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

## ८.२ इंग्रजी माध्यमाच्या ३ वाढीव शाळा

इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाचा वाढता कल पाहता ठामपाच्या इंग्रजी माध्यमाचा शाळांचा पट वाढत असून सध्याच्या सुरु असलेल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा अपु-या पडत आहेत. त्यामुळे इंग्रजी माध्यमाच्या ३ शाळा विटावा, राबोडी, कौसा येथे सुरु करुन तेथे भौतिक सुविधा उपलब्ध करुन देणे प्रस्तावित आहे.

## ८.३ मुंब्रा येथे प्लॅटफॉर्म स्कूल

मुंब्रा हा अतिशय दाटीवाटीने वसलेला विभाग असून मुंब्रा स्टेशन परिसरात असंख्य कुटुंबे वास्तव्यास असून बहुतांश मुले ही प्लॅटफॉर्म परिसरात भिक मागत फिरत असल्याने या कुटुंबातील मुलांना सिग्नल शाळेप्रमाणे शिक्षण देण्याच्या उद्देशाने प्लॅटफॉर्म स्कूल सुरु करण्याचे नियोजन आहे. यासाठी रक्कम **रु.२५ लक्ष इतकी** भरीव तरतूद करण्यात आलेली आहे.

## ८.४ शैक्षणिक सहकार्य सेतू (विकीपिडीया)

महापालिका हद्दीतील महापालिका, खाजगी अनुदानित, विना अनुदानित अशा जवळपास ७०४ शाळा असून या शाळांमध्ये दर्जेदार व गुणात्मक शिक्षण, नवनवीन ज्ञाननिर्मिती, ज्ञानाचे प्रसारण इत्यादीसाठी Wikipedia मार्फत सर्व शाळांना Online द्वारे एक प्लॅटफॉर्मवर आणणे व त्यामार्फत कार्यालयीन माहिती, RTE अंतर्गत शासनाचे धोरण, विविध मोबाईल ॲपद्वारे तसेच Internet द्वारे माहिती देणे व ती संकलित करणे इत्यादी कामी या सेतूची निर्मिती केली असून अशाप्रकारची Educational Wikipedia सुरु करण्यासाठी प्रस्तावित असून याकरिता **रु.१.२५ कोटी** इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

## ८.५ नागरी शिक्षण प्रशिक्षण केंद्र

शिक्षण विभागातील शाळांतील गुणवत्ता वाढविणे, विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास साधणे, त्यांना स्पर्धेत टिकवून ठेवणे, शाळा प्रगत करण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षित करणे, त्यांच्या क्षमतेस

ज्ञानात्मक वाढ करणे. (Capacity Building) तसेच नवनवीन अध्यापन, अध्ययन पध्दतीने नावीन्यपूर्ण उपक्रम सतत वर्षभर राबविणेसाठी Guest Lectures च्या सहाय्याने गुणवत्तापूर्ण शिक्षण पध्दती शिक्षकांना उपलब्ध करुन देणेसाठी शिक्षण संशोधन प्रशिक्षण केंद्र निर्मिती व अनुषंगिक कर्मचारी उपलब्धता आणि वेतन व मानधन इत्यादी शाळा क्रमांक १९ येथे सुसज्ज आणि दर्जेदार ऑडीटोरिअम, e-लायब्ररी, संगणक कक्ष, Conferance Room इत्यादीचा अंतर्भाव असणार आहे. यासाठी रक्कम रु.३५ लक्ष इतकी भरीव तरतूद करण्यात आली आहे.

**८.६ आदर्श शाळा**

महानगरपालिकेच्या मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दु या चारही माध्यमाच्या शाळांत भाषा ज्ञानसमृध्दी, मातृभाषा विकास, श्रवण भाषण, वाचन, लेखन, संभाषण कौशल्य, शब्दसंपत्ती विकसित करणे, स्वयंअध्ययनास पोषक वातावरण निर्मिती करणे, शाळा रंगरंगोटी, क्रीडा व सांस्कृतिक तसेच सर्व वर्गखोल्या डिजिटल करणे, विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाकडे भर देऊन या आदर्श शाळेच्या नावीन्य उपक्रमाच्या दर्जातील बेंच मार्कची इतर शाळांनी दखल घेऊन अनुकरण करणे. त्यानुसार सर्व शाळा प्रगत होण्यासाठी प्रस्तावित केले असून रक्कम रु.२५ लक्ष तरतूद करण्यात आली आहे.

**८.७ साक्षर ठाणे**

- ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टी विभागातील निरक्षर नागरिकांना लेखन, वाचनाचे महत्व पटवून देऊन त्यांच्यात शिक्षणाची आवड निर्माण करणे, तसेच मूलभूत शैक्षणिक तसेच व्यवसायभिमुख कौशल्या बाबत प्रशिक्षित करणे, सध्याचे कॅशलेस व्यवहारांचे महत्व पटवून त्यांना मोबाईल ॲप्स व इतर ॲप्स द्वारे नवीन तंत्रज्ञानाची ओळख करुन आर्थिक व्यवहार करण्यासंबंधी सक्षम करुन सजग नागरिक बनविणे. यासाठी झोपडपट्टी भागात ५ साक्षर केंद्रांची निर्मिती करण्याचे प्रस्तावित आहे.

- तसेच कापूरबावडी नाका येथे कामगार स्त्रियांच्या मुलांसाठी सिग्नल शाळा व त्यांच्या बाळांसाठी पाळणाघर तथा डेकेअर सेंटर तसेच त्यांचे प्रौढ शिक्षण, व्यवसायाभिमुख शिक्षणासाठी सोयी, क्रेश

वॉशरुम, रेस्टरुम इत्यादी व्यवस्था पुरविणे प्रस्तावित असून यासाठी १० लक्ष इतकी तरतूद करण्यात आली आहे.

**८.८ दोन रात्रशाळांची निर्मिती**

ठाणे महानगरपालिकेच्या रात्रशाळांतील वाढता पट पाहता किसननगर व कौसा येथील झोपडपट्टी भागात या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता आठवी नंतर आणखी आर्थिक परिस्थितीमुळे अर्धवट शिक्षण सोडणा-या आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील शिक्षणाच्या प्रवाहात टिकून रहावे व नववी व दहावी चे शिक्षण पूर्ण करता येणे यासाठी नव्याने संधी प्राप्त करण्यासाठी रात्रशाळा योजना सुरु करणे प्रस्तावित असून यासाठी तरतूद करण्यात आली आहे.

ठाणे महानगरपालिकेने सन २०१६-१७ मध्ये कळवा व मानपाडा येथे २ रात्रशाळांची निर्मिती केली असून त्यांचा उत्कृष्ट प्रतिसाद पाहता, किसननगर येथे मराठी व मुंब्रा येथे हिंदी शाळांची निर्मिती करण्यासाठी प्रस्तावित आहे.

**८.९ स्मार्ट आय.डी.कार्ड योजना**

या योजनेअंतर्गत महापालिकेच्या सर्व शाळांतील विद्यार्थी तसेच शिक्षकाची हजेरी उपस्थितीची नोंद न कळत होणार असून विद्यार्थ्यांची वर्षभर गुणवत्ता आलेख, तसेच तो शैक्षणिक दृष्टया व शारीरिक दृष्टीने कोणत्या स्थितीत आहे, सतत गैरहजर राहण्याची कारणे, गृहपाठ तसेच भाषा व गणित क्षमतेचा विकास व शालेय उपक्रमात सहभाग इत्यादीचे अचूक निरीक्षण होणार असल्याने शाळा प्रगत होण्याच्या दृष्टीने ही योजना प्रस्तावित असून यासाठी रक्कम रु.२ कोटी इतकी तरतूद करण्यात आले आहेत.

**८.१० डिजिटल शाळा**

जलद प्रगत शैक्षणिक कार्यक्रमाअंतर्गत दि.९ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयानुसार सर्वच शाळा प्रगत करण्याचे शासनाचे धोरण असून या अंतर्गत राज्यामध्ये डिजिटल शाळेची चळवळ सुरु झाली आहे. यामध्ये शिक्षकांनी तंत्रस्नेही होऊन शाळांतील सर्व वर्गखोल्यांमध्ये मुलांच्या हातामध्ये टॅबलेट, इंटरॲक्टिव्ह बोर्ड विथ प्रोजेक्टर इत्यादीचा वापर करुन शाळा प्रगत करण्याचा आदेश समोर असल्याने ही साधने निर्माण करण्याकरीता तरतूद करण्यात येत आहे.

## ८.११ पी.पी.पी माध्यमातून दिव्यांग (अंध) विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक तथा बहुउद्देशीय संसाधन केंद्र

रोटरी क्लब ऑफ लेक सिटी, ठाणे या संस्थेमार्फत शाळा क्र.९, ठाणे पूर्व येथे दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी रिसोर्स सेंटरची निर्मिती करुन दिव्यांग विद्यार्थ्यांना (अंध) ऑडीओ बुकस् ब्रेललिपीचे किट व यासंबंधीचे Software च्या माध्यमातून उच्च शिक्षणासाठी तयारी तसेच UPSC, MPSC सारख्या स्पर्धात्मक परीक्षेची तयारी करणेसाठी ऑडीओ लायब्ररी NAB या संस्थेच्या मदतीने व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र इत्यादी सोयी सुविधा पुरविण्यात येणार असून महापालिका जागा उपलब्धतेबरोबर इतर सोयी सुविधा पुरविणार असून यामध्ये ठाणे महापालिका हद्दीतील आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना ५०% प्रवेश व ५०% सदर संस्था अल्पदराने फी आकारुन संस्थेचा खर्च भागविणार आहे. यासाठी रक्कम रु.५ लक्ष इतकी तरतूद करण्यात आली आहे.

## ८.१२ DBT कॅशलेस पध्दतीची अंमलबजावणी

शासनाच्या दि. ५ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार थेट लाभार्थी हस्तांतरण या योजनेद्वारे विविध कल्याणकारी योजनेतून विद्यार्थ्यांना वहया, शैक्षणिक साहित्य, दप्तर, गणवेष, शूज इत्यादीचा लाभ द्यावयाचा असून या विद्यार्थ्यांच्या बँक खाते उघडणेचे काम प्रगती पथावर असून ही संपूर्ण योजना कॅशलेस पध्दतीने Direct Benefit Transfer पध्दतीने करण्याचे नियोजन आहे.

## ८.१३ शैक्षणिक ERP

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या शासनाच्या धोरणानुसार विहीत केलेल्या शैक्षणिक व भौतिक फलनिष्पती गाठण्यासाठी प्रत्येक शाळेचा ERP तयार करण्यात येईल. त्या अंतर्गत विद्यार्थी नोंदणी, दैनंदिन प्रशासन, पाठयक्रम गट, पालक शिक्षक संच, वेळापत्रक, उपस्थिती, परीक्षा निकाल, पौष्टीक मध्यान्ह भोजन योजना इत्यादीचे संगणकीय मॉडेल तयार करण्यात येईल.

## ८.१४ झेप

या कार्यक्रमाअंतर्गत ठाणे महानगरपालिकेच्या जिद्द शाळेमध्ये खालील योजना राबविण्याचे प्रस्तावित आहे.

- **संसाधन केंद्रांची निर्मिती (Establishment of Resource Center)**

या योजनेअंतर्गत विविध संसाधन कक्षांची निर्मिती केली जाईल. यामध्ये प्रामुख्याने विविध विषयातील तज्ञ उदा. स्पिच थेरापिस्ट, ऑडीओलॉजिस्ट, काऊंसेलर, क्लिनीकल, सायकॉलोजिस्ट, फिजिओथेरॉपिस्ट, एज्युकेटर, ऑक्युपेशनल थेरॉपिस्ट व मेडीकल सोशल वर्कर यांची मानधनावर नेमणूक करुन दिव्यांग बालकांना त्यांच्या गरजेनुसार पुनर्वसनासंबंधी मार्गदर्शने प्राप्त करुन दिले जाईल.

- **विद्यार्थी उपस्थिती व पालक प्रोत्साहन भत्ता**

या अंतर्गत विद्यार्थ्यांना नियमित उपस्थिती करिता प्रोत्साहनपर भत्ता देणे व या दिव्यांग विद्यार्थ्यांस व्यवसाय प्रशिक्षणासाठी बाहय संस्थेत त्यांच्या पालकांसोबत जाणे अपेक्षित असून ते पालक सदर प्रशिक्षणास आपल्या पाल्यास नियमितपणे नेऊन प्रशिक्षण पूर्ण करतील फक्त अशाच पालकांना प्रोत्साहन भत्ता देण्यात येईल. या मागील उद्देश हे दिव्यांग विद्यार्थी स्वतःची उपजिवीका करु शकतील असा आहे.

- **शिक्षकांकरिता कौशल्य विकास कार्यक्रम**

या अंतर्गत विशेष शिक्षण क्षेत्रातील विकसित होणा-या नवनवीन पध्दती व साधने याबाबत अद्ययावत ज्ञान तज्ञांमार्फत शिक्षकास दिले जाणार आहे.

- **पालकांकरिता कौशल्य विकास कार्यक्रम**

या अंतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पालकांना आपल्या पाल्यासोबत व्यवसाय प्रशिक्षणात सामील करुन त्यांचे पुनर्वसन साधले जाईल व यामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांस आर्थिक दृष्टया सक्षम असा सामाजिक घटक घडविला जाईल.

**८.१५ ज्ञानरचनावाद**

या उपक्रमांतर्गत १० वी पर्यंतच्या मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी करणे, राज्याला राष्ट्रीय पातळीवर शैक्षणिक गुणवत्तेत प्रथम आणण्याचे उदिष्ट साध्य करणे, ज्ञानरचनावाद अभ्यासक्रम राबवून त्या अनुषंगाने विद्यार्थी गळतीचे प्रमाण थांबविणे, सदर अभ्यासक्रमानुसार भौतिक दृष्टया शाळा इमारत , वर्ग, अद्ययावत करणे. यामध्ये विशेष बाब म्हणजे उर्दू माध्यमाच्या २३ शाळांतील सुमारे ८५०० विद्यार्थ्यांना ज्ञानरचनावादा व्दारे शिक्षण देणारी राज्यातील ठाणे महानगरपालिका ही पहिली महानगरपालिका असेल. यासाठी रक्कम रु.२० लक्ष इतकी तरतूद करण्यात आली आहे.

**८.१६ गणितीय लॅब :-** विद्यार्थ्यांची गणित विषयाची भिती दूर करण्याकरीता विद्यार्थ्यांसमोर गणित विषय साहित्यासह मांडणे अत्यावश्यक आहे. यामध्ये गणित विषय शिकविण्यासाठी जुनी पध्दत न वापरता साहित्य वापरुन गणित विषय शिकणे व शिकविणे सोपे आहे. प्रत्येक ६ मुलांच्या गटासाठी एक गणित साहित्य संच उपयोगात आणावयाचा आहे. याबाबत गणित विषयाची लॅब तयार करण्यात येणार असून यासाठी १ कोटी २५ लाखाची तरतूद करण्यात आलेली आहे.

**८.१७ मॉडेल स्कूल**

खाजगी शाळांच्या तुलनेत महापालिका शाळांची अवस्था पाहून बरेच पालक आपल्या मुलांना महापालिका शाळांमध्ये प्रवेश घेत नाहीत. त्यासाठी शाळांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच शाळांच्या मूलभूत सुविधांचा विकास करुन विद्यार्थ्यांना चांगले वातावरण निर्माण करुन देणे आवश्यक आहे. त्यामुळे शाळांच्या पटसंख्येत वाढ होऊन गरीब विद्यार्थ्यांना गुणात्मक शिक्षण मिळणार आहे. त्यासाठी सुरुवातीला टप्प्याटप्प्याने काही शाळांचे मॉडेल स्कूलमध्ये रुपांतर करण्याचा मानस असून सन २०१७-१८ मध्ये यासाठी **रु.४ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

# ९. विद्युत विभाग

## ९.१ अपारंपारिक उर्जेवर आधारित NET-ZERO ऊर्जावापर संकल्पना

खनिज साधनांच्या सहाय्याने निर्माण करण्यात येणा-या पारंपारिक ऊर्जेच्या अति वापरामुळे हरितगृह वायुंचे (Green House Gases) मोठया प्रमाणात ऊत्सर्जन होऊन हवामान बदलाचे दुष्परिणाम सध्या आपल्या पृथ्वीतलावर समस्त सजीव सृष्टी भोगत आहे. त्यासाठी जागतिक पातळीवर प्रयत्न करण्यात येत असून त्यासाठीच्या जागतिक पातळीवरील करारात आपला देश सहभागी झालेला आहे.

सदर संकल्पनेतंर्गत महापालिकेच्या एकूण विजेच्या वापरा एवढी (अंदाजे ३३ मेगावॅट) ऊर्जा अपारंपारिक ऊर्जेच्या साधनांच्या सहाय्याने निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे. यापूर्वीच महापालिकेने काही इमारतींवर २१० किलोवॅट क्षमतेचे सौर उर्जेवर आधारित वीज निर्मिती प्रकल्प सुरु केलेले आहेत. त्याचबरोबर अपारंपारिक ऊर्जेवर आधारित प्रकल्प राबविण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येणार आहे.

## ९.२ ई-व्हेईकल चार्जिंग स्टेशन

शहरात होणा-या वायु प्रदुषणामध्ये वाहनांच्या वाहतुकीचा मोठा वाटा आहे. महापालिकेने यासाठी यापूर्वीच पुढाकार घेतला असून ठाणे परिवहन सेवेसाठी पर्यावरणभिमुख १०० इलेक्ट्रीक बसचा समावेश पी.पी.पी तत्वावर चालविण्यासाठी यापूर्वीच कार्यादेश देण्यात आलेला आहे. मे २०१७ पासून टप्याटप्याने शहरामध्ये इलेक्ट्रीक बसचा वापर सुरु होणार आहे.

त्याचबरोबर शहरात पारंपारिक इंधनावर चालणाऱ्या खाजगी चार चाकी, तीन चाकी व दोन चाकी वाहनांचा वापर कमी करुन पर्यावरणाभिमुख Battery Operated वाहनांचा वापर वाढविण्याच्या दृष्टीने आगामी आर्थिक वर्षात ठोस उपाययोजना करण्यात येणार असून त्यासाठी महापालिकेतर्फे शहरात विविध ठिकाणी Electric Vehicle Charging Stations ची उभारणी

करण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे शहरातील एकूणच वाहतूक व्यवस्थेमुळे होणारे प्रदुषण कमी होण्यास मदत होईल. त्यासाठी चालू आर्थिक वर्षात **रु.३ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

### ९.३ पब्लिक वाय-फाय आणि सिटी सर्व्हीलन्स

ठाणे शहरामध्ये Public Wi-Fi सेवा देणेसाठीची यंत्रणा PPP तत्वावर उभारण्याचे काम प्रगती पथावर असून येत्या मे महिन्यात Public Wi-Fi सेवा ठाणेकरांसाठी सुरु करण्यात येईल. त्याचबरोबर शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी संपूर्ण शहरात आगामी आर्थिक वर्षात १६०० सीसी कॅमेरे उभारण्यात येणार असून त्यासाठी ठाणे पोलिस व ठाणे महापालिकेसाठी दोन स्वतंत्र Command & Control Centre ची उभारणी करण्यात येणार आहे. त्यासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये **रु.३० कोटींची** तरतूद करण्यात आली आहे.

या प्रकल्पामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी ठोस उपाययोजना पोलिसांच्या सहकार्याने करण्यात येणार असून महापालिकेच्या सर्व सेवांचे परिणामकारक संनियंत्रण सदरच्या Command & Control Centre च्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

### ९.४ महापालिकेच्या सर्व रस्त्यावर आधुनिक LED पथदिवे

महापालिका क्षेत्रात यापूर्वीच तयार करण्यात आलेल्या सर्व रस्त्यावर आधुनिक LED दिवे नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने उभारणी करण्यासाठी आगामी आर्थिक वर्षात रु.२० कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

### ९.५ महापालिकेच्या शाळांमध्ये सुरक्षेसाठी कॅमेरे

महापालिका शाळांमध्ये सुरक्षिततेसाठी व अनुचित घटना टाळण्यासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात २६० इतके कॅमेरे लावण्यात आलेले आहेत. आगामी वर्षात महापालिकेच्या उर्वरित शाळांमध्ये कॅमेरे लावण्यासाठी **रु.६० लक्षची** तरतूद करण्यात आलेली आहे.

# १०. उद्यान विभाग

उद्यान विभागाकडील सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकात प्रस्तावित करण्यात आलेली पुढील कामे सुरु असून सन २०१८ मध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

## १०.१ बॉलीवुड पार्क (Bollywood Park)

वर्तकनगर प्रभाग अंतर्गत कै. आप्पासाहेब पवार उद्यानामध्ये १.५ एकर जागेत बॉलीवुड पार्क विकसित करण्यात येत असून त्यापैकी ३५% काम पूर्ण झाले असून उर्वरित काम सुरु आहे. सदर कामासाठी **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

## १०.२ जुने ठाणे - नवीन ठाणे थीम पार्क (Old Thane - New Thane Park)

चितळसर मानपाडा घोडबंदर रोड येथे जुने ठाणे नवे ठाणे शहराची प्रतिकृती संकल्पनेवर १ एकर जागेचे विकसन करण्याचे नियोजित होते. त्यापैकी ३५% काम पूर्ण झाले असून उर्वरित काम सुरु आहे. त्यासाठी सन २०१७-१८ मध्ये थीम पार्क अंतर्गत तरतूद प्रस्तावित आहे.

## १०.३ ट्रॅफिक पार्क (Traffic Park)

अर्बन फॉरेस्ट या संकल्पनेच्या आधारावर कावेसर येथे ८ एकर सुविधा भुखंडावर सेक्टर-३ मध्ये अमृत योजना, महापालिका निधी व प्रायोजकामार्फत पार्कचे विकसन करण्यात येत असून ५ एकर जागेवर ५० विविध प्रजातीच्या ३५०० वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. सदर कामासाठी **रु.१.२५ कोटी** तरतूद करण्यात आली आहे.

## १०.४ जैव विविधता उद्यान (Biodiversity Park)

कासारवडवली येथील उद्यानामध्ये १ एकर जागेवर जैव विविधता उद्यान विकसित करण्याचे काम सुरु आहे.

**१०.५ येऊर पर्यटन क्षेत्र**

येऊर येथील ५ एकर क्षेत्रावर येऊर पर्यटन क्षेत्र विकसित करण्याचे नियोजित असून त्या ठिकाणी अंदाजे आठ हजार चौ.मी. क्षेत्रावर आदिवासी कला केंद्र, नागरिकांसाठी विश्रांतीची जागा व ॲम्पी थिएटर तयार करण्यात येणार आहे. सदर कामासाठी **रु.४.४५ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**१०.६ पातलीपाडा निसर्ग केंद्र**

पातलीपाडा येथे वनविभागाच्या ५० एकर जागेवर पहिल्या टप्प्यात २० एकरांवर निसर्ग उद्यान, जनपथ, गुफा अशा विविध जनसुविधा विकसित करण्यात येणार असून या कामासाठी **रु.१५कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**१०.७ रोझ गार्डन (Rose Garden)**

कोपरी येथे वन विभागाच्या ताब्यातील मोकळया जागेवरील उद्यानाकरिता आरक्षित असलेल्या एकूण ३,६५७.२८ चौ.मी. भूखंडावर रोझ गार्डन बनविण्याचे नियोजन करण्यात येत आहे. सदर उद्यानामध्ये अंदाजे वेगवेगळया १०० प्रजातींच्या गुलाबाच्या एकूण १००० झाडांची लागवड करण्याचे नियोजन आहे.

**१०.८ पाच लक्ष वृक्ष लागवड**

ठाणे महानगरपालिकेच्या वतीने सन २०१४-१५ पासून ५ लक्ष वृक्ष लागवड ही योजना राबविण्यात येत असून या योजने अंतर्गत दोन वर्षात २ लक्ष वृक्ष लागवड करण्यात आली असून सन २०१७-१८ मध्ये उर्वरीत ३ लक्ष वृक्ष लागवड करण्याचे उद्दीष्ट आहे. या योजनेसाठी सन २०१७-१८ मध्ये **रु.१५ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**१०.९ वॉल गार्डन**

महापालिका हद्दीतील उड्डाणपूलाच्या पिलरवर तसेच इतर मोकळया भिंतीवर वॉल गार्डन करुन सुशोभीकरण करण्याचे प्रयोजन आहे.

# ११. अग्निशमन केंद्रामध्ये सुधारणा

### ११.१ अग्निशमन केंद्र बांधकाम

ओवळा, व्होल्टास कंपनी, कळवा-पारसिक येथे आगामी आर्थिक वर्षात अग्निशमन केंद्रे बांधण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात **रु.८ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

### ११.२ अग्निशमन दलासाठी लॅडर व वाहने खरेदी

अग्निशमन विभागासाठी आवश्यक असलेली लॅडर खरेदी प्रक्रिया चालू असून येत्या वर्षात ९० मिटर (A.L.P.) उंच जाणारी शिडी वाहन खरेदी करण्यात येणार आहे.यासाठी व इतर वाहने खरेदीसाठी अंदाजपत्रकात **रु.३० कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

### ११.३ फायर अलर्ट हॉटलाईन सिक्युरिटी सिस्टिम

अग्निशमन दलाचा रिस्पॉन्स टाईम कमी करणेसाठी फायर ॲलर्ट हॉटलाईन सिक्युरिटी सिस्टिम कार्यान्वित करण्यात येत आहे.

### ११.४ क्विक रिस्पॉन्स व्हेईकल

शहरातील अरुंद रस्त्याच्या ठिकाणी अग्निविमोचन वाहने वेळेवर पोहोचण्यासाठी ६ क्विक रिस्पॉन्स व्हेईकल खरेदी करण्यात येणार आहे.

### ११.५ फायर फायटींग सूट

अग्निशमन दलातील कर्मचा-यांच्या सुरक्षिततेकरिता अत्याधुनिक फायर फायटींग सूट खरेदी करण्यांची कार्यवाही सुरु आहे.

# १२. माहिती व तंत्रज्ञान विभाग

माहिती तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रशासनाच्या कार्यपध्दतीमध्ये पारदर्शकता व परिवर्तन आणण्याच्या दृष्टीने ई- गव्हर्नन्सचे महत्व विचारात घेऊन ठाणे महानगरपालिकेमधील संगणक विभागाचे माहिती तंत्रज्ञान कक्षात रुपांतर करण्यात आले असून या अंतर्गत नागरी सेवांचे उत्तम व्यवस्थापन, अंतर्गत कार्यपध्दतीतील सुधारणा व तत्पर निर्णय क्षमता यासाठी ई-गव्हर्नन्स चा वापर करुन सर्व विभागांचे संगणकीकरण करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## १२.१ डिजी ठाणे - स्मार्ट कार्ड

देशाचे माननीय पंतप्रधान यांच्या पुढाकराने साकारलेल्या "डिजिटल इंडिया " कार्यक्रमाच्या अनुषंगाने व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रात डिजिटल क्रांती घडवून आणण्याच्या दृष्टीने ठाणे महापालिकेमार्फत "डीजी-ठाणे " या स्मार्ट कार्डची सुरुवात करण्यात येणार आहे. या कार्डचा वापर सर्वसाधारणपणे क्रेडिट किंवा डेबिट कार्डसारखाच करता येणार असून या कार्डच्या माध्यमातून धारकास विविध सेवांची देयके , विविध कर, परिवहन सेवेचे तिकीट इत्यादीचे प्रदान करणे शक्य होणार आहे. महानगरपालिका व एच.डी.एफ.सी. बँक यांच्या संयुक्त विद्यामाने सदरचा प्रकल्प राबविण्यात येणार असून एच.डी.एफ.सी. बँकेच्या व्हिसा कार्डच्या धर्तीवर प्रीपेड कार्डचा वापर करण्यात येणार आहे. हे युटिलिटी डिजी कार्ड सामान्य क्रेडीट कार्ड सारखे टॉप-अप करता येणार असून नंतर ग्राहकांच्या आधार कार्ड व बँक खात्याशी संलग्न करण्यात येणार आहे. सदर कार्डचा जास्तीत जास्त वापर होण्याकरिता विविध प्रकारच्या योजना राबविण्यात येणार असून त्याद्वारे वापरकर्त्यांना Reward Points देण्यात येणार आहेत. त्यांचा वापर करुन वापरकर्ता विविध ठिकाणी खरेदीवर सूट मिळवू शकेल किंवा विविध बक्षिसांसाठी (उदा. नाटकाची मोफत तिकिटे, विविध जास्तींच्या वृक्षांचे रोपे, स्टेज शोचे पास, विविध करावर सवलत किंवा Cash Back ऑफर इत्यादीसाठी ) पात्र ठरणार आहे. अशा प्रकारे एखाद्या स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत असे डिजीटल कार्ड तयार करुन विविध सेवा नागरिकांपर्यंत पोहोचविणारी भारतातील ही पहिलीच महानगरपालिका आहे. सदरच्या प्रकल्पासाठी हार्डवेअर, सॉफ्टवेअर व ३ वर्षांच्या निगा व देखभालीसह अंदाजित **रु.२८ कोटी** खर्च अपेक्षित असून ही योजना ठाणे स्मार्ट सिटी लिमिटेड या कंपनीमार्फत राबविण्यात येणार आहे.

## १२.२ ई - गव्हर्नन्स

महानगरपालिकेच्या सर्व सुविधा ऑनलाईन व मोबाईल वर ॲपद्वारे देण्याचे प्रस्तावित असून नागरिकांना महापालिकेच्या कार्यालयात न येता बरीच कामे घरबसल्या मोबाईल द्वारे करता येणार

आहेत. ई-गव्हर्नन्सची सांगड (Integration) डीजी ठाणे कार्डशी केल्याने, विविध वयोगटातील, विविध आवडीनुसार, विशिष्ट भागातील अशा वेगवेगळया प्रकारच्या पर्यायांद्वारे नागरीक आणि महापालिका अधिकारी व कर्मचारी यांच्यात योग्य सुसंवाद साधणेही शक्य होणार आहे. सदरचे काम हे हार्डवेअर, सॉफ्टवेअर व ५ वर्षांच्या निगा व देखभालीसह करण्यात येणार असून अंदाजित खर्च **रु.१२ कोटी** अपेक्षित केलेला आहे.

## १२.३ छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाचे संगणकीकरण (HMIS)

रुग्णालयातील सर्व १२ विभागांचे संगणकीकरण करुन बाहय रुग्ण विभागातील कामकाजाचे संपूर्ण ऑटोमेशन करणे प्रस्तावित असून रुग्णांची सर्व माहिती, इतिहास (History) तसेच देयका संबंधी माहिती ऑनलाईन उपलब्ध होऊ शकेल. या माहितीच्या आधारे रुग्णाच्या विविध वैद्यकीय अहवालाचे पृथ:करण करणे सहज शक्य होणार आहे. सदरचा प्रकल्प हा ५ वर्षांसाठी BOOT (Build, Own, Operate & Transfer ) या संकल्पनेवर आधारित असणार आहे.

## १२.४ स्कॅनिंग व डिजिटायझेशन

ठाणे महानगरपालिकेतील सर्व विभागांतील महत्वाच्या कागदपत्रांचे स्कॅनिंग करुन ती कागदपत्रे डिजिटल स्वरुपात वापरात आणण्यासाठी हा प्रकल्प राबविण्यात येत असून या अंतर्गत पहिल्या टप्प्यात ५ कोटी कागदपत्रांचे डिजिटायझेशन प्रस्तावित आहे. यामध्ये मुख्यत्वेकरुन शहर विकास, जन्म व मृत्यू, लेखा, आस्थापना विभागांचा समावेश असून त्याद्वारे या विभागातील महत्वाची कागदपत्रे सर्व्हरवर डिजिटल स्वरुपात उपलब्ध होणार आहेत. सदरच्या प्रकल्पासाठी ३ वर्षांच्या निगा व देखभालीसह अंदाजित **रु.६.१५ कोटी** खर्च अपेक्षित आहे.

## १२.५ टी. एम.टी साठी ITS व सेंट्रल कमांड सेंटर

ठाणे परिवहन सेवेच्या अंतर्गत बसचे काटेकोर परिचलन व व्यवस्थापन करण्यासाठी Intelligent Transport System सह मध्यवर्ती सूचना केंद्र (Central command center) उभारणे प्रस्तावित आहे. त्याआधारे बसच्या पाळीनुसार परिचालन करणे, चालक व वाहकाच्या पाळीचे संनियंत्रण करणे, विविध अहवाल तयार करणे, बसचे सध्याचे ठिकाण प्रवाशांना जाणून घेण्यासाठी Where is My Bus हे ॲप तयार करणे, बसची सद्यस्थिती (Location) व बसस्टॉप वर येण्याचा अंदाजित कालावधी बसस्टॉपवर स्क्रीन वर दाखवणे, बसची यांत्रिकी स्थिती तपासणे व त्यासंबंधी अलर्ट देणे, मध्यवर्ती सूचना केंद्रातून चालू बसच्या भौगोलिक सद्यस्थितीचा (Geo Location) आढावा घेणे अशा विविध कामांचा समावेश आहे. याद्वारे प्रवाशांना बसेसची योग्य व वेळेत माहिती मिळणे शक्य होणार आहे. जेणे करुन त्यांचा प्रवास अधिक सुखकर होऊ शकेल. सदरच्या प्रकल्पासाठी ३ वर्षांच्या निगा व देखभालीसह अंदाजित **रु.४ कोटी** खर्च अपेक्षित आहे.

## १२.६ आपत्ती व्यवस्थापन कक्ष व कामकाजाचे संगणकीकरण

ठाणे महानगरपालिकेत आपत्ती व्यवस्थापन कक्ष २४ तास कार्यरत असून आपत्तीच्या काळात नागरिकांना सहकार्य करतांना करण्यात येणा-या विविध कामांचे संगणकीकरण करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. यामध्ये सध्याची कार्यपध्दती पाहून त्यानुसार संगणक प्रणालीद्वारे घटनेशी संबंधित विविध घटकांना (उदा. रुग्णालय, पोलीस, अग्निशमन दल, प्रशासन, राजकीय प्रतिनिधी व इतर संबंधित यंत्रणा) अलर्ट जाण्यासाठी प्रणालीचा विकास करणे, नागरिकांच्या वापरासाठी या प्रणालीवर युजर तयार करणे, विविध माध्यमांद्वारे (उदा. SMS, Voice Call, Social Media, Notifications) नागरिकांना प्रासंगिक अलर्ट देणे तसेच कक्षाच्या कामासंबंधी विविध अहवाल तयार करणे अशा कामांचा अंतर्भाव करण्यात येणार आहे. सदरचे काम हे हार्डवेअर, सॉफ्टवेअर व ३ वर्षांच्या निगा व देखभालीसह करण्यात येणार असून अंदाजित खर्च **रु.१.२५ कोटी** अपेक्षित आहे.

### १२.७ File Journey Management System (FJMS)

विविध विभागात तयार होणा-या नस्ती या मान्यतेसाठी किंवा अभिप्रायासाठी दुस-या विभागात किंवा वरिष्ठांकडे पाठविल्या जात असतात त्यांची सद्यस्थिती (Location) पाहण्यासाठी व त्या अनुषंगाने विविध विभागांच्या अंतर्गत नस्त्यांच्या निपटा-याची स्थिती यांचे अवलोकन करण्यासाठी याचा उपयोग होणार आहे. त्यामुळे विभाग निहाय, दिवसनिहाय प्रलंबित, पूर्ण व कार्यवाहीत असलेल्या नस्त्या, त्यासाठी लागलेला वेळ अशा विविध प्रकारे कामकाजाचे विश्लेषण करता येणार आहे.

### १२.८ नेटवर्क अपग्रेडेशन

ठाणे महानगरपालिकेतील सर्व कार्यालयांचे नेटवर्क (LAN) अपग्रेडेशन प्रस्तावित करण्यात येत आहे. सद्यस्थितीतील नेटवर्क व इन्फ्रास्ट्रक्चर हे ४ वर्ष जुने असल्याने त्याचे बळकटीकरण करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे संगणकीकरणामुळे नेटवर्क वापरकर्ते (Users) यांच्यात वाढ झाल्याने सर्व कार्यालयांमध्ये या वापरकर्त्यांसाठी इंटरनेटची जोडणी देणे अनिवार्य आहे. त्या अनुषंगाने नेटवर्कचे आधुनिकीकरण करण्याचे काम संगणक विभागामार्फत तातडीने हाती घेण्यात येणार आहे. यासाठी ३ वर्षांसाठी निगा व देखभालीसह अंदाजे **रु.१.५ कोटी** खर्च अपेक्षित आहे.

## १३ समाज विकास विभाग

### १३.१ महिला व बालकल्याण योजना

महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत ठाणे महानगरपालिकेतर्फे पुढील ५ वर्षासाठी महिलांच्या व बालकांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने दुर्बल घटक व तळागाळातील लाभार्थ्यांच्या उन्नतीसाठी कायमस्वरुपी व दूरगामी परिणाम होण्याच्या दृष्टीने नावीन्यपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत.

**१३.१.१ कचरावेचक व घरकाम करणा-या महिलांसाठी**

- सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी ठाणे महापालिका क्षेत्रातील आर्थिक दुर्बल घटकातील व सर्व झोपडपट्टी क्षेत्रातील घरकाम करणा-या महिलांचे सर्वेक्षण करणे.
- आरोग्याची तपासणी करणे.
- प्रायोगिक तत्वावर कचरा साठविण्याकरिता प्रभाग समिती निहाय जागा उपलब्ध करुन देणे.
- साठविलेल्या कच-यावर प्रक्रिया करुन खत बनविण्याकरिता अत्याधुनिक मशीन उपलब्ध करुन देणे.
- स्व:रोजगाराच्या दृष्टीने कौशल्य विकास रोजगार प्रशिक्षण देणे तसेच कायमस्वरुपी विक्री केंद्र उभारुन बाजारपेठ उपलब्ध करुन देणे.
- सदर योजना ठाणे महापालिका व बचत गट यांच्या संयुक्त विद्यमाने चालविणे.

**१३.१.२ स्वच्छता विषयक मा.पंतप्रधान यांच्या स्वच्छता अभियानास पुष्टी देणारे उपक्रम**

- महिलांसाठी अत्याधुनिक स्वच्छतागृह बांधणे व जुनी स्वच्छतागृहांची दुरुस्ती करणे.
- महापालिका क्षेत्रातील सार्वजनिक व शासकिय स्वच्छतागृहामध्ये सॅनिटरी नॅपकीन व्हेंडिंग मशीन उपलब्ध करुन देणे.
- महापालिका शाळेतील मुलींसाठी मोफत सॅनिटरी नॅपकीन पुरविणे.
- ठाणे महापालिका क्षेत्रातील अंगणवाडी व बालवाडी केंद्रातील मुलांसाठी शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे.

**१३.१.३ मुलींच्या अस्तित्वाकरिता व सक्षमीकरणाकरिता**

- राज्यकन्या योजना :- मुलगी जन्माला आल्यास तिच्या पूरकपोषणासाठी, प्राथमिक शिक्षणासाठी सहाय्यभूत आर्थिक मदत करणे.

- मनोधैर्य योजना:- महिला व मुलीवरील अत्याचार आणि असिड हल्ला यामध्ये बळी पडलेल्या मुली व महिलांसाठी त्यांच्या विवाहाकरिता, उद्योग व्यवसायकरिता किंवा वैद्यकीय उपचाराकरिता अर्थसहाय्य करणे.
- मुलींना व महिलांना अन्यायाचा प्रतिकार करण्याचे धाडस निर्माण व्हावे म्हणून कराटे प्रशिक्षण तसेच शौर्य पुरस्कार देणे.
- मुलींना व महिलांना अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी समुपदेशन केंद्र चालविणे तसेच महत्वाच्या दिवशी (क्रांती ज्योती सावित्री बाई फुले जयंती, जागतिक महिला दिन, राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सव, व्यक्तिमत्व विकास, जनजागृती कार्यक्रम आयोजित करणे.
- शासकीय, निमशासकीय, खाजगी नोकरदार महिलांसाठी वसतीगृह बांधणे / चालविणे.
- ठाणे महापालिका शाळेतील मुलींना शाळा गळतीचे प्रमाण थांबविण्याबाबत मुलींच्या पालकांना उपस्थिती भत्ता.
- ठाणे महापालिका प्राथमिक व माध्यमिक शाळेमधील मुलींकरिता मोफत बस पास देणे.
- कोपरी येथे रेल्वेस्टेशन नजीक रात्र निवारा बांधण्यासाठी केंद्र शासनाकडून प्राप्त होणा-या निधीस पूरक अनुदान महापालिकेकडून देण्यात येईल.

**१३.१.४ बालकांसाठी**

- नवजात शिशु संवर्धन: नवजात शिशुना पोषक साहित्य उपलब्ध करुन देणे. (पाळणा, गादी, आरोग्य किट व आवश्यक साहित्य उपलब्ध करुन देणे.
- पाळणाघर चालविणा-या अशासकीय संस्थांना अर्थसहाय्य करणे.
- महापालिका क्षेत्रातील रस्त्यावर राहणा-या बालकांच्या संरक्षण व जपणुकी करिता असलेल्या इमारतीमध्ये सुविधा उपलब्ध करणे व NGO मार्फत त्यांचे संरक्षण, शिक्षण, प्रशिक्षण व पुनर्वसन करणे.

- वर्तकनगर येथील बाल स्नेहालयासाठी आर्थिक तरतूद उपलब्ध करुन देऊन बेघर, निराधार मुलांच्या शिक्षण व संवर्धनासाठी मदत करणे.

## १३.२ दिव्यांग व्यक्ती कल्याणकारी योजना

### १३.२.१ दिव्यांगांना मोफत प्रवास

- सन २०१७-१८ व सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये ५०% टक्के टी.एम.टी बस प्रवासात सवलत देण्याचे प्रस्तावित आहे.
- सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात नागरी वाहतूक व्यवस्थेमध्ये दिव्यांगाकरिता प्रवासात सवलत देण्याकरिता होणा-या तोटयाची भरपाई करणे याकरीता **रु.४० लक्ष** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

### १३.२.२ दिव्यांगांकरिता उपचार केंद्र

- ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांगांना उपचार घेता यावेत यासाठी स्वतंत्र उपचार केंद्राची निर्मिती करणे.
- दिव्यांगांना मोफत वैद्यकीय मदत, शस्त्रक्रिया नाममात्र दरात उपलब्ध करुन देणे.
- दिव्यांगांना आवश्यकतेनुसार परिपोषक साहित्यांचे वाटप करणे.
- दिव्यांग उपचार केंद्र आरोग्य विभागाच्या अधिपत्याखाली असेल व त्यासाठी आवश्यक असणारा निधी दिव्यांग व्यक्ती कल्याणकारी योजनामधून देण्याचे प्रस्तावित आहे.

### १३.२.३ दिव्यांगांकरीता ऑडिओ लायब्ररी

- अंध व्यक्ती व विद्यार्थ्यांसाठी ऑडियो लायब्ररी (Audio Library) तयार करुन त्यांना ऑडियो डिव्हाईस (Audio Device) द्वारे व मेमरी कार्डद्वारे शैक्षणिक अभ्यासक्रम उपलब्ध करुन देणे.
- हा उपक्रम प्रायोगिक तत्वावर कोपरी येथील शाळा क्र.९ येथे सन २०१७-१८ याकालावधीत प्रस्तावित असून रु.३० लक्ष रुपयांची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

### १३.२.४ दिव्यांगांकरिता नोंदणी केंद्र

- शासन निर्णयानुसार महापालिकेच्या जन्म-मृत्यू नोंदणी विभागामध्ये दिव्यांग व्यक्तींची नोंदणी सुरु आहे.
- महानगरपालिका क्षेत्रामध्ये दिव्यांग व्यक्तींचे सर्वेक्षण प्रस्तावित आहे.
- सदर सर्वेक्षणानंतर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व दिव्यांगांना स्मार्टकार्ड देण्याचे प्रस्तावित आहे.
- सन २०१७-१८ या कालावधीत सदर योजनेअंतर्गत रु.५० लक्ष रुपयांची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

### १३.३ ठाणे हात (HAAT) कम स्किल डेव्हलपमेंट सेंटर

दिल्लीच्या धर्तीवर ठाणे शहरातील स्थानिक स्किल असलेल्या नागरिकांना त्यांनी तयार केलेल्या वस्तूंच्या विक्रीसाठी, प्रदर्शनासाठी एक मध्यवर्ती ठिकाण असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीकोनातून ठाणे हात (HAAT) कम स्किल डेव्हलपमेंट सेंटर निर्माण करण्याचा संकल्प असून इतर सेवाभावी संस्थांचे सहकार्य घेण्यात येणार आहे. यासाठी प्रथम टप्प्यात **रु.३ कोटी** तरतूद प्रस्तावित असून यासाठी लागणारी साधनसामुग्री खरेदी करण्यासाठी **रु.२.५० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

### १३.४ कर्तव्य - कल्चर ऑफ केअर :

ठाणे शहर हे राहण्यासाठी परवडणारे शहर असून येथे राहणा-या नागरिकांची संस्कृती जोपासण्यासाठी व ठाणे शहर जसे तलावांचे शहर म्हणून ओळखले त्याचप्रमाणे संस्कृतीचे शहर म्हणून नावलौकिकास आणण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात **रु. ५ कोटी** तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे.

# १४ क्रीडा विभाग

## १४.१ सिंथेटीक ट्रक

खेळाचा सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टीकोनातून ठाण्यातील ॲथलेटीक्स खेळाडूंना मुंबई येथे सिंथेटीक ट्रकवर सराव करण्यासाठी जावे लागत असल्याने दादोजी कोंडदेव स्टेडीयम मधील गॅलरी मध्ये वर्षभर सराव करण्याकरीता सिंथेटिक ट्रक तयार करण्यात आला आहे.

## १४.२ आंतरराष्ट्रीय दर्जाची शुटींग रेंज

सन २०१६-१७ या वर्षात १२ लेनची १० मिटर लांबीची आंतरराष्ट्रीय दर्जाची संपूर्ण वातानुकुलीत सुविधा असलेली शुटींग रेज दादोजी कोंडदेव स्टेडियम येथे तयार करण्यात आलेली आहे.

**१४.३** दादोजी कोंडदेव क्रीडाप्रेक्षागृहामध्ये स्केटींग रेंज, बिलियर्ड ॲकडमी, सेल्फ डिफेन्स ॲकडमी, टेबल टेनिस कोर्ट, ब्रिज व कॅरम रुम इत्यादी सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

## १४.४ अत्याधुनिक जीम

दादोजी कोंडदेव येथील क्लब मेंबर व खेळाडूंसाठी जिमचे नूतनीकरण करुन अत्याधुनिक जीमचे साहित्य देण्यात आले

## १४.५ लॉन टेनिस कोर्ट / बास्केट बॉल कोर्ट

मा.शरदचंद्र पवार स्टेडीयम येथे खेळाडूंसाठी लॉन टेनिस कोर्ट व बास्केट बॉल कोर्ट तयार करण्यात आलेले आहे.

## १४.६ दादोजी कोंडदेव क्रीडाप्रेक्षागृहाचे नुतनीकरण :

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात दादोजी कोंडदेव क्रीडा प्रेक्षागृह येथे रणजी क्रिकेट सामने घेण्याचा मानस असून त्याकरिता प्रयत्न करण्यात येणार आहेत. रणजी सामने खेळविण्याकरिता विकेट व आऊटफील्ट तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

## १४.७ खेळासाठी आरक्षित असलेल्या मेदानांचा विकास

ठाण्यातील नवोदित खेळाडूंना खेळाला वाव मिळण्याकरिता तसेच ठाणे हे शहर स्मार्ट सिटी प्रमाणे स्पोर्टस सिटी बनविण्याचा मानस असून "या आणि खेळा " हा दृष्टीकोन ठेवून ३२ मैदानांना मुलभूत

सुविधा देऊन मैदाने विकसित करण्यात येणार आहेत. सन २०१७-१८ मध्ये खेळासाठी आरक्षित असलेली मैदाने विकसित करण्यासाठी **रु.४कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**१४.८** कशिश पार्क येथे टेनिस व बिलियर्ड कोर्ट सुरु करण्यात आले आहे.

**१४.९** रिलायन्स कंपनीच्या माध्यमातून रॅपिडनेट स्पोर्टस् ॲकडमी चालू करण्यात येणार असून ठाण्यातील खेळाडूंना एकाच मैदानात पाच खेळ खेळण्याची संधी मिळणार आहे.

**१४.१०** दादोजी कोंडदेव क्रिडा प्रेक्षागृह येथे ॲथलेटीक्स खेळाडूंना २५०० मीटर्स सिंथेटीक इंक कमी पडत असुन तो इंक ४०० मीटर्सचा करण्यात येणार आहे.

# १५. परिवहन सेवा

## १५.१ JnNURM अंतर्गत मंजूर झालेल्या २२० बस

जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान अभियाना अंतर्गत ठाणे महानगरपालिकेच्या माध्यमातून ठाणे परिवहन सेवेकरीता २२० बस खरेदी करण्याकरीता निधी मंजूर करण्यात आला असून त्यापैकी एसी. व्होल्वो बस ३०, स्टॅण्डर्ड नॉन ए.सी. बस २० व मिडी बस ७२ अशा एकूण १२२ बस परिवहन सेवेत दाखल झाल्या असून त्या प्रवाशांच्या सेवेसाठी मार्गस्थ करण्यात आल्या आहेत. उर्वरित ९८ बस लवकरच उपलब्ध होणार असून त्यापैकी २८ बस मार्च २०१७ अखेर प्राप्त होणार आहेत.

## १५.२ ५० तेजस्विनी बस

मा.मंत्री, वित्त आणि नियोजन यांनी मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, कल्याण- डोंबिवली या शहरांमध्ये केवळ महिलांसाठी ३०० तेजस्विनी बसेस सुरु करण्याबाबत केलेल्या घोषणेनुसार ठाणे परिवहन सेवा उपक्रमाकरीता ५० तेजस्विनी बस खरेदी करण्यात येणार आहेत. त्यासाठी शासनाने ठाणे महानगरपालिकेसाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु. ६ कोटी** निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. महापालिकेने सन २०१७-१८ साठी **रु.५ कोटी** तरतूद प्रस्तावित केली आहे.

### १५.३ १०० वातानुकूलित इलेक्ट्रीक बस

ठाणे शहर हे मुंबई शहरानजीक आहे. मुंबई शहराची लोकसंख्या विचारात घेता, ठाणे शहराची वाढ झपाटयाने होत आहे. ठाणे शहरातील प्रवाशांना मुंबई, नवी मुंबई व मुंबई महानगर क्षेत्रामध्ये वातानुकुलित बससेवा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीकोनातून पी.पी.पी. तत्वावर ठाणे महानगरपालिकेच्या माध्यमातून ठाणे परिवहन सेवेकरीता १०० वातानुकुलित इलेक्ट्रीक बस खरेदी करण्यात येत आहेत. या बस बॅटरी ऑपरेटेड असल्यामुळे वायुप्रदूषण टाळण्यास तसेच देखभाल दुरुस्ती खर्च कमी करण्यास मदत होणार आहे. या बस खरेदी करण्याकरिता व या बसचे संचलन करण्याकरिता येणारा खर्च हा संबंधित ठेकेदार करणार आहे. या बसचे संचलन करण्याकरीता आगाराची जागा ठाणे महानगरपालितर्फे उपलब्ध करुन देण्यात येणार असून सदर बस टप्प्या टप्प्याने एप्रिल २०१७ पासून संचलनाकरिता उपलब्ध होणार आहेत.

### १५.४ आय.टी.एस कमांड ॲण्ड कंट्रोल सेंटरची निर्मिती

JnNURM फेज-२ अंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या २२० बसवर ITS यंत्रणा कार्यान्वित करणे तसेच JnNURM फेज-१ अंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या २०० बसवर GPS यंत्रणा बसवून ती कार्यान्वित करण्यासाठी कमांड ॲण्ड कंट्रोल सेंटरची निर्मिती निळकंठ टर्मिनस येथे करण्यात आली आहे.

## १६. केंद्र व राज्य शासन पुरस्कृत प्रकल्प

### १६.१ स्मार्ट सिटी

केंद्र शासनाने ठाणे शहराची स्मार्ट सिटी शहरामध्ये निवड केलेली असून त्यानुसार ठाणे स्मार्ट सिटी लिमिटेड या नावाचे विशेष उद्देश वाहन (SPV) कंपनी स्थापन झालेली आहे. केंद्र शासनाने मंजूर केलेल्या आराखडयातील कामे या कंपनीद्वारे करण्यात येणार आहेत. स्मार्ट सिटी योजनेसाठी दोन वर्षासाठीचा महापालिका हिस्सा म्हणून **रु.१०० कोटी** तरतूद सन २०१७-१८ मध्ये प्रस्तावित केलेली आहे. तसेच सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाच्या महापालिका

हिश्श्याची रक्कम **रु.५० कोटी** ठाणे स्मार्ट सिटी लिमिटेड या कंपनीकडे वर्ग करण्यात आलेली आहे.

**१६.२ अमृत योजना**

केंद्र शासनाला अमृत योजनेअंतर्गत निधी उपलब्धतेसाठी मलनि:सारण व पाणी पुरवठा योजनांचे DPR सादर करण्यात आलेले आहेत. सदर योजनेच्या खर्चाच्या ५०% हिस्सा हा महापालिकेने करावयाचा असल्याने सन २०१७-१८ या वर्षासाठी रु.२५ कोटी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**१६.३ सर्वांसाठी घरे योजना**

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत शहरातील झोपडपट्टयांचे नियोजन करुन विकास करण्यासाठी DPR तयार करण्याचे काम सुरु असून लवकरच सर्वांसाठी घरे उभारण्याचा अंतिम आराखडा व अंमलबजावणी आराखडा केंद्र शासनास सादर करण्यात येईल.

**१६.४ आर्थिक दुर्बल घटकांसाठी मूलभूत सोयी ( बीएसयुपी )**

बीएसयुपी टप्पा क्रमांक १,३ व ४ ची कामे अंतिम टप्प्यात असून सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात **रु.८० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**१६.५ परिवहन बस खरेदी**

जेएनएनयुआरएम अंतर्गत टप्पा दोन नुसार परिवहन सेवेकरीता एकूण २३० बसेस पैकी १२२ बस प्राप्त झालेल्या असून उर्वरित बसेस खरेदी करण्यासाठी **रु. ३५ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

## अधिकारी / कर्मचारी यांची क्षमताबांधणी व कल्याण

- **अधिकारी / कर्मचारी यांची वैद्यकीय तपासणी**

महानगरपालिकेतील ५० वर्षे वा त्यापेक्षा जास्त वय असलेल्या सर्व अधिकारी / कर्मचा-यांची प्रतिवर्षी महापालिकेच्या खर्चाने वैद्यकीय तपासणी केली जाईल. ज्या चाचण्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपलब्ध आहेत, त्या तेथेच होतील व उर्वरीत चाचण्या खाजगी रुग्णालयातून होतील.

- महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचा-यांमध्ये कार्य संस्कृतिची जपणूक व वाढ होण्यासाठी वेळेचे व्यवस्थापन, सकारात्मक विचार, ध्येयनिश्चिती, संघबांधणी अशा विषयांवर तज्ञांचे स्वतंत्रपणे मार्गदर्शन घेणे.

- महानगरपालिकेच्या वर्धापन दिनी उत्कृष्ट अधिकारी / कर्मचारी यांचा गुणगौरव करणे.

- प्रशासकीय व्यवस्थापनाचा दर्जा उन्नत करण्यासाठी "Quality Management Services" या तरतुदींवर कार्यालयाचे प्रमाणकीकरण.

- अधिकारी / कर्मचारी यांच्यामधील विविध क्षेत्रामध्ये गुणवत्ता धारण करणाऱ्या पाल्यांचा गुणगौरव करणे.

- ठाणे महानगरपालिकेत कर्तव्य बजावताना मृत्यू पावलेल्या अधिकारी / कर्मचा-यांना आर्थिक सहाय्य करणे.

**आभार**

भारताचे माननीय पंतप्रधान यांच्या नेतृत्वाखालील स्वच्छ भारत मिशन, अमृत योजना, स्मार्ट सिटी योजना, सर्वांसाठी घरे योजना, सोलार सिटी योजना, राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना आणि अन्य योजनांच्या माध्यमातून ठाणे शहराच्या विकासाला चालना देण्यासाठी केंद्र शासनाने जे योगदान दिले आहे त्याबद्दल त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानतो.

महाराष्ट्राचे मा.मुख्यमंत्री, ठाणे जिल्हयाचे मा.पालकमंत्री, ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मा.खासदार, मा.आमदार, मा.मुख्य सचिव, म.आयुक्त मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) नगर विकास विभागाचे मा.प्रधान सचिव व पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे मा.प्रधान सचिव तसेच मा. प्रधान सचिव महसूल, अध्यक्ष स्मार्ट सिटी व शासनातील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांनी महापालिकेस केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचा आभारी आहे.

ठाणे शहराच्या सर्वांगीण विकासाच्या प्रक्रियेत धोरणात्मक निर्णय घेऊन त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मला आणि माझ्या सहकारी अधिका-यांना प्रोत्साहित करीत असलेले मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सभापती, स्थायी समिती, मा.सभागृह नेते, मा.विरोधी पक्ष नेते, सर्व पक्षीय मा.गटनेते, सर्व सन्मा. नगरसेवक व नगरसेविका, सर्व पक्षांचे लोकप्रतिनिधी यांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो.

ठाणे शहरातील सर्व वृत्तपत्र व वृत्तवाहिन्यांचे पत्रकार, प्रतिनिधी यांनी महापालिकेच्या विविध योजनांना, धोरणांना सातत्याने सकारात्मक प्रसिध्दी देऊन सहकार्य केले त्याबद्दल त्यांचा विशेष आभारी आहे.

महानगरपालिकेच्या सर्व कामांच्या व योजनांच्या अंमलबजावणीसाठी सक्रिय सहभागी असलेले महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त श्री. सुनील चव्हाण (भा.प्र.से), श्री. अशोककुमार रणखांब व सर्व विभागातील विभाग प्रमुख व अधिकारी आणि कर्मचारी तसेच कर्मचारी संघटना यांचे मी आभार मानतो.

महानगरपालिकेचा अर्थसंकल्प अहोरात्र काम करुन तयार केल्याबद्दल मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री. सुधीर नाकाडी, श्री.प्रमोद निंबाळकर, श्री.रुपेश पाटगावकर व लेखा विभागाच्या अर्थसंकल्पाचे काम करणा-या सौ.अर्चना निपुर्ते तसेच लेखा विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांचेही आभार मानतो.

या पार्श्वभूमीवर सादर केलेल्या या अर्थसंकल्पीय अंदाजाद्वारे प्रस्तावित केलेल्या कामांना, प्रकल्पांना आणि धोरणांना मूर्त स्वरुप प्राप्त झाल्यावर ठाणे महानगरपालिकेचा सर्वांगीण विकास करण्याची

प्रक्रिया अधिक गतिमान होईल असा मला विश्वास आहे. त्या दृष्टीने आपला सहभाग व सहकार्य लाभेल अशी आशा बाळगून या आर्थिक वर्षाचे महसुली व भांडवली उत्पन्न व खर्चाचे शिल्लकी अर्थसंकल्पीय अंदाज मा.महासभेस सादर करीत आहे. त्यास आपण मान्यता द्यावी ही विनंती.

**लहरोंसे डरकर नौका पार नही होती**
**दिल से की गयी मेहनत कभी बेकार नही होती**
**कुछ किये बिना जय जयकार नही होती**
**कोशिश करनेवालोंकी कभी हार नही होती**

**धन्यवाद ! जय हिंद !!**

**संजीव जयस्वाल**
**महापालिका आयुक्त**